



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार १२ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# ओमानच्या सलालाह बंदरातील तेलसाठ्यावर ड्रोन हल्ला

## ■ टाक्यांना आग लागली ■ सुलतानांनी इराणी राष्ट्रपतींना फोन करून नाराजी व्यक्त केली






**तेल अवीव/वृत्तसंस्था : ओमानमधील दक्षिणेकडील शहर सलालाह बंदरातील तेल साठवण टाक्यांवर ड्रोन हल्ला झाला आहे. ओमानच्या सरकारी माध्यमांनुसार, ड्रोन हल्ल्यानंतर बंदरातील इंधन साठवण टाक्यांना आग लागली, जरी कोणतीही जीवितहानी झाली नाही. या हल्ल्यामागे कोणाचा हात आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. सागरी सुरक्षा कंपनी एम्ब्रेअरने सांगितले की या घटनेत बंदरातील कोणत्याही व्यापारी जहाजाचे नुकसान झाले नाही. या घटनेनंतर, ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक अल-सईद इराणचे अध्यक्ष मसूद पझ्श्कियान यांच्याशी फोनवरून बोलले आणि ओमानच्या भूभागावरील हल्ल्यांबद्दल नाराजी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की ओमान आपली सुरक्षा आणि स्थिरता राखण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलेल.**

ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक अल-सईद यांनी इराणी राष्ट्राध्यक्ष मसूद पाझ्श्कयान यांच्याशी फोनवरून चर्चा केली. या संभाषणादरम्यान सुलतानांनी ओमानच्या भूभागावरील हल्ल्यांबद्दल नाराजी व्यक्त केली. त्यांनी असाही पुनरुच्चार केले की ओमान सध्याच्या संघर्षात तटस्थ आहे आणि या प्रदेशात स्थिरता राखण्यासाठी प्रयत्नशील आहे. सुलतानांनी सांगितले की ओमान आपली सुरक्षा आणि स्थिरता राखण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलेल. तुर्कीचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान म्हणाले आहेत की इराणमध्ये सुरू असलेले युद्ध ताबडतोब थांबवावे, अन्यथा संपूर्ण मध्य पूर्व आगीत पेटू शकते. त्यांनी सांगितले की या संकटावर केवळ राजनैतिक मार्गानेच तोडगा काढता येईल.संसदेत कायदेकर्त्यांना संबोधित करताना एर्दोगान म्हणाले की जर युद्ध थांबवले नाही तर संपूर्ण प्रदेश आगीत पेटून उठेल. ते म्हणाले की जर संवाद आणि राजनैतिकतेला संधी दिली तर हा संघर्ष संपवणे शक्य आहे. अमेरिका आणि इस्रायली हल्ले सुरू होण्यापूर्वी तुर्कीने दोन्ही बाजूंमध्ये मध्यस्थी करण्याची ऑफर दिली होती. एर्दोगान म्हणाले की तुर्की अजूनही सर्व पक्षांशी वाटाघाटी करून युद्ध संपवण्याचा प्रयत्न करत आहे.

**ओमानमधील सलालाह बंदरात तेल साठवण टाक्यांवर ड्रोन हल्ला**

दक्षिण ओमानमधील सलालाह शहरातील बंदरातील तेल साठवण टाक्यांना ड्रोन हल्ल्यात लक्ष्य करण्यात आले. ओमानच्या सरकारी माध्यमांनी कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त दिले नाही.सागरी सुरक्षा कंपनी एम्ब्रेअरने वृत्त दिले आहे की ड्रोनने बंदरातील इंधन साठवण टाक्यांना लक्ष्य केले. ओमान टीव्हीनेही याची पुष्टी केली आहे. तथापि, हा हल्ला कोणी केला हे स्पष्ट नाही.बंदरातील कोणत्याही व्यापारी जहाजाचे नुकसान झाले नाही. मध्य पूर्वेतील सुरू असलेल्या युद्धादरम्यान आखाती प्रदेशातील उर्जा प्रतिष्ठानांवर इराणचे हल्ले वाढत असल्याचे वृत्त अल-जझीराने दिले आहे.

## होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजावर झालेल्या हल्ल्यानंतर भारत संतप्त

अमेरिका आणि इस्त्राइलने इराणविरुद्ध सुरू केलेल्या युद्धानंतर व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीची इराणने नाकेबंदी केली आहे. दरम्यान, आज याच होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये आखातामधून भारतातील कांडला बंदराच्या दिशेने येत असलेल्या थायलंडच्या जहाराजावर हल्ला झाला होता. आता या हल्ल्याविरोधात भारताने संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. हे कृत्य अत्यंत संतापजनक असल्याचे सांगत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने जहाजावरील हल्ल्याचा निषेध केला आहे. होर्मुझच्या आखातामधून थायलंडचे मयुरी नारी हे जहाज भारतातील गुजरात राज्यामधील कांडला येथील बंदरात येत होते. दरम्यान, आज या जहाजाला लक्ष्य करून आज हल्ला करण्यात आला. त्यानंतर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत व्यावसायिक जहाजांना लक्ष्य करणं ही अत्यंत चिंताजनक बाब आहे, असे सांगितले. याबाबत परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या प्रतिक्रियेनुसार या हल्ल्यांची घातकता सातत्याने वाढत आहे. त्यामुळे निर्दोष नागरिक आणि भारतीय कर्मचा-यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या स्वातंर्त्याचा सन्मान झाला पाहिजे. तसेच नागरी जहाजांना लष्करी हल्ल्यांपासून दूर ठेवले पाहिजे, असेही भारताने ठणकावून सांगितले आहे. दरम्यान, बुधवारी ११ मार्च रोजी होर्मुजच्या सामुद्रधुनीत थायलंडचा झेंडा असलेल्या 'मयूरी नारी' या महाकाय मालवाहू जहाजावर अज्ञात क्षेपणास्त्राने भीषण हल्ला केला. या हल्ल्यात जहाज आगीच्या भक्ष्यस्थानी पडले असून, जहाजावरील २३ पैकी २० कर्मचा-यांना वाचवण्यात यश आले आहे, तर ३ जण अद्याप बेपत्ता आहेत. 'प्रेशियस शिपिंग' या कंपनीचे हे जहाज संयुक्त अरब अमिरातीतील खलिफा बंदरावरून भारताच्या गुजरात राज्यातील कंडला बंदराकडे निघाले होते. मात्र, होर्मुजची सामुद्रधुनी ओलांडत असताना ओमानच्या उत्तर किनारपट्टीपासून ११ सागरी मैलांवर या जहाजाला लक्ष्य करण्यात आले होते.

### इराणी शाळेवरील हल्ल्यासाठी अमेरिका जबाबदार-तपासातून उघड

प्रारंभिक तपासात इराणी शहरातील मिनाब येथील शजराह तैयबेह प्राथमिक शाळेवर झालेल्या प्राणघातक क्षेपणास्त्र हल्ल्यासाठी अमेरिकेला जबाबदार धरण्यात आले आहे. अमेरिकन लष्करी तपासानुसार, जुने लक्ष्यीकरण डेटा वापरल्यामुळे शाळेची चुकीची ओळख झाली.२८ फेब्रु वारी रोजी झालेल्या हल्ल्यात शाळेच्या इमारतीला टोमाहाक क्षेपणास्त्राने लक्ष्य करण्यात आले. त्यावेळी, अमेरिकन सैन्य जवळच्या इराणी लष्करी तळावर हल्ला करत होते, जो पूर्वी त्याच संकुलाचा भाग होता. हल्ल्यात किमान १७५ लोक, बहुतेक मुले, मारले गेले.

## जम्मूत फारुख अब्दुल्लांच्या ताफ्यावर गोळीबार



**जम्मू-**जम्मूमध्ये नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला यांच्या ताफ्यावर बुधवारी रात्री उशिरा गोळीबार करण्यात आला. अधिका-यांच्या माहितीनुसार, ते एका विवाह सोहळ्याहून परत येत होते. त्यांच्यासोबत जम्मू-काश्मीरचे उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी देखील उपस्थित होते. मिळालेल्या माहितीनुसार, एका व्यक्तीने त्यांच्या वाहनावर गोळीबार केला. सुरक्षा कर्मचा-यांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला पकडले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून गोळीबारामागील कारणांचा शोध घेतला जात आहे. अधिका-यांनी सांगितले की, फारूख अब्दुल्ला आणि सुरिंदर चौधरी सुरक्षित आहेत. घटनेनंतर सुरक्षा यंत्रणा आणि पोलिसांनी संपूर्ण परिसर वेढून तपास सुरू केला आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा तपास करत असून, आजूबाजूला लावलेल्या सीसीटीव्ही कॅमे-यांचे फुटेजही तपासले जात आहे. अधिका-यांचे म्हणणे आहे की, तपास पूर्ण झाल्यानंतरच घटनेच्या कारणांचा स्पष्टपणे उलगडा होईल.

## मोबाईल रिचार्ज संपताच इनकमिंग कॉल आणि एसएमएस बंद का होतात?

**नवी दिल्ली :** मोबाईल रिचार्जची व्हॅलिडिटी संपल्यानंतर अवघ्या काही मिनिटांतच ग्राहकांचे इनकमिंग कॉल्स आणि एसएमएस बंद करण्याच्या टेलिकॉम कंपन्यांच्या धोरणाबाबत आम आदमी पार्टीचे खासदार राघव चड्ढा यांनी राज्यसभेत आक्रमक पवित्रा घेतला आहे. या धोरणामुळे देशातील कोट्यवधी गरीब आणि मध्यमवर्गीय मोबाईल धारकांचे नुकसान होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. राघव चड्ढा यांनी राज्यसभेत प्रश्न उपस्थित केला की रिचार्ज संपल्यावर आउटगोइंग कॉल बंद होणे समजू शकतो, पण इनकमिंग काल्स आणि विशेषतः एसएमएस का बंद केले जातात? आज सर्व बँकिंग व्यवहार आणि सरकारी सेवा ओटीपीवर आधारित आहेत. जर एसएमएस सेवा बंद(पान २ वर)




**खा.राघव चड्ढा यांनी राज्यसभेत मांडला लोकांचा प्रश्न**

## IPLच्या सुरुवातीच्या 20 सामन्यांचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** आयपीएल २०२६ च्या सुरुवातीच्या २० सामन्यांचे वेळापत्रक बुधवारी जाहीर करण्यात आले आहे. उद्घाटन सामना २८ मार्च रोजी गतविजेत्या रायल चॅलेंजर्स बंगळूरु (RCB) आणि सनरायझर्स हैदराबाद (SRH) यांच्यात खेळला जाईल. हा सामना बंगळूरु येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर होईल. याच मैदानावर गेल्या वर्षी ४ जून रोजी आरसीबीने पहिले विजेतपद जिंकल्यानंतर झालेल्या विजय मिरवणुकीदरम्यान चेंगराचेंगरी झाली होती आणि त्यात ११ लोकांचा मृत्यू झाला होता. (पान २ वर)

| मॅच | तारीख | दिवस | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| RCB vs SRH | 28 मार्च | शनिवार | 7:30 PM | बेंगलुरु |
| MI vs KKR | 29 मार्च | रविवार | 7:30 PM | मुंबई |
| RR vs CSK | 30 मार्च | सोमवार | 7:30 PM | गुवाहाटी |
| PBKS vs GT | 31 मार्च | मंगळवार | 7:30 PM | मुल्लांपुर |
| LSG vs DC | 1 एप्रिल | बुधवार | 7:30 PM | लखनऊ |
| KKR vs SRH | 2 एप्रिल | गुरुवार | 7:30 PM | कोलकाता |
| CSK vs PBKS | 3 एप्रिल | शुक्रवार | 7:30 PM | चेन्नई |
| DC vs MI | 4 एप्रिल | शनिवार | 3:30 PM | दिल्ली |
| GT vs RR | 4 एप्रिल | शनिवार | 7:30 PM | अहमदाबाद |
| SRH vs LSG | 5 एप्रिल | रविवार | 3:30 PM | हैदराबाद |
| RCB vs CSK | 5 एप्रिल | रविवार | 7:30 PM | बेंगलुरु |
| KKR vs PBKS | 6 एप्रिल | सोमवार | 7:30 PM | कोलकाता |
| RR vs MI | 7 एप्रिल | मंगळवार | 7:30 PM | गुवाहाटी |
| DC vs GT | 8 एप्रिल | बुधवार | 7:30 PM | दिल्ली |
| KKR vs LSG | 9 एप्रिल | गुरुवार | 7:30 PM | कोलकाता |
| RR vs RCB | 10 एप्रिल | शुक्रवार | 7:30 PM | गुवाहाटी |
| PBKS vs SRH | 11 एप्रिल | शनिवार | 3:30 PM | मुल्लांपुर |
| CSK vs DC | 11 एप्रिल | शनिवार | 7:30 PM | चेन्नई |
| LSG vs GT | 12 एप्रिल | रविवार | 3:30 PM | लखनऊ |
| MI vs RCB | 12 एप्रिल | रविवार | 7:30 PM | मुंबई |

## निवडणुकांपुरतीच लाडकी बहीण!

### ■ 1.05 लाख बहिणी अपात्र ■ रोहिणी खडसेंचा सरकारवर हल्लाबोल

**मुंबई /प्रतिनिधी-** तब्बल १ कोटी ५ लाख लाडक्या बहिणींना अपात्र ठरवल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. शासनाची ही वागणूक म्हणजे अपना काम बनता, अभी भाड़ में जाए जनता, निवडणुका जिंकल्या तर हळूहळू लाडक्या बहिणींवरचे प्रेम कमी होउ लागले, अशी बोचरी टीका केली आहे. रोहिणी खडसे यांनी आपल्या सोशल मीडियावर पोस्ट करत सरकारवर घणाघात केला आहे. रोहिणी खडसे आपल्या पोस्टमध्ये म्हणाल्या आहेत की, आता या क्षणाला मी ही पोस्ट करत असताना विधिमंडळात महिला शेतक-यांचे सक्षमीकरण या विषयावर चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, संत्री, तज्ज्ञ मंडळी यावर भाषणं ठोकतील आणि दुसरीकडे सरकारने आतापर्यंत तब्बल १ कोटी ५ लाख कोटी लाडक्या बहिणींना अपात्र ठरवले आहे. सरकारचा हा किती दुटप्पीपणा आहे? असा सवाल करत असतानाच त्या(पान २ वर)

## अध्यक्ष बिर्लाविरोधातील अविश्वास प्रस्ताव फेटाळला



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बुधवारी, लोकसभेत अध्यक्ष ओम बिर्ला यांना त्यांच्या पदावरून हटवण्यासाठीचा अविश्वास प्रस्ताव आवाजी मतदानाने फेटाळण्यात आला. सभागृहाच्या कामकाजादरम्यान त्यांच्यावर भेदभाव केल्याचा आरोप करण्यात आला.तत्पूर्वी, गृहमंत्री अमित शहा यांनी ५६ मिनिटांचे भाषण केले. यादरम्यान, त्यांनी राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षावर जोरदार हल्ला चढवला, १७ व्या आणि १८ व्या लोकसभेत त्यांना बोलण्यासाठी मिळालेल्या मर्यादित वेळेची आठवण करून दिली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की सभागृह नियमांनुसार चालेल. नियमांचे उल्लंघन करणा-या कोणालाही थांबवण्याचा आणि व्यत्यय आणण्याचा अध्यक्षांना अधिकार आहे. हे सभागृह जत्रा नाही; जे नियमांचे पालन करत नाहीत त्यांचे मायक्रोफोन बंद केले जातील. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे नाव न घेता शाह म्हणाले, 'भाउ, आपल्याला येथे नियमांनुसार बोलावे लागते. येथे इतके ज्येष्ठ सदस्य बसले आहेत. मला अजूनही शशी थरूर आणि बालू साहेब इथे बसलेले आहेत हे समजत नाही. तुम्ही त्यांना का शिकवत नाही?' ते येतात आणि पंतप्रधान मोदींना मिठी मारतात, डोळे मिचकावतात आणि फ्लाइंग किस देतात. मला बोलतानाही लाज वाटते. जर मी कोणाकडे बोट दाखवले तर चार बोटे माझ्याकडेच उभी राहतात. शहा यांनी काँग्रेस आणि राहुल गांधी यांना सभागृहात किती वेळ मिळाला हे सांगितले. त्यांनी किती वेळ बोलायचे याचे नियम आहेत. १७ व्या लोकसभेत काँग्रेसला १५७ तास ५५ मिनिटे देण्यात आली होती, जरी त्यांच्याकडे ५२ सदस्य होते. भाजपकडे सहा पट जास्त सदस्य होते, तरीही काँग्रेसला भाजपपेक्षा सहा पट जास्त वेळ देण्यात आला होता.

## मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सरकारची

● आरक्षणाच्या प्रश्नावर जरांगेंचा संताप
● नाहीतर 2029 मध्ये पराभव ठरलेला



**मुंबई/प्रतिनिधी :**मराठा आरक्षणासंदर्भात सरकारनं मराठवाड्यासाठी जीआर काढला आहे. आता कुणबी प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सरकारची असल्याचे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. प्रमाणपत्र मिळवून द्या, अन्यथा २०२९ मध्ये पराभवाचा सामना करा, असा इशारा देखील जरांगे पाटील यांनी आमदारांना दिला.

राज्य सरकारने मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात मराठवाड्यासाठी जीआर काढला आहे. त्यामुळं कुणबी प्रमाणपत्र मिळवून देण्याची जबाबदारी ही सरकारचीच असल्याचे सांगत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली. कुणबी प्रमाणपत्र मिळत नसेल तर मराठवाड्यातील मराठा समाजाने उद्यापासून आपल्या भागातील आमदारांना प्रमाणपत्र का मिळत नाही? याबाबत जाब विचारावा, असे आवाहनही त्यांनी केले. लातूर जिल्ह्यातील माकणी थोर येथे आयोजित श्री हनुमान आराधना कार्यक्रमानंतर ते माध्यमांशी बोलत होते. मराठा आरक्षणाचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी मराठवाड्यातील जो आमदार पुढे येणार नाही, त्यांना २०२९ च्या निवडणुकीत पडल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला.समाजाला मी वेळ मागतोय, एक वर्षाचा वेळ द्या. मी हे फेब्रुवारीत बोललो होतो. मात्र रोज कार्यक्रम होत आहेत. समाजाचा माझ्यावर विश्वास आहे. समाजासाठी काम करायचे. संघटन उभं करायचं नाही तर यंत्रणा उभी करायची असे मत मनोज जरांगे पाटील यांनी (पान २ वर)




## गॅस तुटवड्याने परिस्थिती हाताबाहेर;वडेट्टीवार यांचा सरकारवर हल्लाबोल



**मुंबई/प्रतिनिधी :** इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका युद्धाच्या झळा अवघ्या जगाला बसत आहेत. महाराष्ट्रात तर गॅस तुटवड्याची परिस्थिती दिवसागणिक हाताबाहेर जात आहे. त्यातच राज्यात गॅस सिलिंडरचा पुरवठा करणारी एक गाडीच चोरीला गेल्याची भयंकर घटना घडली आहे. काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे.

विजय वडेट्टीवार सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात होताच म्हणाले, काल रात्री सभागृह एक ते दीड वाजेपर्यंत चालले. काल आमदारांना कॅन्टिन बंद होती. त्यांना तिथे काहीही जेवणास मिळाले नाही. आज मंत्रालयात अशी स्थिती आहे की, कॅन्टिनसुद्धा बंद झाली. महाराष्ट्रातील हाटेल्सही बंद झाले आहेत. महिलांमध्ये या गॅस तुटवड्यामुळे अस्वस्थता आहे. सरकारने दरवाढ केली. पण मुंबई, नागपुरातील ३०टक्के हाटेल्स बंद झाले आहेत. पुढच्या २ दिवसांत पुन्हा सगळे हाटेल्स बंद होतील. हाटेल्स बंद होउ द्या. पण घरगुती गॅसच्या पुरवठ्याचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. राज्यात प्रचंड भीतीचे वातावरण तयार झाले आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले, या गॅस तुटवड्यामुळे उद्या घरची चूल कशी पेटवावी, घरी स्वयंपाक कसा करावा अशी चिंता निर्माण झाली आहे. सध्या ओटीपी दिल्यानंतर १५ दिवसांनंतर गॅस सिलिंडर मिळत आहे. या परिस्थितीत महाराष्ट्रावर परिणाम होणार असून यावर सरकारने वस्तुस्थिती सांगितली पाहिजे.



यातून पुढे काय परिणाम होणार आहे हे सर्वांना माहिती आहे. हे युद्ध वाढले तर त्याचे परिणाम उद्या दिसतील. पण सध्या परिस्थिती गंभीर आहे. कोल्हापूर व विदर्भातील काही शहरांसह राज्यात अनेक ठिकाणी आंदोलने सुरू झाली आहेत. गॅसच मिळत नाही.

**एचपी कंपनीची गाडीच चोरीला-**वडेट्टीवार म्हणाले, काल एचपीसीच्या गॅस सिलिंडरची गाडीच चोरीला गेली. १८ लाख रुपये किमतीची सिलिंडर होती. मुंबईतही पुरवठा(पान २ वर)

## १ व १० वरिल उर्वरित

### मोबाईल रिचार्ज संपताच

झाली, तर एखादा सामान्य माणूस आपले बँक खाते किंवा इतर अत्यावश्यक सेवा कशा वापरणार?

***ट्रायकडे कारवाईची मागणी***-टेलिकाम कंपन्या केवळ नफा कमवण्यासाठी ग्राहकांवर दबाव टाकत असल्याचा आरोप त्यांनी केला. पूर्वी व्हॅलिडिटी संपल्यानंतरही अनेक दिवस इनकमिंग सेवा सुरू असायची, मात्र आता कंपन्यांनी हे नियम बदलले आहेत. सरकारने आणि ट्रायने या प्रकरणात हस्तक्षेप करून टेलिक ?म कंपन्यांना इनकमिंग कॉल आणि एसएमएस सेवा सुरू ठेवण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी चड्डा यांनी केली आहे.

### IPLच्या सुरु वातीच्या 20

**१६ दिवसांत ४ डबल हेडर असतील-**आयपीएल २०२६ च्या पहिल्या टप्प्यात १६ दिवसांत २० सामने खेळले जातील. यात ४ डबल हेडरचा समावेश आहे. ५ वेळा विजेतेपद पटकावलेल्या मुंबई इंडियन्स (MI) 29 मार्च रोजी कोलकाता नाइट रायडसÇ (KKR) विरुद्ध त्यांच्या घरच्या मैदानावर, वानखेडे स्टेडियमवर, आपला पहिला सामना खेळेल.

चेन्नई सुपर किंग्स (CSK) ३० मार्च रोजी गुवाहाटी येथे राजस्थान रायल्स (RR) विरु द्ध आपल्या मोहिमेची सुरु वात करेल. ॠतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील क्स्ख मध्ये संजू सॅमसन पहिल्यांदाच खेळताना दिसणार आहे. तो टी-२० विश्वचषक २०२६ चा 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' होता. दुस-या टप्प्याचे वेळापत्रक निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर प्रसिद्ध केले जाईल. आयपीएलच्या दुस-या टप्प्याचे वेळापत्रक ५ राज्यांमध्ये होणा-या निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यानंतर प्रसिद्ध केले जाईल. २००८ मध्ये आयपीएल सुरू झाल्यापासून, जेव्हाही देशात सार्वत्रिक निवडणुका (२००९, २०१४, २०१९ आणि २०२४) किंवा कोणत्याही राज्यात विधानसभा निवडणुका झाल्या आहेत, तेव्हा स्पर्धेचे वेळापत्रक दोन भागांमध्ये प्रसिद्ध केले गेले आहे.

**उद्घाटन २ दिवसांनी पुढे ढकलले-**देशातील ५ राज्यांमध्ये निवडणुकांमुळे आयपीएलचा उद्घाटन सामना २ दिवसांनी पुढे ढकलण्यात आला आहे. आधी लीगची सुरु वात २६ मार्च रोजी होणार होती, परंतु आता लीग २८ मार्च रोजी सुरू होईल. विधानसभा निवडणुका असलेल्या राज्यांमध्ये ४ प्रमुख स्टेडियम आहेत, जिथे आयपीएलचे सामने होणार आहेत. तमिळनाडूच्या चेन्नई येथील एमए चिदंबरम स्टेडियम (चेपाक) चेन्नई सुपर किंग्सचे होम ग्राउंड आहे. पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील ईडन गार्डन्स कोलकाता नाइट रायडर्सचे घरचे मैदान आहे, तर आसाममधील गुवाहाटी येथे असलेले बारसापारा क्रिकेट स्टेडियम राजस्थान रॉयल्सचे दुसरे होम वेन्यू राहिले आहे.

### *निवडणुकांपुरतीच लाडकी*

म्हणाल्या की, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जेव्हा ही योजना सुरू केली होती तेव्हा परिस्थिती काय होती? सुरु वातीचे लाभार्थी २.५३ कोटी होते. तर सुरु वातीचे बजेट ४५,००० कोटी रु पये होते. तपासणीनंतर संभाव्य पात्र लाभार्थी हे १,४८,६०, ००० इतके आहे. तर २०२६-२७ बजेटमध्ये तरतूद ही २६,५०० कोटी इतकी करण्यात आली आहे. तर संभाव्य अपात्र महिला या सुमारे १.०५ कोटी ठरल्या आहेत. म्हणजे निवडणूक होती तेव्हा शासनाने सरसकट लाडक्या बहिणींना पैसे दिले.

### मराठा समाजाला कुणबी

व्यक्तकेले आहे. मागील काही दिवसांपासून मी समाजाला वेळ मागतोय. एक वर्षाचा वेळ द्या. मात्र तसं होताना दिसत नाही. मला संघटना उभी करायची नाही. समाजातील अडलेल्या-नडलेल्या लोकांना वेळेवर मदत पोहोचवण्यासाठी यंत्रणा उभी करत आहोत. समाजाचा माझ्यावर विश्वास आहे. माझा समाजावर विश्वास आहे. यातूनच आम्ही काम करत आहोत असे जरांगे पाटील म्हणाले. तुमची सुपारी दिली याबाबत बोलताना जरांगे म्हणाले की, त्यावर आता काहीच बोलणार नाही. खूप मोठे ट्विस्ट त्यावर येणार आहेत. पोलिसांच्या हाताला ब-याच गोष्टी लागल्या आहेत. खूप काही त्यातून उघड होणार आहे. त्यामुळं थोडासा शांत आहे. यात खूप मोठा भांडाफोड होणार असल्याचे जरांगे म्हणाले. महादेव मुंडे हत्याप्रकरणाबाबत बोलताना जरांगे म्हणाले की, गृह मंत्रालयाच्या कानावर आपण तो विषय टाकला आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात सर्व काही केलं आहे. त्या महिलेला न्याय देण्यासाठी काम केलं आहे. मराठा समाज हळूहळू एका वर्षात संपूर्णपणे आरक्षणात जाईल असे जरांगे म्हणाले. मराठवाड्यातील सगळ्या मराठ्यांना सांगतो, आरक्षण दिलं आहे. प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सरकारची आहे. आमदारांची आहे. प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी त्यांनी घ्यावी. जर हे केलं नाही तर २०२९ मध्ये त्या आमदाराला पाडण्याची जबाबदारी आमची असेल असा इशारा जरांगेंनी दिला.

### गॅस तुटवड्याने परिस्थिती हाताबाहेर;

बंद आहे. एवढी भयावह परिस्थिती असताना सरकारकडून निवेदन आले पाहिजे. महाराष्ट्रातील जनतेला सांगितले पाहिजे की, आता काय परिस्थिती आहे? या परिस्थितीतून आपण कसा मार्ग काढणार आहोत? आता आपल्याकडे उपलब्ध किती आहे? तुटवडा कसा निर्माण होणार आहे? काही बचत करायची असेल तर कशी करावी? यावर सरकारने स्पष्टीकरण द्यावे, असे ते म्हणाले.

**अध्यक्षांचे सरकाला निवेदन करण्याचे निर्देश**

विजय वडेट्टीवार यांच्या या मागणीवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सरकारला स्थिती स्पष्ट करण्याचे निर्देश दिले. गॅस, पेट्रोलियम हा केंद्र सरकारच्या अखत्यारीतील विषय असला तरी राज्यातील जनतेची गैरसोय होउ नये याची जबाबदारी महाराष्ट्र शासन घेत असते आणि घेईल. त्यामुळे दिलेल्या माहितीची नोंद घेउन शासनाने उचित उपाययोजना करावी, असे ते म्हणाले. त्यावर वडेट्टीवार यांनी पुन्हा सरकारच्या निवेदनाची मागणी केली. पण अध्यक्षांनी प्रथम सरकारला उपाययोजना ठरवू द्या, त्यानंतर ते निवेदन करतील, असे स्पष्ट केले.

**विरोधकांची विधिमंडळाच्या पाय-यांवर घोषणाबाजी**

तत्पूर्वी, विरोधकांकडून गॅस दरवाढ व इंधन टंचाईच्याविरोधात आज विधान भवनाच्या पाय-यांवर घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी त्यांनी मित्रप्रेमाचा देशाला बसलाय चटका, गॅस दरवाढीचा गोरगरिबांना फटका; परराष्ट्र धोरण गरिबांच्या मुळावर, विझविल्या चुली आणि आणि वरवंटा पोटावर अशा विविध घोषणांचे फलक यावेळी विरोधी पक्षांच्या आमदारांच्या हातात होते.

### संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा

शुल्कप्राप्तीचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच खर्चाकरिता ५ कोटी ३९ हजार एवढा खर्चाचा अंदाज आहे.

ज्ञानस्त्रोत केंद्रासाठी अर्थसंकल्पीय वर्षात पाक्षिके, नियतकालिके तसेच प्रशासकीय खर्चासाठी रुपये १ कोटी १९ लक्ष ४५ हजार एवढी तरतूद करण्यात आली आहे. क्रीडा व शारीरिक शिक्षणासाठी अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ४ कोटी १ लक्ष ४४ हजार एवढा खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सर्वसामान्य सेवा व प्रशासकीय व्ययासाठी या अर्थसंकल्पीय वर्षात रु. ५४ कोटी ६३ लक्ष ११ हजार एवढा खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विद्यार्थी परिषद कार्यक्रम व विद्यार्थी विकास निधी अंतर्गत ८६ लक्ष १३ हजार, शिक्षक व कर्मचारी कल्याण निधीकरिता ६६ लक्ष १३ हजार एवढा खर्चाचा अंदाज आहे. आपत्ती नियोजन निधीसाठी रु. १ कोटी ३ हजार एवढा खर्चाचा अंदाज आहे. विद्यार्थी सुरक्षा विमा निधी, दान निधी, संत गाडगे बाबा अध्यासन निधी, युएसआर निधी अंतर्गत रु. १ कोटी ८ लक्ष ५ हजार एवढा खर्चाचा अंदाज आहे. विकासासाठी रु. ४१ कोटी ३९ हजार एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. विद्यापीठाने निकाय निधी (कॉर्पस फंड) उभारलेला असून या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये १ कोटी ५१ लक्ष एवढा निधी जमा होईल असा अंदाज आहे. घसारा निधीमध्ये या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये प्रत्येकी रु. १८ कोटी १० लक्ष एवढा निधी जमा होईल असा अंदाज आहे. स्वतंत्र प्रकल्प किंवा योजना किंवा सहयोग कार्यक्रम अनुदानांतर्गत या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये रुपये १३० कोटी ४९ लक्ष ७० हजार एवढा अनुदान प्राप्तीचा अंदाज असून १३० कोटी ६५ लक्ष ७३ इतक्या खर्चाचा अंदाज आहे.

**अर्थसंकल्पाची वैशिष्टे :** परीक्षा सुधारणासाठी ११ कोटी रुपये, कुलगुरू फेलोशिप पुरस्कारासाठी रु. ५ लक्ष, इक्वल अपॉर्च्युनिटी सेलकरिता रु. १ कोटी ७१ लक्ष २६ हजार आणि प्रशिक्षण, उद्योजकता विकास, कौशल्य विकास, संशोधन इत्यादींसाठी ८८ लक्ष २५ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आरोग्य केंद्रातील औषधोपचारांसाठी ७ लाख ५० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठ स्तरावरील संशोधन निधी योजनेसाठी ५० लक्ष रुपये आणि आर.जी.एस.टी.सी. अंतर्गत २७ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, ज्यामुळे संशोधकांना आर्थिक मदत मिळेल. मागासवर्गीय आणि अल्पसंख्यंक विद्यार्थ्यांसाठी नेट कोचिंग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षणासाठी प्रत्येकी २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

शिक्षक आणि कर्मचारी कल्याण निधीसाठी ६६ लाख ५७ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी सुरक्षा विम्यासाठी ६० लाख १ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रशिक्षण, उद्योजकता विकास आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल करिता १९ लाख ८० हजार रुपये आणि शिक्षक-कर्मचारी प्रशिक्षणासाठी ८६ लक्ष ५० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. संशोधक आणि विद्यार्थ्यांना ग्रंथालयीन सुविधा, पुस्तके, उपचार, उपकरणे, नियतकालिके व पाक्षिकांसाठी अर्थसंकल्पात २ कोटी १९ लाख ४५ हजार रुपयांच्या निधीची तरतुद करण्यात आली आहे. बुलढाणा येथील आदर्श पदवी महाविद्यालयाच्या आवर्ती खर्चासाठी १ कोटी ६३ लाख ३७ हजार रुपये आणि अनावर्ती खर्चासाठी १३ लाख ३० हजार इतकी तरतूद करण्यात आली आहे. आपत्कालीन नियोजनांतर्गत विविध कार्यक्रम व शिबिर आयोजनासाठी १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाने सामाजिक उपक्रमांसाठी ५ लाख ३ हजार रुपयांची तरतूद केली आहे. विद्यापीठाला पीएम-उषा योजनेअंतर्गत बांधकाम, नूतनीकरण आणि उपकरणे खरेदीसाठी २० कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे, त्यापैकी १८ कोटी ४६ लक्ष ३७ हजार एवढा अनुदानप्राप्तीचा या अर्थसंकल्पीय वर्षात अंदाज आहे.

अकोला येथे उपकेंद्रासाठी शासनाकडे ६ कोटी ८७ लक्ष ३९ हजार, म्युझियमकरिता १ कोटी ९८ लक्ष ५२ हजार, मेळघाट येथे ट्रायबल स्किल डेव्हलपमेंट सेंटरसाठी २९ कोटी ९२ लक्ष, सिंथेटिक टॅक, फुटबॉल आदी मैदानासाठी १५ कोटी १० लक्ष ४१ हजार, सी.एम. उषा योजनेंतर्गत ३० कोटी, सायन्स सेंटर १७ कोटी इतक्या रकमेचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेले आहेत. विद्यापीठाचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प काही दुरुस्त्यांसह सर्वानुमते मान्य करण्यात आला.

### संतापाच्या भरात पत्नीने पतीचा

पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला असून आरोपी पत्नीला ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वलगाव पोलीस करत आहेत. दरम्यान, वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत खून झाल्याची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी घटनास्थळाला भेट देत घटनेची माहिती घेतली व तपासासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

### महानगरपालिकेची कारवाई :

इशाराही देण्यात आला होता.

मात्र दिलेल्या मुदतीत थकबाकीचा भरणा न झाल्यामुळे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आज दस्तूरनगर येथे भेट देत मालमत्ता क्रमांक ३८१ या वास्तूवर अधिकृतपणे सील लावण्याची कारवाई केली. यावेळी झोन क्र.३ चे सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, महानगरपालिकेच्या कर वसुली विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संबंधित ठिकाणी पंचनामा करून नियमांनुसार संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात आली.

अमरावती महानगरपालिकेने सध्या शहरात मालमत्ता कर वसुली मोहीम हाती घेतली आहे. आर्थिक वर्ष संपण्यास काही दिवस शिल्लक असताना थकीत कराची वसुली करण्यावर महानगरपालिकेने विशेष भर दिला आहे. त्यामुळे ज्या नागरिकांनी अद्यापपर्यंत मालमत्ता कर भरलेला नाही, अशा थकबाकीदारांवर कठोर कारवाई केली जात असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, अनेक मालमत्ताधारकांकडे मोठ्या प्रमाणात कर थकबाकी आहे. यामुळे महानगरपालिकेच्या महसुलावर परिणाम होत असून शहरातील विकासकामांवरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे कर थकबाकीदारांना वारंवार सूचना देऊनही कर न भरल्यास सील, जप्ती किंवा इतर कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे.

दरम्यान, दस्तूरनगर परिसरात झालेल्या या कारवाईमुळे इतर थकबाकीदारांमध्ये काही प्रमाणात धास्ती निर्माण झाली आहे. महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे की, आगामी काळात शहरातील विविध भागांमध्ये अशाच प्रकारच्या कारवाया करण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी आपला मालमत्ता कर तातडीने भरून महानगरपालिकेच्या कारवाईपासून वाचावे, असे आवाहनही अमरावती महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

महानगरपालिकेची ही मोहीम पुढील काही दिवस अधिक तीव्र होणार असून थकीत कर वसुलीसाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. आवश्यकतेनुसार थकबाकीदार मालमत्तांवर सील लावणे, जप्तीची कारवाई करणे तसेच कायदेशीर पावले उचलणे यांसारख्या उपायांचा अवलंब करण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

### अमरावतीसाठी हवाई कनेक्टिव्हिटी

त्यांनी सांगितले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, विविध शैक्षणिक संस्था, औद्योगिक उपक्रम, मोठी कृषी बाजारपेठ तसेच आरोग्यसेवा सुविधा यांमुळे अमरावतीला विदर्भातील एक महत्त्वाचे प्रादेशिक केंद्र मानले जाते. तरीसुद्धा पुरेशा विमानसेवेअभावी उद्योगपती, व्यापारी, विद्यार्थी, रुग्ण आणि सामान्य नागरिकांना लांबचा प्रवास करावा लागतो, ज्यामुळे वेळ आणि खर्च दोन्ही वाढतात.

डॉ. बोंडे यांनी विशेषतः अमरावती–मुंबई दरम्यान दररोज नियमित विमानसेवा सुरू करण्याची मागणी केली. मुंबई ही महाराष्ट्राची आर्थिक राजधानी असून देशातील आंतरराष्ट्रीय विमानसेवेचे एक प्रमुख केंद्र आहे. त्यामुळे अमरावतीसारख्या महत्त्वाच्या शहराला मुंबईशी सक्षम हवाई जोडणी असणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यासोबतच त्यांनी अमरावतीहून इतर महत्त्वाच्या शहरांसाठीही नियमित विमानसेवा सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला. त्यामध्ये अमरावती–पुणे–गोवा, अमरावती–हैदराबाद–तिरुपती, अमरावती–कोल्हापूर–बेंगळुरू आणि अमरावती–इंदौर–दिल्ली या मार्गांचा समावेश आहे. या शहरांशी अमरावतीचे धार्मिक, औद्योगिक, शैक्षणिक, वैद्यकीय आणि व्यापारी संबंध असल्याने या मार्गांवरील हवाई सेवा सुरू झाल्यास प्रवास अधिक सुलभ होईल, असे त्यांनी सांगितले.

तसेच अमरावती विमानतळावर नाईट लँडिंगची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली. ही सुविधा सुरू झाल्यास विमानांच्या वेळापत्रकात अधिक लवचिकता येईल आणि प्रवाशांना अधिक सोयीस्कर सेवा मिळू शकेल. यामुळे उद्योग, पर्यटन आणि व्यापाराला चालना मिळेल तसेच अमरावती आणि विदर्भात गुंतवणूक वाढण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. बोंडे यांनी आपल्या मांडणीत पुढे नमूद केले की, विदर्भातील विकासाला गती देण्यासाठी मजबूत हवाई कनेक्टिव्हिटी अत्यंत आवश्यक आहे. अमरावतीसारख्या शहरांना देशातील प्रमुख आर्थिक आणि औद्योगिक केंद्रांशी थेट जोडले गेले तर प्रदेशातील उद्योग, पर्यटन, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राला मोठी चालना मिळेल. तसेच स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि प्रादेशिक असमतोल कमी करण्यासही मदत होईल.

केंद्र सरकारने उडान योजनेअंतर्गत अमरावती विमानतळाला प्राधान्य देऊन या प्रस्तावित मार्गांवर विमानसेवा सुरू करण्यासाठी तसेच नाईट लँडिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने आवश्यक पावले उचलावीत, अशी ठाम मागणी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी राज्यसभेत केली. त्यांच्या या मागणीमुळे विदर्भातील नागरिकांमध्ये आशा निर्माण झाली असून अमरावतीला भविष्यात अधिक सक्षम हवाई कनेक्टिव्हिटी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### दर्यापूर तालुक्यातील शाळा,

शिक्षक-कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून तालुक्यातील सर्व शासकीय- निमशासकीय शाळा,महाविद्यालये,कॉन्व्हेंट सकाळच्या सत्रात भरविण्याचा निर्णय तातडीने घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी प्रशासनाला कडक शब्दांत इशारा देत सांगितले की, वाढत्या उष्णतेमुळे दुर्लक्ष केल्यास उष्माघातामुळे एखाद्या विद्यार्थ्याच्या, शिक्षकाच्या किंवा कर्मचाऱ्याच्या जिवाला धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील.

निवेदन देतेवेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, शिवसेना जिल्हा समन्वयक प्रदीप वडतकर, शिवसेना विधानसभा समन्वयक बबनराव विल्हेकर, युवासेना तालुकाप्रमुख सागर गिरे, उपशहर प्रमुख दिपक बगाडे, उपशहर प्रमुख प्रशांत ठाकूर, अमोल अरबट, आशिष लायडे, मंगेश पारडे, राजू टापरे, वेदांत साखरे तसेच शिवसैनिक उपस्थित होते.

### दिव्यांग लाभार्थ्यांच्या मानधनात

आणि श्रावणबाळ योजनेतील १ हजार ९१३ अशा एकूण २३ हजार २७२ लाभार्थ्यांचे युडीआयडी कार्ड अद्याप आधारशी संलग्न नसल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर, कोणताही दिव्यांग लाभार्थी या वाढीव लाभापासून वंचित राहू नये, यासाठी लाभार्थ्यांनी आपले युडीआयडी कार्ड, आधार कार्ड आणि बँक पासबुकची झेरॉक्स संबंधित गावातील तलाठी कार्यालय किंवा तहसील कार्यालयातील संजय गांधी योजना विभागात २० मार्च २०२६ पूर्वी जमा करावे. तसेच, लाभार्थ्यांनी स्वतःहून युडीआयडी पोर्टलवर जाऊन आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. विहित मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न झाल्यास अनुदानात अडचणी येऊ शकतात, याची लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे.

### अमरावती महानगरपालिकेत

भर दिला. शहरातील अनेक मालमत्ताधारकांकडून मालमत्ता कर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्याने थकबाकीदारांविरुद्ध नियमानुसार कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. रुपये १ लाखांपेक्षा अधिक कर थकीत असलेल्या मालमत्ताधारकांना एमआरटीपी ॲक्टनुसार नोटिसा बजावण्यात आल्या असून अनधिकृत बांधकामांबाबत नगर रचना विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

मालमत्ता कर हा महानगरपालिकेच्या महसुलाचा प्रमुख स्त्रोत असून शहरातील विकासकामे, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते व सार्वजनिक आरोग्य सेवा सुरळीत ठेवण्यासाठी नियमित कर वसुली अत्यावश्यक असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

तसेच अधिकाऱ्यांना थकबाकीदारांची यादी अद्ययावत ठेवणे, नियमित संपर्क साधणे, नोटिसा देणे व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रलंबित थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्याचेही निर्देश देण्यात आले.

नागरिकांनी वेळेत मालमत्ता कर भरून महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्तांनी केले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, उपअभियंता प्रमोद इंगोले, आशिष अवसरे, विवेक देशमुख, जयंत काळमेघ, मंगेश कडू, श्रीरंग तायडे तसेच मालमत्ता कर वसुली विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### आरोपीच्या घरातून ६२ ग्रॅम

दोन पंच व राजपत्रित अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. जप्त केलेल्या एमडीची बाजारातील किंमत अंदाजे ९,३०,००० इतकी आहे. ९ मार्च रोजी नागपूरी गेट पोलीस ठाण्यात एनडीपीएस प्रकरणाची नोंद झाली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार गुन्हे शाखा या प्रकरणाचा तपास करत असून आतापर्यंत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या पोलीस कोठडी १४.०३.२०२६ पर्यंत मंजूर आहे. फरारी आरोपींचा शोध पोलिसांकडून कसोशीने सुरू असून, पुढील तपास सध्या चालू आहे.

### नवसारी परिसरातील स्वच्छता

महापौरांनी प्रभागाला भेट दिल्यानंतर स्थानिक परिस्थितीची सविस्तर पाहणी केली. या वेळी अमरावती महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, नगरसेवक चंदु खेडकर, गुड्डु धर्माळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव तसेच कोणार्क कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. महापौरांनी या सर्व अधिकाऱ्यांसमवेत परिसरातील नगरसेवक व नागरिकांच्या समस्या शांतपणे ऐकून घेतल्या आणि त्यावर तत्काळ उपाययोजना करण्याबाबत चर्चा केली.तपोवन ते नवसारी या परिसरातील कचरा व्यवस्थापनासाठी प्रभागातील घंटागाड्यांद्वारे कचरा एका ठिकाणी असलेल्या कंटेनरमध्ये टाकण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

या व्यवस्थेअंतर्गत विविध भागांतून गोळा करण्यात येणारा कचरा घंटागाड्यांद्वारे या कंटेनरपर्यंत आणला जातो. मात्र, प्रत्यक्ष पाहणीदरम्यान त्या ठिकाणी एकाच वेळी सुमारे पाच ते सहा घंटागाड्या उभ्या असल्याचे महापौरांच्या निदर्शनास आले. त्यामुळे कचरा टाकताना अडथळे निर्माण होत असल्याचे आणि कामकाजात विलंब होत असल्याचे स्पष्ट झाले.

या समस्येमुळे परिसरातील स्वच्छतेच्या कामावर परिणाम होत असल्याची माहिती स्थानिक नगरसेवकांनी महापौरांना दिली. तसेच कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करण्यासाठी अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली.

यापूर्वी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून या ठिकाणी एका रॅमची व्यवस्था करण्यात आली होती, ज्यामुळे घंटागाड्यांमधील कचरा कंटेनरमध्ये टाकणे सोयीचे होते. मात्र, वाढत्या कामाच्या प्रमाणामुळे एकाच रॅमवर ताण येत असल्याचे लक्षात घेऊन महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी तातडीने आणखी एका रॅमची व्यवस्था करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी महापौरांनी स्वच्छता व्यवस्थेबाबत अधिक काटेकोरपणे काम करण्याचे निर्देशही दिले. प्रभागातील नागरिकांना स्वच्छ व निरोगी वातावरण मिळावे यासाठी कचरा व्यवस्थापनाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि व्यवस्थित करण्यावर भर देण्याचे त्यांनी सांगितले. तसेच अशा समस्या उद्भवल्यास स्थानिक पातळीवर तत्काळ उपाययोजना करण्याचे आवाहनही त्यांनी अधिकाऱ्यांना केले.

### पदाधिकाऱ्यांना आता वाहनाच्या

दर महिन्याला वाहनाच्या खर्चासाठी देण्यात येणार असल्याचा प्रस्ताव बहुमताने पारित करण्यात आला. यामुळे महापौर सह पदाधिकाऱ्यांच्या वाहनाचे मेंटेनन्स आणि इतर सुविधेचा भार महानगरपालिकेवर राहणार नाही.

मनपाला फक्त ५० हजार व ३५ हजार रुपये खर्च पदाधिकाऱ्यांना दर महिन्याला द्यायचे आहे. यामध्ये पेट्रोल डिझेल, चालकाचे वेतन आणि वाहनांचे मेंटेनन्स सर्व आलेले आहे. तसेच पीएमई बस सेवा प्रकल्पासाठी महापारेषणने बडनेरा मध्ये ३३ केवी सब स्टेशन स्थापन करण्याला मंजुरी देण्यात आली आहे. या व्यतिरिक्त कंत्राटदार ते महाराष्ट्र मनपा प्रांतिक अधिनियम अंतर्गत अनुबंध करण्याचा निर्णय घेतला आहे. सबस्टेशन मुळे इलेक्ट्रॉनिक्स बसेसच्या चार्जिंगला सुविधा होणार आणि शहरातील प्रदूषणही कमी होणार आहे. फ्रेजरपुरा येथील सीट नंबर २९ प्लॉट नंबर ५ मध्ये सार्वजनिक भवन देण्यासंबंधी १६ मे २०२४ रोजी तात्कालीन आयुक्तांनी प्रस्तावाला मंजुरी दिली होती, पण यावर स्थायी समितीमध्ये कोणताही निर्णय झाला नाही. प्रशासनाच्या वतीने हा प्रस्ताव ठेवण्यात आला होता ज्याला तूर्तास स्थगिती देण्यात आली आहे.

### धावत्या ऑटोमध्ये लागली आग

सुदैवाने ऑटोमध्ये एकही प्रवासी नव्हता. ऑटो चालक नशेमध्ये असल्याचे प्रत्यक्ष दर्शीचे म्हणणे आहे. नागरिकांनी चालकाचे हात ओढून त्याला बाहेर काढले. यामुळे मोठा अनर्थ टळला. पाहता पाहता ऑटो जळून खाक झाला. घटनेची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी पोहोचले. अग्निशमन विभागाचे सुनील काकडे, केंद्र प्रमुख प्रेमानंद सोनकांबळे यांच्या आदेशानुसार कासम अहमद खान, राजेश लळे, अमोल साळुंखे, रोशन आलूडे, सागर माकोडे, विशाल शिरभाते यांनी आग नियंत्रणासाठी प्रयत्न केले.

### गळफास घेऊन आत्महत्या

रमेश पांडे यांना दारूचे व्यसन होते. ही बाब कुटुंबीयांच्या लक्षात येताच त्यांनी त्यांना खाली उतरवून जिल्हा रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

### विवाहितेचा छळ

अमरावती : वडरपुरा येथील तक्रारदार महिलेचे लग्न मध्यप्रदेशातील खरगौन येथे झाले होते. लग्नानंतर पती दारू पिऊन तिला शारीरिक व मानसिक त्रास देत होता. त्यामुळे ती माहेरी आली होती. मात्र पतीने समजूत काढून तिला पुन्हा सासरी नेले. त्यानंतरही शिवीगाळ व मारहाणीचा प्रकार सुरूच राहिला. अखेर पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## दिव्यांगांनी युडीआयडी व आधार कार्ड जमा करा -तहसीलदार पुष्पा सोळंके

**अंजनगाव सुर्जी /प्रतिनिधी-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (UDID) काढून घेऊन ते आधार कार्डशी संलग्न करणे आवश्यक करण्यात आले आहे. संबंधित कागदपत्रे वेळेत ग्राम महसूल अधिकारी किंवा महसूल सेवकाकडे जमा करावीत, असे आवाहन अंजनगाव सुर्जीच्या तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी केले आहे.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार विशेष सहाय्य योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांचे आधार कार्ड योजनांशी तीन महिन्यांच्या आत संलग्न करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

प्रोसेस क्र.८९९३
दि.:- ०२/०३/२०२६

**जाहिरनामा / सायटेशन**

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्रीमती, एन.सी.सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्रमांक ३१३/२०२६** **पुढील तारीख २७.०३.२०२६**

**श्रीमती. सुनंदा अधिक तीन विरुद निरंक**

**अर्जदार- 1. Sunanda Ramkrishana Bhugul** Age 75 yrs, Occu. Household
**2. Rajesh Ramkrishana Bhugul** Age 47 yrs, Occu. Labour,
**3. Harish Ramkrishana Bhugul** Age-45 yrs, Occu.- Labour All R/o. Mahavir Nagar, Near Hanuman Mandir, Badanera Road, Amravati, Tq. & Dist. Amravati.
**4. Anita Sunil Adhau**Age 50 yrs, Occu. Labour, R/o. Sidhi Vinayak Nagar, Near Gajanan Mandir, Amravati Tq. & Distt. Amravati.

**विरुध्द गैरअर्जदार निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत रामकृष्ण रामभाउ भुगुल** हे २९.०९.२०१९ रोजी अमरावती ता. जि अमरावती येथे मयत झाले. अर्जदार सुनंया अधिक तीन विरुध्द निरंक यानी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत मांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **श्रीमती. सुनंदा अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयताचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर मा जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदहु मुदतीत कोणी मोग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. ०२.०३.२०२६ रोजी माझ्या महीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले,

शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**वरीष्ठ स्तर अमरावती**

**सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी,अंजनगाव सुर्जी**

(जैन धार्मिक अल्पसंख्याक संस्था) द्वारा संचालित

**सीताबाई संगई हायस्कूल/कनिष्ठ महाविद्यालय**

(१००% अनुदानित) अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती

**पाहिजेत**

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | विषय | पदाची संख्या | गुगल फॉर्म लिंक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षण सेवक ( वर्ग 6 वी ते 8 वी करिता ) | B.A., B.Ed. T.E.T/C.T.E.T अनिवार्य | इंग्रजी | 2 पद | |
| 2 | शिक्षण सेवक ( वर्ग 6 वी ते 8 वी करिता ) | B.A., B.Ed. T.E.T/C.T.E.T अनिवार्य | मराठी | 1 पद | |
| 3 | शिक्षण सेवक ( वर्ग 6 वी ते 8 वी करिता ) | B.Sc., B.Ed. T.E.T/C.T.E.T अनिवार्य | गणित | 1 पद | |

1.वरील अनु.क्र. 1 व 2 चे पदाकरिता दि. 24/03/2026 मंगळवार रोजी सकाळी 10.00 वाजता तसेच अनु.क्र 3 चा पदाकरिता दि.25/03/2026 बुधवार रोजी सकाळी 10.00 वाजता प्रत्यक्ष मुलाखतीस संस्थेच्या कार्यालयात उपस्थित राहावे.

2. वरील पदासाठी पात्र उमेदवारांनी दिलेला QR Code स्कॅन करून आपला स्वहस्तलिखित विनंती अर्ज, मूळ कागदपत्रे, पासपोर्ट फोटो व आवश्यक प्रमाणपत्रे स्कॅन करून या फॉर्ममध्ये भरून सादर करावे.

3.उमेदवाराने मुलाखतीस स्वाक्षांकित, स्वलिखित अर्ज, मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह संस्थेच्या कार्यालयात वेळेवर उपस्थित राहावे.

4.सेवानिवृत्ती/पदोन्नती मुळे रिक्त झालेल्या पदावर सदर नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच संस्था जैन धार्मिक अल्पसंख्याक असल्याने आरक्षण/ बिंदू नामावली लागू नाही.

5.वयोमर्यादा व मानधन हे शासकीय नियमाप्रमाणे ग्राह्य असेल याची नोंद घ्यावी.

6. GCC-TBC / MSCIT / ICT व इतर संगणकीय विषयाचे ज्ञान असणाऱ्या उमेदवारास विशेष प्राधान्य देण्यात येईल.

अध्यक्ष
सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी
अंजनगाव सुर्जी

सचिव
शाळा समिती तथा प्राचार्य/मुख्याध्यापक
सी. सं. हायस्कूल/कमवि,अंजनगाव सुर्जी

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ गुरुवार, १२ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# ‘जनमाध्यम’चा दणका! रिठदमध्ये जुगार अड्डा व अवैध दारू विक्रीवर पोलिसांची धडक कारवाई

## सातत्याने उघडकीस आणलेल्या बातम्यांचा परिणाम ; दोन दिवसांत गुन्हे दाखल, मद्यसाठा व रोख रक्कम जप्त

**वाशिम :** रिसोड तालुक्यातील रिठद परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्डे आणि अवैध दारू विक्रीच्या धंद्यांवर अखेर पोलिसांना कारवाई करावी लागली. जनमाध्यमने सलग दोन दिवस धडक बातम्या प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधल्याने वाशिम ग्रामीण पोलिसांनी तातडीने धाड टाकत वरली मटका जुगार आणि अवैध दारू विक्रीप्रकरणी गुन्हे दाखल केले. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून जनमाध्यमच्या पाठपुराव्याची जोरदार चर्चा रंगली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १० मार्च २०२६ रोजी वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रिठद येथील अढळनगर परिसरात सुरू असलेल्या वरली मटका जुगारावर पोलिसांनी पंचासमक्ष छापा टाकला. या कारवाईत महादेव सयाजी धबडघाव (वय ४६, रा. रिठद) हा इसम १ ते १० आकड्यांवर पैशांची हार-जीत लावत जुगार खेळताना रंगेहात सापडला. पोलिसांनी त्याच्याकडून जुगाराच्या चिठ्ठ्या आणि ८७० रुपये रोख रक्कम जप्त केली. या प्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रविण राऊत यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान, ११ मार्च २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वाशिम ग्रामीण पोलिसांनी दुसरी धडक कारवाई करत संजय तायडे याला अवैधरित्या देशी-विदेशी दारू विक्री करताना पकडले. छाप्यामध्ये पोलिसांनी टँगो पंच ९० मिलीचे ७४ नग, भिंगरी संत्रा






९० मिलीचे ४५ नग, भिंगरी संत्रा १८० मिलीचे २५ नग, रॉयल स्टॅग डिलक्स व्हिस्की १८० मिलीचे ३ नग, ट्यूबॉर्ग प्रीमियम स्ट्राँग बिअर ६५० मिलीचे ९ नग आणि किंगफिशर स्ट्राँग बिअर ६५० मिलीचे ४ नग असा सुमारे १०,०९० रुपयांचा मद्यसाठा जप्त केला. याशिवाय आरोपीकडील विवो कंपनीचा सुमारे ७ हजार रुपयांचा मोबाईल देखील पोलिसांनी ताब्यात घेतला असून एकूण १७,०८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या दोन्ही कारवायांची नोंद वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रशांत अंभोरे करीत आहेत. सदर कारवाई प्रभारी अधिकारी एस. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने केली.

विशेष म्हणजे, रिठद परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांविषयी दै. जनमाध्यमने सातत्याने बातम्या प्रसिद्ध करत प्रशासनाला धारेवर धरले होते. या पाठपुराव्यानंतर अवघ्या दोन दिवसांत पोलिसांनी कारवाई केल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त करत ‘पत्रकारितेचा खरा प्रभाव दिसला’ अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत.

# प्रलंबित मागण्यांसाठी विमाशीचा एल्गार

## माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या (विमाशी) वतीने त्यांच्या प्रलंबित ४५ मागण्यांसाठी मंगळवार, १० मार्च रोजी माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. या आंदोलनात खासगी आणि स्थनिक स्वराज्य संस्था अंतर्गत संचालित प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विविध प्रश्न मांडण्यात आले.



खाजगी अनुदानित शाळा, विजा भज शाळा, आदिवासी आश्रम शाळा व इतर विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्यांकडे शिक्षण विभागाचे लक्ष वेधून त्या सोडविण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. यामध्ये टिईटी सक्ती रद्द करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, शिक्षकेतर पदभरती करणे, जिल्ह्यातील कॉपीप्रकरणी शिक्षकांवरील प्रस्तावित कारवाई मागे घेणे, आंदोलन दुपारी ३ ते ५ वाजेदरम्यान करण्यात आले. या आंदोलनात विमाशीचे विभागीय कार्यवाह प्रा. बाळासाहेब गोटे, म.रा. माध्यमिक शिक्षक महामंडळाचे विनायक उज्जैनकर, जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार, जिल्हा कार्यवाह कुलदिप बदर, कार्याध्यक्ष विजय भड, उपाध्यक्ष प्रा. मंगेश भोरे, गजानन वारकड, नंदकिशोर ढवळे, सहसचिव पी. टी. शिंदे, रघुनाथ चौधरी, अतुल मेहरे, रमेश घुगे, कोषाध्यक्ष गजानन इढोळे, गजानन गिते, प्रसिद्धी प्रमुख सुनिल कोंगे, जिल्हा संघटक, मंगेश आंबेकर, किशोर सदार, मनिकांत मिसाळ, न.चि. ढवळे, डी. एन. पाटिल, शेखर महाकाळ, संजय धामनकर, श्रावण किन्हीकर, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष विनोद नरवाडे, सचिव विजय शिंदे, उपाध्यक्ष साहेबराव जाधव, मिलींद कवर, उच्च माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष अमोल काळे, सचिव गोपाल गावंडे, उच्च माध्यमिक कृती समितीने प्रशांत कवर, व्हिज्युक्टाचे राजा वामन, शिक्षकेतर संघाचे जिल्हाध्यक्ष कैलास ढवळे, सचिव रामराव, कायंदे, कार्याध्यक्ष प्रफुल्ल काळे, किशोर उंडाळ, प्रवेश राठोड, आदींसह एकूण १४१ शिक्षक सहभागी झाले होते. विमाशीच्या वतीने या संदर्भात माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांना निवेदनही सादर करण्यात आले.

या निवेदनात पगारवाढ, नियुक्ती प्रक्रिया सुधारणा, कामाच्या अटी व शैक्षणिक सुविधांमध्ये सुधारणा आदि मुद्द्यांकडे माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांचे लक्ष वेधून शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करण्याची मागणी आंदोलनाद्वारे केली आहे.

# अवैध सावकारीवर सहकार विभागाची झडती

## रिसोड तालुक्यात दोन ठिकाणी कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■

रिसोड तालुक्यात अवैध सावकारी व्यवहाराबाबत सहकार विभागाकडे प्राप्त झालेल्या दोन तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अंतर्गत सहकार व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने झडतीची कारवाई केली.

सहकार विभागाकडे प्राप्त तक्रारींच्या चौकशीसाठी गैरअर्जदार सचिन गणराजआप्पा गांजरे, रा. छत्रपती शिवाजी चौक, रिसोड तसेच सुधाकर किसन टेकाळे, रा. चिखली, ता. रिसोड, जि. वाशिम यांच्या राहत्या घरी दि.६ मार्च २०२६ रोजी दोन स्वतंत्र पथकांमार्फत झडती घेण्यात आली. या झडतीदरम्यान पुढील चौकशीसाठी काही महत्त्वाचे दस्तऐवज ताब्यात घेण्यात आले असून



सदर प्रकरणी सावकारी कायद्याअंतर्गत पुढील चौकशी सुरू आहे.

ही कारवाई जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर आणि पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) गितेशचंद्र साबळे यांच्या नियंत्रणाखाली पार पडली.

या पथकात सहाय्यक निबंधक गजानन फाटे (रिसोड), आर. आर. सावंत (प्रशासन), एम. डी. कच्छवे (पथक प्रमुख), पी. टी. सरकटे (पथक प्रमुख), सहकार अधिकारी एस. एस. पाटील, जे. एस. सहारे, मुख्य लिपिक पी. आर. वाडेकर, सहाय्यक सहकार अधिकारी कु. आर. एन. शेख, कनिष्ठ लिपिक ए. ए. बेले, व्ही. आर. ढोबळे, ए. डी. वानखेडे तसेच पोलिस व महसूल विभागातील कर्मचारी सहभागी झाले होते.

दरम्यान जिल्ह्यातील अवैध सावकारी व्यवहारांविरोधात सहकार विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या प्रकरणांबाबत जिल्हा निबंधक (सावकारी) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम तसेच तालुक्यातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय येथे गोपनीय स्वरूपात तक्रारी नोंदवाव्यात. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, अशी माहिती सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था रिसोड यांनी दिली आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

दि. ०८ मार्च रोजी असलेल्या ‘जागतिक महिला दिनानिमित्त’ आमदार सईताई प्रकाशदादा डहाके यांच्या मार्गदर्शनात कारंजा, मानोरा शहरात व परिसरातील ग्रामीण भागात विविध कार्यक्रमाचे भाजपा परिवाराने यशस्वी आयोजन केले.

दरवर्षी ८ मार्च रोजी महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी आणि लिंग समानतेबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी ‘ जागतिक महिला दिन’ साजरा केला जातो. महिलांचे अधिकार, सक्षमीकरण आणि त्यांना समान हक्क मिळावेत, या उद्देशाने हा दिवस साजरा होतो. या कार्यक्रमांतर्गत आरोग्य शिबिरे, वक्तृत्व स्पर्धा, व्याख्याने, रांगोळी स्पर्धा, एकपात्री प्रयोग तसेच स्त्री सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये विविध शासकीय विभागातील महिला अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थिनी तसेच परिसरातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. कार्यक्रम मालिकेची सुरुवात ४ मार्च रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, पोहा येथे आयोजित आरोग्य शिबिराने झाली. या शिबिरामध्ये महिलांची आरोग्य तपासणी, सल्ला व मार्गदर्शन करण्यात आले.

## शाळांना ग्रंथसाहित्य भेट

**अकोला :** महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळातर्फे सामाजिक उत्तरदायित्व निधीतून जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १० शाळांना ग्रंथालयांसाठी विविध विषयांची पुस्तके आणि दर्जेदार कपाट अशा वाचन साहित्याचे वितरण जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते करण्यात आले.

## जागतिक महिला दिनानिमित्त मनसोक्त आनंद मेळावा



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

नगर परिषद मंगरूळपीर, महिला व बालकल्याण समिती आणि राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (ऌथ्श्) यांच्या संयुक्त तत्वावधानात आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त मनसोक्त आनंद मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि महिला बचत गटांच्या विविध पदार्थ वस्तू विक्रीचा स्टॉल्सचा समावेश होता

कार्यक्रमाला नगराध्यक्ष अशोकभाऊ परळीकर, बालकल्याण सभापती लता चितलांगे, उपाध्यक्ष अनिल गावंडे आणि गटनेते गणेशभाऊ खोडे , घटनेच्या किरण परळीकर, माजी नगरसेविका रेखा गावंडे, वर्षा परळीकर, आणि इतर मान्यवर उपस्थित होते. सदर मेळ्यामध्ये शहर स्तरसंघाच्या पदाधिकारी आशाताई वानखेडे, सरिता पुरोहित, रंजना बोरकर, प्रणिता देशमुख राधिका, वाघ, पुस्पा काकडे इत्यादी महिलांनी सक्रिय सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले कार्यक्रमाचे संचालन छंदा ठाकूर तर आभार व प्रास्ताविक सहायक प्रकल्प अधिकारी राहुल भगत ,कुलदीप इंझलकर यांनी केले. सदर कार्यक्रम मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शकांनी घेण्यात आला.

# अंडर बायपासचे रस्ता दुभाजक अपघाताला निमंत्रण



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगांव ते वाशीम रोडवर अरूण बाबा इंगोले यांच्या समाधी जवळच्या अंडर पास रोडवरचे रस्ता दुभाजक कमी लांबी मुळे अपघाताला निमंत्रण देत आहे.

या रस्त्यावर डाव्याबाजूने असलेले गतिरोधक चुकविण्यासाठी वाहन चालक दुसऱ्या बाजूने कमी लांबीच्या रस्ता दुभाजकावरून विरूद्ध दिशेने वाहन नेतात.या ठिकाणी कमी लांबीचे रस्ता दुभाजक वाहन चालकांसाठी अत्यंत धोकादायक ठरत आहे.एखाद्या दिवशी याच ठिकाणी मोठा अपघात होऊन त्यात जिवीत हाणी होण्याची शक्यता आहे.तेव्हा संबंधित विभागाने रस्ता दुभाजकाची लांबी मालेगावच्या रस्त्यापर्यंत वाढविण्याची मागणी वाहनचालक करीत आहेत.

या ठिकाणी वाहन चालक हे गतिरोधक चुकविण्यासाठी उजव्या चुकीच्या दिशेने वाहन चालवतात. या रस्ता दुभाजकाची लांबी कमी आहे.त्यामुळे वाहन चालक विरुद्ध दिशेने वाहन घेतात.व अनेक वेळा सध्या किरकोळ अपघात होत आहेत. एखाद्या दिवशी मोठा अपघात होऊन त्यात जीवित हानी होण्याची शक्यता वाढली आहे.

*डोणगांव, मालेगाव ते वाशिम या रस्त्यावरून मी दररोज ये-जा करतो . त्यामुळे अनेक वेळा किरकोळ अपघात होताना दिसून येतात.तर काही मोठे अपघात होता, होता टळत आहेत. संबंधित विभागाने याची गांभीर्याने दखल घेऊन रस्ता दुभाजकाची लांबी मालेगावच्या रस्त्याच्या उतारा पर्यंत वाढवावी. जेणेकरून वाहन चालक विरुद्ध दिशेने वाहन चालवणार नाहीत.तसेच दोन्ही बाजूंनी गतिरोधक टाकण्यात यावे.*

***प्रा.किशोरकुमार खंडारे,***
*डोणगाव.*

### जाहीर सूचना

आम जनतेस व वित्तीय संस्थेस या जाहीर सूचनेद्वारे सूचित करण्यात येते की, गोपाल अशोकराव टोहरे, रा. नुराबाद, ता. तेल्हारा, जी. अकोला यांनी ए यू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड शाखा अकोला येथे खालील वर्णनाची मालमत्ता गहाण ठेऊन कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला आहे त्या मालमत्तेचे वर्णन मौजा- नुराबाद, ता. तेल्हारा, जी. अकोला येथील सर्वे क्र. ८१ (जुना ६५/१), प्लॉट क्र. १२, क्षेत्रफळ २४०० चौ. फूट (२२३ चौ.मी.) यावर असलेल्या बांधकामसह. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, गहाण, बोजा, वारसहक्क, जप्ती, कर्ज, ताबा, सरकारी, निमसरकारी वा वित्तीय संस्थेचे कर्ज किंवा कुठल्याही प्रकारचा अधिकार, हक्क असल्यास हि नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत पूर्ण लेखी पुराव्यासह खालील पत्त्यावर संपर्क साधून आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरूपाचा आक्षेप नाही असे समजून ए यू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड हे वरील मालमत्ता गहाण ठेऊन गोपाल अशोकराव टोहरे यांना कर्जाची रक्कम वितरित करतील वरील मुदतीनंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

अमरावती
दिनांक : ११/०३/२०२६

**(पंकज ठाकरे, अधिवक्ता)**
कार्यालय - ‘श्री’, भागवत नगर,
साई नगर, अमरावती.
मो. क्र. ९६६५७८६६७६

# जखमी नागावर शस्त्रक्रिया ; जिल्ह्यातील पहिलीच घटना

## सर्पमित्र मयुरेश मानधने यांच्या तत्परतेने मिळाले जीवदान



असाच एक अनोखा प्रसंग दि. ७ मार्च रोजी हिंगोली रोडवरील गुरुद्वार मागील शेतात दुपारी

**पप्पु घुगे**

**वाशिम :** शहरात किंवा ग्रामीण भागात साप दिसला की सर्वप्रथम सर्पमित्र मयुरेश मानधणे यांना बोलावणे धाडले जाते. साप विषारी असो वा बिनविषारी, ते निडरपणे पुढे सरसावत सापाला सुरक्षितरीत्या पकडून त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडतात. गेल्या दहा वर्षांत त्यांनी अनेक विषारी व बिनविषारी साप पकडून त्यांना जीवदान दिले आहे.

१२ वाजता बोराळा हिस्से येथे घडला. रामू उंडाळ यांच्या शेतात ट्रॅक्टरने नांगरणी सुरू असताना शेतातील बिळातून प्रणयक्रीडेत असलेले नाग-नागिण बाहेर आले. त्यावेळी नांगराच्या फाळाला अडकून नागिणीचा जागीच मृत्यू झाला, तर नाग गंभीर जखमी अवस्थेत आढळला.

यावेळी धनराज मुठाळ यांनी सर्पमित्र मयुरेश मानधणे यांना तातडीने फोन करून बोलावले. मानधणे यांनी कोणताही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. जखमी नागाच्या पोटातील आतडे बाहेर आलेले होते. त्यांनी तात्काळ हळद टाकून प्राथमिक उपचार केले व त्यानंतर सापाला वाशिम येथील जिल्हा पशुसंवर्धन रुग्णालयात दाखल केले.

यानंतर कारंजा येथील स्पेशालिस्ट सर्प तज्ञ डॉ. राजा गोरे, गणेश फुलउंबरकर, मालेगाव तालुक्यातील डही येथील सर्पमित्र गोपाल बोरचाटे तसेच विष्णू कुंभार यांनी सुमारे एक तास शर्यतीचे प्रयत्न करून नागावर शस्त्रक्रिया केली. त्या नागाचे ऑपरेशन करून पोटातील आतडे आतमध्ये ठेवत सुमारे २५ ते ३० टाके घालण्यात आले. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे नागाला जीवदान मिळाले असून त्याला नंतर सुरक्षित जंगलात सोडण्यात आले.

वाशिम जिल्ह्यात नागावर करण्यात आलेली ही पहिलीच शस्त्रक्रिया असल्याची माहिती डॉ. राजा गोरे यांनी दिली.



सर्पमित्र मयुरेश मानधणे हे सापांसह इतर मुक्या प्राण्यांना संकटातून वाचवण्याचे निस्वार्थी कार्य सातत्याने करत आहेत. त्यांच्या या कार्याचे जिल्ह्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

या संदर्भात संपर्क साधला असता, ‘मी हे काम प्रसिद्धीसाठी किंवा नावासाठी करत नाही,’ असे सांगत त्यांनी पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य देण्याची गरज व्यक्त केली. ग्रामीण भागात सापांविषयी असलेल्या अंधश्रद्धा व गैरसमज दूर करण्यासाठी त्यांनी जनजागृती मोहिमाही राबवल्या आहेत. जखमी सापांवर उपचार करून त्यांना सुरक्षित अधिवासात सोडण्याचे कार्यही ते सातत्याने करत आहेत.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १०४ ■ गुरुवार, १२ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## गॅसपेक्षा अफवांचा धूर जास्त; ग्राहक मात्र गोंधळात

# गॅस साठेबाजांवर प्रशासनाचा शिकंजा; ९ पथके सज्ज

### -एस्मा लागू होताच जिल्हा प्रशासनाची धडक कारवाईची तयारी; सिलेंडर टंचाईच्या पार्श्वभूमीवर हालचालींना वेग

**वर्धा जनमाध्यम :** इराण-इस्राईल-अमेरिका संघर्षामुळे जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला असून त्याचे पडसाद आता देशभरासह वर्धा जिल्ह्यातही उमटू लागले आहेत. व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा तात्पुरता बंद झाल्याने आणि घरगुती सिलिंडरच्या दरात सुमारे ६० रुपयांची वाढ झाल्याने जिल्ह्यात टंचाईची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मंगळवारी एस्मा कायदा लागू केला असून त्यानंतर जिल्हा प्रशासनही सतर्क झाले आहे.

जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या मार्गदर्शनाखाली गॅस सिलिंडरची साठेबाजी व काळाबाजार रोखण्यासाठी पुरवठा विभागाच्या नेतृत्वात जिल्ह्यात एकूण ९ विशेष पथके गठीत करण्यात आली आहेत. यात आठ तालुक्यांसाठी आठ पथके आणि जिल्हास्तरीय एक पथक असे नियोजन करण्यात आले आहे. ही पथके अचानक तपासणी करून साठेबाजांवर कठोर कारवाई करणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. वर्धा जिल्ह्यात इंडियन ऑईल, एचपीसीएल आणि बीपीसीएल या तीन प्रमुख कंपन्यांमार्फत गॅस सिलिंडरचा पुरवठा केला जातो. जिल्ह्यात सुमारे ३३ अधिकृत गॅस एजन्सी कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून व्यावसायिक आणि घरगुती सिलिंडरचा पुरवठा होतो. मात्र आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे पुरवठ्यावर परिणाम झाल्याने कृत्रिम टंचाई निर्माण होण्याची शक्यता प्रशासनाला वाटत आहे. त्यामुळे संभाव्य गैरप्रकार टाळण्यासाठी प्रशासनाने आधीच हालचालींना वेग दिला आहे.

दरम्यान, जिल्ह्यात सध्या व्यावसायिक गॅस सिलिंडरचा किती साठा उपलब्ध आहे याची सविस्तर माहिती तालुका प्रशासनाकडून संकलित केली जात आहे. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ नये म्हणून पुरवठा विभाग, तहसील प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांना सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.







■ जिल्ह्यात सध्या पेट्रोल व डिझेलचा मुबलक साठा आहे. गॅस सिलिंडरची साठेबाजी व काळाबाजार रोखण्यासाठी आठ तालुक्यांचे आठ आणि जिल्हास्तरीय एक असे नऊ पथक तयार करण्यात आले आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. कुठे साठेबाजी होत असल्यास तत्काळ प्रशासनाला माहिती द्यावी.

**राजू रणवीर,** प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्धा

### ■ नागरिकांकडूनच काळाबाजाराची चर्चा

गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण होताच काही ठिकाणी काळाबाजार सुरू झाल्याची चर्चा आहे. ९६५ रुपयांचा घरगुती सिलिंडर १५०० रुपयांना विकला जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. ओटीपीशिवाय सिलिंडर मिळत नसल्याने काही जण स्वतःकडे असलेला सिलिंडर इतरांना जादा दराने देत असल्याचे बोलले जात आहे. गॅस कंपन्यांनी एजन्सी स्तरावर काळाबाजार रोखला असला तरी काही नागरिकच या प्रकारात सहभागी होत असल्याची चर्चा आहे.

### ■ व्यावसायिकांना घरगुती सिलिंडरचा आधार

व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा तात्पुरता बंद झाल्याने हॉटेल, केटरिंग, चहाच्या टपऱ्या यांना घरगुती सिलिंडरचा आधार घ्यावा लागत आहे. अनेक केटरिंग व्यावसायिकांनी २०-२५ दिवसांपूर्वी दिलेल्या ऑर्डर रद्द करण्याची वेळ आली असल्याची खंत व्यक्त केली आहे.

■ **एकूण गॅस सिलिंडरधारक :** ३,९६,५१९, जिल्ह्यातील गॅस एजन्सी : ३३, साठेबाजी रोखण्यासाठी पथके : ९

### ■ सिलेंडर टंचाईचा फटका; शहरातील चहा टपऱ्यांवर कुलूप

वर्धा शहरात सध्या गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवत असून त्याचा थेट फटका छोट्या व्यावसायिकांना बसू लागला आहे. गॅस उपलब्ध होत नसल्याने शहरातील अनेक छोटे-मोठे हॉटेल तसेच चहा टपऱ्या अडचणीत सापडल्या आहेत. काही ठिकाणी सिलेंडर मिळत नसल्याने टपरी चालकांनी तात्पुरते आपले व्यवसाय बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. चहा टपरी हा अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधार असतानाच सिलेंडरच्या अभावामुळे त्यांची आर्थिक कोंडी होत आहे. व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने काही हॉटेल चालक घरगुती सिलेंडरचा वापर करीत असल्याचेही दिसून येत आहे. त्यामुळे घरगुती सिलेंडरची मागणी वाढून टंचाई अधिक तीव्र होत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

## रिधोरा येथील पंचधारा जलाशयात १७ वर्षीय युवतीची आत्महत्या

### -वर्ध्यातील काजल रोकडेचा मृत्यू; सेलू पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद

**सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील रिधोरा येथील पंचधारा जलाशयात उडी घेऊन एका १७ वर्षीय युवतीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (११ मार्च) दुपारी उघडकीस आली. या प्रकरणी सेलू पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेलेस्पष्ट

मृत युवतीचे नाव कु. काजल गजानन रोकडे (वय १७, रा. गजानन नगर, आर्वी नाका, वर्धा) असे आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काजल मंगळवारी वर्धा येथील घरातून बाहेर पडली होती.

मात्र ती परत न आल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध सुरू केला. दरम्यान तिच्या मोबाईलचे लोकेशन तपासल्यावर ते सेलू तालुक्यातील रिधोरा येथील पंचधारा जलाशय परिसरात असल्याचे दिसून आले.

कुटुंबीयांनी तातडीने रिधोरा येथे धाव घेतली. जलाशय परिसरात पाहणी केली असता काजलची पांढऱ्या रंगाची मोपेड, चपला, पर्स आणि मोबाईल आढळून आले. त्यामुळे अनर्थाची शक्यता व्यक्त करण्यात येत होती. याबाबत कुटुंबीयांनी सेलू पोलिसांना माहिती दिली.



माहिती मिळताच सेलू पोलीस ठाण्याचे ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचून शोधमोहीम सुरू केली.

बोटीच्या साहाय्याने जलाशयात शोध घेत असताना बुधवारी दुपारी सुमारे २.४५ वाजताच्या सुमारास युवतीचा मृतदेह पाण्यात आढळून आला.

पोलिसांनी मृतदेह बाहेर काढून पंचनामा केला असून उत्तरीय तपासणीसाठी तो सेलू ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. दरम्यान, काजलने वर्धा येथून रिधोरा येथे येऊन आत्महत्या का केली, याचा तपास सेलू पोलीस करीत आहेत.

## प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षकांचे धरणे आंदोलन

**वर्धा जनमाध्यम :** शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, जिल्हा वर्धा यांच्या वतीने जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनातून अनेक प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली.



शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, टीईटीची अट रद्द करावी तसेच संच मान्यतेसंदर्भातील १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करावा, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना १०-२०-३० वर्षांची आश्वासित प्रगती वेतन योजना लागू करणे, अंशतः अनुदानित शाळांना तात्काळ अनुदान देणे व शिक्षकांची रिक्त पदे भरणे, या मागण्याही करण्यात आल्या. याशिवाय शिक्षकांना अशैक्षणिक कामातून मुक्त करणे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शालार्थ आयडी देणे, थकीत वेतन व वैद्यकीय देयके मंजूर करणे तसेच वरिष्ठ व निवड श्रेणीची प्रकरणे निकाली काढावीत, अशी मागणी करण्यात आली. विद्यार्थी हित लक्षात घेऊन कमी पटसंख्येच्या शाळा बंद करू नयेत, अशीही भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

या आंदोलनाचे नेतृत्व शिक्षक आमदार सुधाकर अडबाले, जयप्रकाश थोटे, विष्णू इटनकर तसेच माजी शिक्षक आमदार व्ही. यू. डायगव्हाणे यांनी केले. जिल्ह्यातील मोठ्या संख्येने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले होते.

## सायखेडा पुलासाठी गडकरींकडे मागणी

### -खासदार अमर काळे यांची दिल्लीत भेट; सकारात्मक प्रतिसाद

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी तालुक्यातील सायखेडा येथे वर्धा नदीवर पूल बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान ११ मार्च रोजी दिल्ली येथे झालेल्या भेटीत त्यांनी याबाबत चर्चा केली.



सायखेडा हे गाव वर्धा जिल्ह्यात असून अमरावती जिल्ह्याच्या सीमेवर आहे. मात्र मध्ये वर्धा नदी असल्याने सायखेडा व परिसरातील १० ते १५ गावांतील नागरिकांना अमरावतीला जाण्यासाठी तब्बल २० ते २५ किलोमीटरचा फेरा मारावा लागतो. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

गावकऱ्यांच्या मागणीची दखल घेत खासदार काळे यांनी गडकरी यांच्याकडे पूल उभारणीसाठी निधी मंजूर करण्याची विनंती केली. यावर मंत्री गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

## जंगलातील आगीने फळबागा भस्मसात; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

### अज्ञाताने लावलेली आग शेतापर्यंत धावली; फळझाडे, ड्रीप सिंचन व्यवस्था जळून खाक

**विरुळ (आकाजी) जनमाध्यम :** विरुळ परिसरातील मौजा हमदापूर शिवारात अज्ञात व्यक्तींनी जंगलाला लावलेली आग शेतापर्यंत पोहोचल्याने दोन शेतकऱ्यांच्या फळबागांचे मोठे नुकसान झाले. या आगीत फळझाडांसह ड्रीप सिंचन व्यवस्था व पाईप जळून खाक झाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, जंगलात लागलेली आग सुरुवातीला झाडाझुडपांत पसरली. उन्हाळ्याच्या कडाक्यामुळे आणि वाऱ्याच्या वेगामुळे आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले. ही आग बघता बघता शेजारील शेतशिवारापर्यंत पोहोचली. आगीच्या विळख्यात ललिता राजेश शिरभाते व संतोष सुधाकर टाके यांच्या शेतातील फळबाग सापडली. या आगीत अनेक फळझाडे जळून राख झाली. याशिवाय शेतात बसवलेली ड्रीप सिंचन व्यवस्था, प्लास्टिक पाईप व इतर साहित्यही आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून त्यांच्या हंगामी उत्पन्नावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाला कळविण्यात आले. तलाठ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून नुकसानीचा अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्यात येणार असल्याचे सांगितले. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाकडून तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. तसेच जंगलात आग लावणाऱ्या अज्ञात व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.

## दारूच्या नशेत बेधुंद चालक पोलिसांच्या जाळ्यात

### २२ बेकायदेशीर बुलेट सायलेन्सर जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात वाहतूक शाखेने बुधवारी धडक कारवाई करत दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या एका दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल केला. तसेच मोठ्या आवाजाचे बेकायदेशीर सायलेन्सर लावून ध्वनीप्रदूषण करणाऱ्या २२ मोटारसायकलींवर कारवाई करून त्यांचे सायलेन्सर जप्त करण्यात आले.



पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या आदेशानुसार वाहतूक नियंत्रण शाखेने बजाज चौक येथे सकाळी ११ वाजता नाकाबंदी व वाहन तपासणी मोहीम राबवली. यावेळी एक दुचाकीस्वार भरधाव वेगाने येताना दिसला. पोलिसांनी त्याला थांबवून चौकशी केली असता त्याचे नाव अक्षय कुळसंगे (वय २४, रा. आनंदनगर, वर्धा) असे असल्याचे समोर आले.

वाहतूक अंमलदार एएसआय मुन्ना तिवारी यांनी विचारपूस करताना त्याच्या तोंडातून दारूचा वास येत असल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासणीत त्याच्या रक्तात ३३१ एमजी अल्कोहोलचे प्रमाण आढळले. त्यामुळे मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये वर्धा शहर पोलिस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याची एमएच ३२ एयू ८१६० क्रमांकाची मोटारसायकल जप्त करण्यात आली. दरम्यान, मोहिमेदरम्यान मोठ्या आवाजाचे बनावट किंवा मॉडिफाईड सायलेन्सर लावून ध्वनीप्रदूषण करणाऱ्या २२ मोटारसायकल चालकांवर मोटार वाहन कायदा कलम १९८ व १९४ (एफ) अन्वये कारवाई करण्यात आली. त्यांचे २२ सायलेन्सर वाहतूक पोलिसांनी जप्त केले. ही कारवाई पोलीस निरीक्षक विलास पाटील, एएसआय संजय भांडेकर, एएसआय सय्यद, हेडकॉन्स्टेबल दिलीप कामडी, प्रदीप कोहळे, महिला पोलीस हवालदार रोशनी करोती व वाहतूक शाखेच्या पथकाने केली. वाहनचालकांनी दारू पिऊन वाहन चालवू नये व बनावट सायलेन्सरचा वापर टाळावा, अन्यथा कठोर कारवाई होईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## रोजगार बंद, पोटावर लाथ

# कारंज्यात मांस विक्रेत्यांचा साखळी उपोषणातून एल्गार

### पर्यायी जागा द्या, नाहीतर जुन्याच ठिकाणी व्यवसाय करू द्या; नगरपंचायत कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** नागरिकांच्या तक्रारींचा आधार घेत नगरपंचायत प्रशासनाने शहरातील सर्विस रोडलगत सुरू असलेले मांस विक्री केंद्र अचानक बंद करण्याचा आदेश दिला आणि अनेक छोट्या व्यावसायिकांच्या पोटावर अक्षरशः लाथ बसली. मागील सहा दिवसांपासून व्यवसाय ठप्प झाल्याने संतप्त मांस विक्रेत्यांनी आता साखळी उपोषणाचा एल्गार पुकारत नगरपंचायत कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. पर्यायी व सुविधायुक्त जागा उपलब्ध करून द्या, अन्यथा जुन्याच ठिकाणी व्यवसाय करण्याची परवानगी द्या, अशी ठाम मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.




कारंजा शहरातील सर्विस रोडलगत अनेक वर्षांपासून मांस विक्री केंद्र सुरू होते. या ठिकाणी मांस विक्रीमुळे परिसरात भटक्या श्वानांचा वावर वाढत असल्याची तक्रार काही नागरिकांनी नगरपंचायतीकडे केली. तसेच आरोग्य व सुरक्षेच्या कारणावरून हे केंद्र अन्यत्र स्थलांतरित करण्याची मागणी करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर ५ मार्च रोजी काही नागरिकांनी नगरपंचायत कार्यालयासमोर उपोषण केले. त्यानंतर प्रशासनाने तातडीने कारवाई करत संबंधित मांस विक्री केंद्र बंद करण्याची नोटीस बजावली. त्या दिवसापासून मांस विक्रेत्यांचा व्यवसाय पूर्णपणे बंद पडला आहे. अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

नगरपंचायतीने आमच्या अडचणी समजून घेत योग्य पर्यायी जागा द्यावी. तोपर्यंत आम्हाला जुन्या ठिकाणी व्यवसाय सुरू ठेवण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

दरम्यान, नगरपंचायत प्रशासनाने मात्र स्वतःच्या मालकीची पर्यायी जागा उपलब्ध नसल्याचे सांगत हात झटकले आहेत. त्यामुळे छोट्या व्यावसायिकांच्या रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर आला असून, या आंदोलनातून पुढे काय तोडगा निघणार याकडे कारंजा शहराचे लक्ष लागले आहे.

मटन मार्केटसाठी पर्यायी जागा व आवश्यक सुविधा उपलब्ध होईपर्यंत आम्हाला जुन्याच जागेवर व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी.

**उमेश दुर्गे, मांस विक्रेता, कारंजा**

नगरपंचायतीकडे स्वतःच्या मालकीची पर्यायी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे सध्या व्यवसायिकांना दुसरी जागा सुचविणे शक्य नाही.

**विक्रम शिर्के,** मुख्याधिकारी, नगरपंचायत कारंजा

## वाघाची दहशत':महिनाभरात दहा जनावरे ठार

### शेतकऱ्यांमध्ये भीतीचे सावट; वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील अप्पर वर्धा धरणाच्या पायथ्याशी वसलेल्या बेलोरा (ख.) गावात वाघाच्या हल्ल्यांची मालिका सुरूच असून गेल्या तीस दिवसांत तब्बल दहा जनावरे ठार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे गावातील शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वाघाचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

बेलोरा (ख.) हे गाव घनदाट जंगलालगत वसलेले आहे. गावाशेजारी अनेक शेतकऱ्यांचे गोठे असून तेथे दुधाळ जनावरे बांधून शेतकरी घरी जातात. मात्र रात्रीच्या वेळी जंगलातून वाघ येत असल्याने या जनावरांवर हल्ले होत आहेत. गेल्या महिनाभरात वाघाने हल्ला करून दहा गाई ठार केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

विनोद जाणे, विनोद बहुरूपी व धनराज गडलिंग यांच्या मालकीच्या गायी वाघाने फस्त केल्या आहेत. याआधीही एका गोऱ्ह्यावर हल्ला करून त्याला ठार केल्याची घटना घडली होती. या सर्व घटनांची तक्रार वनविभागाकडे देण्यात आली असून विभागाने पंचनामा करून नुकसानभरपाई दिली आहे. मात्र वाघाचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यात आलेला नाही. दररोज वाढत असलेल्या या घटनांमुळे शेतकरी वर्गात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.

## ओव्हरब्रिजवर भीषण अपघात; बोरगावच्या युवकाचा जागीच मृत्यू

**सेलू जनमाध्यम :** नागपूर–वर्धा राष्ट्रीय मार्गावर आसोला गावाजवळील धवरपेठ ओव्हरब्रिजवर बुधवारी (ता.११) सायंकाळी साडेसातच्या सुमारास भीषण दुचाकी अपघात घडून एका युवकाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात काही काळ हळहळ व्यक्त करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, बोरगाव (हि) येथील युवक जितू सावरकर हे दुचाकीने नागपूर–वर्धा रोडने जात असताना आसोला गावाजवळील धवरपेठ ओव्हरब्रिजवर त्यांचा भीषण अपघात झाला.



अपघात इतका गंभीर होता की, त्यात त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

घटनेनंतर काही काळ रस्त्यावर नागरिकांची गर्दी झाली होती. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पुढील प्रक्रिया सुरू केली असून या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे बोरगाव (हि.) परिसरात शोककळा पसरली आहे.

# महाराष्ट्र हे देशातील पहिले ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था असलेले राज्य होणार-मुख्यमंत्री

◆ महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशात सर्वात मजबूत
◆ 2029 पर्यंत ट्रिलियन डालरचे लक्ष्य



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या विकासासाठी आर्थिक शिस्त राखणे गरजेचे आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक वाढविण्यात आली आहे. महाराष्ट्र देशात आर्थिकदृष्ट्या मजबूत राज्य म्हणून उभे राहत असल्याचे सांगून पुढील काही वर्षांत महाराष्ट्र हे देशातील पहिले ट्रिलियन डालर अर्थव्यवस्था असलेले राज्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला मुख्यमंत्री फडणवीस विधानसभेत उत्तर देताना बोलत होते. अर्थसंकल्पावरील चर्चेत सुमारे ८४ सदस्यांनी सहभाग घेतला होता. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याची आर्थिक स्थिती, कर्जाचे प्रमाण, सिंचन, वीज, उद्योग, पायाभूत सुविधा, जलजीवन मिशन, प्रधानमंत्री आवास योजना आदी विषयांवर सविस्तर माहिती दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी भाषणाच्या सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त त्यांना अभिवादन केले. तसेच अर्थसंकल्प सादर केलेल्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज जयंती असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राज्याला पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. अडचणी असूनही आर्थिक शिस्त राखून विकास साधण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे. उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांनी सातत्याने आर्थिक शिस्त पाळली. त्यांच्याप्रमाणेच या अर्थसंकल्पात आर्थिक शिस्त पाळण्याचा प्रयत्न केला आहे. राज्याच्या प्रगतीसाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वेगाने वाढतेय-**राज्याची अर्थव्यवस्था झपाट्याने विस्तारत सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याने ऑस्ट्रिया, थायलंड, नार्वे, फिलिपाईन्स, व्हिएतनाम आणि बांगलादेश या देशांच्या अर्थव्यवस्थांनाही मागे टाकले आहे. पुढील दोन-तीन वर्षांत संयुक्त अरब अमिराती आणि सिंगापूरलाही महाराष्ट्र मागे टाकू शकतो, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०१३-१४ मध्ये राज्याचे सकल राज्य उत्पादन (जीएसडीपी) सुमारे १६ लाख कोटी रुपये होता. गेल्या दहा वर्षांत तो वाढून ५१ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. स्थिर किमतीवर राज्याचा विकासदर ७.९ टक्के तर चालू किमतीवर १०.४ टक्के आहे. दरडोई उत्पन्न ३,१७,८०० रुपयांवरून ३,४७,९०३ रुपयांपर्यंत वाढले आहे. देशाच्या लोकसंख्येत महाराष्ट्राचा वाटा ९.५ टक्के असला तरी देशाच्या जीडीपीमध्ये राज्याचा वाटा १४.३ टक्के आहे. परकीय गुंतवणूक, तेलाव्यतिरिक्त निर्यात, स्टार्टअप्स, युनिकार्न, बँक ठेवी, बँक कर्ज वितरण आणि जीएसटी संकलनात महाराष्ट्र देशात अव्वल असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच फारेस्ट ऑफ इंडिया अहवालानुसार वृक्षआच्छादनातही राज्य पहिल्या क्रमांकावर असल्याचे त्यांनी नमूद केले.

**इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राची वित्तीय स्थिती अधिक सक्षम**

राज्याच्या कर्जाबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, उत्पन्नाच्या तुलनेत कर्जाचा विचार केला पाहिजे. २०१३-१४ मध्ये राज्याचे उत्पन्न १६ लाख कोटी रुपये असताना कर्ज सुमारे ३ लाख कोटी रुपये होते. आता उत्पन्न ५१ लाख कोटी रुपयांवर गेले असून कर्ज ९.३२ लाख कोटी रुपये आहे. राज्याचा डेट टू जीडीपी गुणोत्तर सुमारे १८.२ टक्के असून ते २५ टक्क्यांच्या मर्यादेपेक्षा खूपच कमी आहे. गुजरात (१५.३S) आणि ओडिशा (१३.१S) सोडल्यास इतर अनेक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राची वित्तीय स्थिती अधिक सक्षम आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, पंजाब, केरळ, पश्चिम बंगाल यांसारख्या राज्यांमध्ये हे प्रमाण ३० ते ४६ टक्क्यांपर्यंत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**केंद्राकडून मिळणा-या निधीत मोठी वाढ**

केंद्राच्या करांमधून मिळणारा महाराष्ट्राचा हिस्सा २०१३-१४ मध्ये १६,५८८ कोटी रुपये होता. तो वाढून २०२५-२६ मध्ये ८७,९०३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. सहाय्यक अनुदानेही १३,२४१ कोटी रुपयांवरून सुमारे ६८ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढली आहेत. वित्त आयोगाकडे केलेल्या मागणीमुळे राज्याला सुमारे ९० हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त फायदा होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.राज्याची महसुली प्राप्तीही दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ती १.५५ लाख कोटी रुपयांवरून सुमारे ६.१६ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**आर्थिक शिस्त कायम राखण्याचा प्रयत्न-**मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राजकोषीय तूट ३ टक्क्यांच्या मर्यादेत ठेवणे आवश्यक असते. महाराष्ट्रात ती २.७८ टक्के आहे. महसुली तूटही १ टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्यात यश आले आहे. २०१९-२० मध्ये महसुली तूट ४१ हजार कोटी रुपये होती, ती आता ४० हजार कोटी रुपयांवर आणली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण, शेतक-यांना मोफत वीज देउनही राज्य शासनाने राजकोषीय तूट कमी ठेवण्यात आले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**कर्जवाढीपेक्षा विकासासाठी गुंतवणूक अधिक-**२०१३-१४ मध्ये राज्याचा भांडवली खर्च २५ हजार कोटी रुपये होता. तो आता वाढून सुमारे २ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. पॅरास्टेटल संस्थांचा विचार केला नाही तरीही हा खर्च १.१७ लाख कोटी रु पये आहे. त्यामुळे कर्जवाढीपेक्षा विकासासाठी गुंतवणूक अधिक वाढल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**ट्रिलियन ड?लर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठणार-**महाराष्ट्र २०२९-३० च्या सुमारास ट्रिलियन डालर अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. सध्या राज्याची अर्थव्यवस्था सुमारे ६६० अब्ज डालरवर पोहोचली असून गेल्या वर्षातच ५५ अब्ज डालरची वाढ झाली आहे. त्याच गतीने वाढ कायम राहिल्यास पुढील पाच-सहा वर्षांत लक्ष्य गाठणे शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. २०४७ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन ड?लरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**प्रधानमंत्री आवास योजनेत मोठी प्रगती**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजनेसाठी राज्याने १४,३०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सामाजिक-आर्थिक जनगणनेतील त्रुटी लक्षात घेउन आवास प्लस पोर्टलद्वारे नव्याने सर्वेक्षण करण्यात आले. त्यात महाराष्ट्रात ३० लाख घरांची गरज नोंदवली गेली. या योजनेत एकाच वर्षात ३० लाख घरांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी सुमारे २५ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना पहिला हप्ता देण्यात आला आहे. १५ लाख घरांचे काम दुस-या टप्प्यात पोहोचले असून सुमारे ४ लाख घरे पूर्ण झाली आहेत. या घरांवर सुरुवातीपासूनच सौरउर्जा प्रणाली बसवली जाणार आहे.

**जलजीवन मिशनचा विस्तार-**जलजीवन मिशन योजनेत राज्यात ८१ टक्के घरांना नळाद्वारे पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. जलजीवन मिशन अंतर्गत ५१ हजारांहून अधिक योजना राबविल्या जात असून त्यापैकी २६ हजारांहून अधिक पूर्ण झाल्या आहेत. या योजनांवरील सुमारे १५ हजार कोटी रुपयांची थकबाकी होती. यावर्षी केंद्र आणि राज्याकडून १२,८०० कोटी रुपये उपलब्ध होणार असल्याने अडचणी दूर होतील, असे त्यांनी सांगितले.

**बळीराजा शेत पाणंद रस्ता योजना-**शेतक-यांसाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ता योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेसाठी १,००० कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आली आहे. यामध्ये यंत्रसामग्रीच्या साहाय्याने शेतरस्ते तयार केले जाणार असून भूमीकरणासाठी प्रति किलोमीटर १५ लाख रुपये दिले जातील, असे त्यांनी सांगितले.

**सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागाला ७६ टक्के रक्कम वितरित**

सामाजिक न्याय विभागाचा निधी ३८ टक्क्यांनी कमी केल्याचा आरोप चुकीचा असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. वितरित निधीपैकी सुमारे ७६ टक्के रक्कम वितरित झाली असून त्यातील ८७ टक्के खर्च झाली आहे. आदिवासी विकास विभागातही ८३ टक्के निधी वितरित झाला असून सुमारे ७० टक्के खर्च झाला आहे.

क्रीडा प्रबोधिनींवर मोठ्या प्रमाणात खर्च करत असून माध्यमातून राज्यातील खेळाडूंचा दर्जा वाढत आहे. २०२३-२४ मध्ये महाराष्ट्राने १२२ पदके जिंकली असल्याचे त्यांनी सांगितले.

**८१ लाख हेक्टर सिंचन क्षमता-**मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याची अंतिम सिंचन क्षमता ८१ लाख हेक्टर आहे. जून २०२४ पर्यंत ५७ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. मराठवाड्यात १७ लाख हेक्टर अंतिम क्षमतेपैकी १२.६८ लाख हेक्टर तयार झाली असून उर्वरित प्रकल्पांवर काम सुरू आहे.

**नदीजोड प्रकल्पांना गती-**मराठवाड्यातील दुष्काळ निवारणासाठी उल्हास खो-यातील पाणी मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात नेण्याचा ८७ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प प्रस्तावित आहे. प्रारूप अहवालानुसार ७८ टीएमसी पाणी वळवता येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. पुढील काही दिवसात सविस्तर प्रकल्प अहवाल बनवून त्याला मान्यता घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

**२०३५ पर्यंत ६५ टक्के वीज अपारंपरिक स्त्रोतातून मिळविण्याचे लक्ष**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवीकरणीय उर्जा व उर्जा साठवणूक धोरण २०२५-३५ या कालावधीसाठी लागू करण्यात आले आहे. २०३० पर्यंत राज्यातील ५२ टक्के आणि २०३५ पर्यंत ६५ टक्के वीज अपारंपरिक स्त्रोतांमधून मिळवण्याचे लक्ष्य आहे. या क्षेत्रात १ लाख मेगावॅट नवीकरणीय उर्जा क्षमता आणि उर्जा साठवणुकीची मोठी व्यवस्था उभारली जाणार आहे. यासाठी १,६५० कोटी रुपये सार्वजनिक गुंतवणूक आणि ३.१२ लाख कोटी रुपयांची खासगी गुंतवणूक अपेक्षित असल्याचेही त्यांनी सांगितले.

**सौर कृषी पंप योजनेत महाराष्ट्र देशात आघाडीवर-** मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत महाराष्ट्र देशात आघाडीवर असून दररोज सुमारे १,५०० पंप बसवले जात आहेत. या योजनेमुळे सुमारे ४० लाख एकर क्षेत्र ओलिताखाली आले आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंतर्गत २७ जिल्ह्यांमध्ये ३,८८१ उपकेंद्रांसाठी प्रकल्प सुरू असून सुमारे १०.२५ लाख शेतकरी लाभार्थी झाले आहेत. राज्यातील ४६ लाख कृषी ग्राहकांपैकी ३३ लाखांना दिवसा वीजपुरवठा शक्य झाला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. वीज खरेदी खर्चामध्ये १० हजार कोटी रुपयांची बचत महावितरणने केली असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत बिजली योजनेत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असून देशातील सर्वाधिक रुफट?प सोलर महाराष्ट्रात लावण्यात आले आहे आहे. महाराष्ट्राने रिसोर्स अडोकसी प्लॅन तयार केला आसून असा प्लॅन तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

**वीजदरात घट-**राज्यात प्रथमच पाच वर्षांचा मल्टी-इयर टॅरिफ निश्चित करण्यात आला आहे. घरगुती ग्राहकांसाठी वीजदर पुढील पाच वर्षांत २६ टक्क्यांनी कमी होणार आहेत. औद्योगिक व व्यापारी ग्राहकांनाही सवलत देण्यात आली आहे. कमी दरात वीज खरेदी करारांमुळे सुमारे ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे. वीज क्षेत्रात केलेल्या सुधारणांची दखल देशाने घेउन आपल्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरचे ५५ पुरस्कार मिळाले आहेत. उर्जा क्षेत्रातील गेल्या दोन वर्षातील सगळे पुरस्कार महाराष्ट्राला मिळाल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

**शिक्षण क्षेत्रातील डिजिटल सुविधा**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ६३,७३२ शाळांपैकी ५३,७०९ शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा किंवा स्मार्ट क्लासरूम उपलब्ध आहेत. उर्वरित लहान शाळांमध्येही टप्प्याटप्प्याने डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवीन औद्योगिक धोरणामुळे व दिलेल्या प्रोत्साहनामुळे राज्यातील अनेक नवीन जिल्ह्यांमध्ये गुंतवणूक येउ लागली आहे. नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये गुंतवणूक वाढत आहे.

# रवत विक्रीत अनियमितता

## दोषी विक्रेत्यांचे परवाने सहा महिन्यांसाठी निलंबित करण्याचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** खत विक्रीत अनियमितता आढळल्यास संबंधित विक्रेत्यांचे परवाने १५ दिवसांऐवजी सहा महिन्यांसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. शेतक-यांची फसवणूक होउ नये यासाठी कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सदस्य राजेश पवार यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री नाना पटोले, जयंत पाटील, अभिजित पाटील यांनी सहभाग घेतला.

नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यात खताच्या दरवाढी आणि उपलब्धतेबाबत शेतकरी पुत्र संघर्ष समितीने तक्रार केल्यानंतर जिल्हा कृषी अधिका-यांनी ५ डिसेंबर २०२५ रोजी कृषी विकास अधिकारी (जिल्हा परिषद) यांच्या अध्यक्षतेखाली भरारी पथक स्थापन केले. या पथकाने ८ डिसेंबर २०२५ रोजी नायगाव येथील सात रासायनिक खत विक्री केंद्रांची तपासणी केली. तपासणीत चार विक्रेत्यांनी निश्चित दरापेक्षा जास्त




दराने खत विक्री केल्याचे, तर तीन विक्रेत्यांनी साठा असूनही शेतक-यांना खत उपलब्ध करून दिले नसल्याचे आढळले. त्यामुळे सातही विक्रेत्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्याचे निर्देश कृषी आयुक्तांना देण्यात आले असून दोषी आढळणा-यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे कृषी मंत्री भरणे यांनी सांगितले. राज्यात बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात तपासण्या सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. १ एप्रिल २०२५ ते ५ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभरात १,१४,८६० विक्री केंद्रांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये १,५४३ विक्रेत्यांचे परवाने निलंबित, १,१७४ परवाने रद्द, तर २,९५६ विक्री बंदचे आदेश देण्यात आले. तसेच २,१४९ उत्पादनांची तपासणी करून ५२,९१० नमुने तपासण्यात आले. त्यापैकी ३,४६२ नमुने अप्रामाणिक आढळले असून सुमारे ३,१०० मेट्रिक टन खताचा साठा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणांमध्ये १४७ जणांवर पोलीस गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यात सध्या खताचा पुरेसा साठा उपलब्ध असून शेतक-यांना खताच्या बाबतीत कोणतीही अडचण येणार नाही, असेही कृषी मंत्री भरणे यांनी यावेळी सांगितले.

# आगामी अधिवेशनात महिला शेतक-यांसाठी विशेष विधेयक मांडणार- उपमुख्यमंत्री पवार

**केंद्राच्या धर्तीवर महाराष्ट्रातही राज्यस्तरीय जेंडर रिसोर्स सेंटर स्थापन करणार**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रात महिलांचे योगदान अनन्यसाधारण आहे. आता ही शेती ख-या अर्थाने महिलांच्या नेतृत्वाखाली नव्या पर्वात प्रवेश करत आहे. महिला शेतक-यांना त्यांचे हक्क आणि सन्मान मिळवून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, त्यांच्या सक्षमीकरणासाठी आगामी अधिवेशनात विशेष विधेयक सादर करण्यात येईल. केंद्राच्या धर्तीवर महाराष्ट्रातही राज्यस्तरीय जेंडर रिसोर्स सेंटर स्थापन केल्यामुळे महिलांचे कृषी प्रश्न सोडविण्यास मदत होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.

विधानभवन येथील मध्यवर्ती सभागृहात आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६ व जागतिक महिला दिन यानिमित्त महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र विधानमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला शेतक-यांचे सक्षमीकरण या विषयावर सर्वपक्षीय महिला विधानमंडळ सदस्या व तज्ज्ञांच्या सहभागातून विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार बोलत होत्या. यावेळी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गो-हे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, कृषी राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, आमदार मोनिका काजळे, आमदार मंजुळा गावीत, आमदार ज्योती गायकवाड, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, विधीमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे, एम एस स्वामीनाथन फांउडेशनच्या संस्थापिक सौम्या स्वामीनाथन आणि सह संस्थापिका नित्या राव उपस्थित होत्या.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, महिला शेतक-यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी नवीन कायदा आणला जाणार



आहे. यामध्ये प्रामुख्याने ७/१२ वर नाव नसल्यामुळे येणा-या अडचणी दूर करणे आणि शेतीतील सांख्यिकी आकडेवारीमध्ये स्त्री-पुरुष शेतक-यांची स्वतंत्र नोंद घेणे या बाबींचा समावेश असेल. नमो ड्रोन दीदी योजनेद्वारे महिलांना ड्रोन पायलटचे प्रशिक्षण दिले जाईल. तसेच शेतीमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. कृषी विभागाच्या सर्व योजनांमध्ये किमान ३० टक्के लाभ महिलांसाठी राखीव असून, पीएम-किसान योजनेचा लाभ १८ लाख महिलांना मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. लखपती दीदी आणि शी मार्ट्स सारख्या उपक्रमांतून महिलांना जागतिक बाजारपेठ मिळवून दिली जाईल. तसेच पशुपालन, मत्स्यपालन आणि मधुमक्षिका पालनासाठी विशेष अनुदानाचा विचारही शासन करत आहे.

कृषी विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांपैकी ४५ टक्के मुली आहेत. आजची महिला केवळ शेतकरी राहिलेली नसून ती कृषी उद्योजक आणि तंत्रज्ञान वापरणारी बनत आहे. जेव्हा महिला सक्षम होईल, तेव्हाच राज्याची अर्थव्यवस्था ख-या अर्थाने समृद्ध होईल. पुणे जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ७५ टक्के अनुदानावर महिला शेतक-यांना प्राधान्य देणा-या ड्रोन खरेदीस मान्यता दिली असून, हाच 'पुणे पॅटर्न' राज्यभर राबविण्याचा विचार आहे, असेही उपमुख्यमंत्री म्हणाल्या.

# अंमली पदार्थांविरोधात राज्यात कठोर कारवाई 14 प्रकरणांत मकोका लागू

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यात अंमली पदार्थांविरोधात कठोर कारवाई करण्यात येत असून आतापर्यंत १४ प्रकरणांमध्ये मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सरकारची भूमिका या प्रकरणात पूर्णपणे झिरो टालरन्सची असल्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.याबाबत सदस्य शशिकांत शिंदे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सतेज पाटील, अनिल परब, प्रविण दरेकर यांनी उपप्रश्न उपस्थित केला.राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, अंमली पदार्थाच्या वाढत्या समस्येला आळा घालण्यासाठी राज्य शासनाने अँटी-नार्कोटिक टास्क फोर्स स्थापन केला आहे. या टास्क फोर्सचे मुख्य काम अंमली पदार्थ विरोधात कारवाई करणे आणि त्यामागील संपूर्ण साखळी शोधून काढणे असेल. अंमली पदार्थ रॅकेटमधील मुख्य आरोपींसह त्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करणा-यांचाही शोध



घेउन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जात आहे. अंमली पदार्थाच्या पुरवठा साखळीवरही कठोर कारवाई केली जात असून र? मटेरियल पुरवठा करणा-यांवरही मकोका अंतर्गत कारवाई केली जात आहे. सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात उघडकीस आलेल्या अंमली पदार्थ प्रकरणात ११ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्वांवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणात कठोर कारवाई सुरू आहे. काही ठिकाणी बंद पडलेल्या कारखान्यांमध्ये किंवा ग्रामीण भागातील शेडमध्ये लपूनछपून अंमली पदार्थ तयार केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे पोलीस आणि एमआयडीसी प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवून अशा ठिकाणांवर तपास सुरू केला आहे. ग्रामीण भागातही पोलीस यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली असल्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले.

# भूमी अभिलेख विभागाचा 2003 पासूनचा प्रलंबित आकृतीबंध मंजूर-महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील भूमी अभिलेख विभागाचा २००३ पासून प्रलंबित असलेला आकृतीबंध मंजूर करण्यात आला असून या विभागातील १०,६८३ पदांची रचना निश्चित करण्यात आली आहे. याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने भूमी अभिलेख व्यवस्थेत सुधारणा करून राज्यात अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्याचे राज्य शासनाचे उद्दिष्ट असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत सांगितले. सदस्य गोपिचंद पडळकर यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य बबनराव लोणीकर, राजेश पवार, अभिजीत पाटील यांनी सहभाग घेतला.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राज्य शासनाच्या १०० आणि १५० दिवसांच्या प्रशासनिक कार्यक्रमांतर्गत भूमी अभिलेख विभागातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. भूकरमापकांच्या पदोन्नतीसंदर्भातही राज्य शासनाने मार्ग काढला असून एस-६ श्रेणीतील कर्मचा-यांना एस-८ श्रेणीत पदोन्नती देण्यासाठी ४० टक्के पदे पदोन्नतीने, ४० टक्के अंतर्गत परीक्षेद्वारे आणि २० टक्के थेट भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील तीन वर्षांत एस-६ ही श्रेणीच राहणार नाही आणि सर्व भूकरमापक एस-८ श्रेणीत जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.




जमीन मोजणी प्रक्रियेचा वेग वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून यासाठी महसूल विभागाला १३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यातून १२०० आधुनिक रोव्हर्स उपकरणांची खरेदी केली जात आहे. निविदा प्रक्रियेमुळे आणखी सुमारे ३०० रोव्हर्स उपलब्ध होण्याची शक्यता असून इतर निधीतूनही ५०० ते ६०० रोव्हर्स घेण्याची योजना आहे. त्यामुळे राज्यात एकूण सुमारे २५०० रोव्हर्स उपलब्ध होतील आणि प्रलंबित मोजण्या जलदगतीने पूर्ण होण्यास मदत होईल, अशी माहितीही मंत्री बावनकुळे यांनी यावेळी दिली.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मोजणी प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्यात आली असून सरकारी भूकरमापकांच्या साहाय्यासाठी परवानाधारक भूकरमापकांची प्रशिक्षण देउन नियुक्ती करण्याचे अधिकारी जिल्हाधिका-यांना देण्यात आले आहेत. यामुळे मोजणीचा वेग चारपट वाढून मोजणी ३० दिवसांच्या आत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मराठवाडा विभागातील प्रशासनिक कामकाज सुलभ करण्यासाठी आणखी एक महसूल आयुक्तालय आणि उपसंचालक कार्यालय स्थापन करण्यात येणार आहे. हे कार्यालय नांदेड किंवा लातूर येथे स्थापन करण्याबाबत निर्णय लवकरच घेतला जाईल, अशी माहितीही मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

# राष्ट्रीय महामार्ग 7538 भूसंपादन प्रकरणाची एसआयटी चौकशी

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रीय महामार्ग ७५३८ भूसंपादन प्रकरणात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, मुद्रांक विभाग, भूसंपादन विभाग, महसूल यंत्रणा, तलाठी व भूमी अभिलेख अशा एकूण सहा विभागांचा संबंध असल्याने सर्व विभागांची संयुक्त चौकशी करण्यात येईल. नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात येणार असून तीन महिन्यांच्या आत चौकशी पूर्ण करून अहवाल सभागृहात सादर केला जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. राष्ट्रीय महामार्ग ७५३८ च्या विस्तारासाठी मुक्ताईनगर तालुक्यात करण्यात आलेल्या भूसंपादन प्रक्रियेत अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या संशयाबाबत विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडण्यात आली. यावर उत्तर देताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, सध्या संबंधित शेतक-यांना कोणताही मोबदला वितरित झालेला नाही. त्यामुळे आर्थिक फसवणुकीचा प्रकार घडलेला नाही. मात्र शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न झाला का किंवा प्रक्रियेत काही अनियमितता झाली का, याची सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. मुक्ताईनगर तालुक्यातील नउ गावांतील भूसंपादन निवाड्यांशी संबंधित हा विषय असल्याने केवळ एका प्रकरणापुरती चौकशी न करता सर्व संबंधित निवाडे तपासले जाणार असल्याचेही मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

# देशातील सर्वाधिक फार्मर आयडी देणारे महाराष्ट्र पहिले राज्य

**मुंबई/प्रतिनिधी :**कृषी क्षेत्रातील विविध योजनांचा लाभ शेतक-यांपर्यंत जलद गतीने पोहोचविण्यासाठी केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण विभागामार्फत अग्रीस्टॅक योजना राबविली जाते. या अंतर्गत सर्वाधिक शेतक-यांना ओळख क्रमांक (फार्मर आयडी) देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. अग्रीस्टॅकअंतर्गत बोगस आयडी देण्यात आल्याची कोणतीही तक्रार नाही. तथापि असे




निदर्शनास आल्यास त्याबाबत चौकशी करुन सामूहिक सुविधा केंद्रावर कारवाई केली जाईल, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत सांगितले. सदस्य करण देवतळे यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य विजय वडेट्टीवार, नमिता मुंदडा यांनी सहभाग घेतला. कृषीमंत्री भरणे म्हणाले, फार्मर आयडीबाबतची प्रक्रिया अतिशय सोपी आहे. राज्यात ४ मार्च २०२६ पर्यंत एक कोटी ३१ लाख ८२ हजार आयडी देण्यात आले आहेत. देशातील इतक्या मोठ्या संख्येने आयडी देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# महाविद्यालयीन शुल्क निर्धारणातील अनियमिततेच्या चौकशीसाठी निवृत्त उच्च न्यायालय न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती

**मुंबई/प्रतिनिधी :** महाविद्यालयीन शुल्क निर्धारण प्रक्रियेत अनियमिततेच्या तक्रारींची शासनाने दखल घेतली असून निवृत्त उच्च न्यायालय न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करुन याबाबतची चौकशी करण्यात येईल, अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात केली. सदस्य महेश शिंदे यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य प्रशांत बंब यांनी सहभाग घेतला.



उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार राज्यात शुल्क निर्धारणासाठी (फी रेग्युलेशन अथारिटी) कार्यरत आहे. प्रत्येक महाविद्यालयाने मागील वर्षाचे ऑडिट केलेले आर्थिक अहवाल सादर करणे बंधनकारक असते. समितीने मान्य केलेल्या खर्चाची एकूण रक्कम विद्यार्थ्यांच्या संख्येने भागून शुल्क निश्चित केले जाते आणि ते तीन वर्षासाठी लागू राहते.राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी तसेच वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपर्यंत असलेल्या कुटुंबांतील विद्यार्थ्यांच्या विशेषत? मुलींच्या शुल्काची जबाबदारी राज्य शासन उचलत आहे. तथापि काही महाविद्यालयांकडून प्राध्यापक नसतानाही त्यांचे वेतन दाखवणे, न झालेल्या बांधकामाचा खर्च दाखवणे किंवा इतर खर्च वाढवून दाखवणे अशा प्रकारे शुल्क वाढविल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबतच्या चौकशीत मोठा घोटाळा आढळल्यास विशेष तपास पथक नेमणे, एफआयआर दाखल करणे किंवा आर्थिक गुन्हे शाखेकडून तपास करण्याची कारवाई केली जाईल, असे मंत्री पाटील यांनी स्पष्ट केले. या चौकशी प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागातील उपसचिव स्तरावरील अधिका-याची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## भाजपाचे राजकारण

भारतीय जनता पक्षाला कसलीच घाई नसते. विरोधी पक्ष ज्या पद्धतीने कोसळून पडत आहेत, ते पाहता भविष्यात आपल्यासमोर कोणी तगडा प्रतिस्पर्धी नसेल, हे त्यांनी केव्हाच ताडले आहे. त्यामुळे, भाजप बेसावध किंवा अतिआत्मविश्वासात आहे, असेही नाही. गृहमंत्री अमित शहा यांची संघटनेवरची पकड आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून सतत मिळणारा फीडबॅक, यामुळे त्यांचे पाय जमिनीवर आहेत. विरोधक कुठे डोके वर काढू लागला, तर त्याला जागीच नामोहरम करण्यासही पक्ष तत्पर असतो. अनेकदा पक्षावर टीका होते, पण पक्षाचे धोरण आखणाऱ्यांवर त्याचा परिणाम होत नाही; अंतिम पाडाव दृष्टीआड होऊ द्यायचा नाही, यावर मात्र ते ठाम असतात. आता बिहारचेच बघा. वीस वर्षांहून अधिक काळ बिहारवर मांड ठोकून बसलेल्या नितीशकुमारांना त्यांनी इतके अलगद बाजूला केले, की त्यांच्या पक्षाला, संयुक्त जनता दलालाही नेमके काय झाले, ते लवकर कळले नाही. आपल्या हातून बिहार काढून घेतला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले, तेव्हा घाईघाईने नितेशपुत्र निशांत यांच्यासाठी घोषणाबाजी झाली आणि त्या धक्क्यातून सावरण्याचा तात्पुरता प्रयत्न झाला. भाजपने नितीशकुमार यांच्या हातून केवळ बिहार काढून घेतला असे नाही, तर यापुढे राज्यावर त्यांची सावली राहू नये, यासाठी त्यांना थेट दिल्लीत जागा करून दिली. सध्या फक्त राज्यसभेची खासदारकी नक्की दिसत असली, तरी तेवढ्याने भागणार नाही, हे उघड आहे. मंत्रीपदासारखे अधिक काही देऊन त्यांना दिल्लीतच अडकवून ठेवण्याची क्लृप्ती भाजपला करावी लागेल. नितीशकुमार यांच्या अनुयायांचीही तीच मागणी असेल! भाजपच्या दृष्टीने त्यासारखी उत्तम सोय नसेल. संयुक्त जनता दलाचे हरिवंश सध्या राज्यसभेचे उपसभापती आहेत. राज्यसभेतल्या त्यांच्या जागेवरच नितीशकुमार जाताहेत. अनायासे नितीशकुमार यांनाच उपसभापती पद देता आले असते. पण, त्यांची तब्येत, त्यांचा विस्मरणाचा विकार पाहता भाजप त्यांना ते पद देईल, असे दिसत नाही. मंत्रीपदाचीच शक्यता जास्त दिसते. येत्या आठवड्यात त्याबाबतचे चित्र स्पष्ट होईल. २०२० आणि २०२५ या दोन्ही विधानसभा निवडणुकांत संयुक्त जनता दलाला भाजपपेक्षा कमी जागा मिळाल्या होत्या. पण, तरीही भाजपने नितीशकुमार यांनाच मुख्यमंत्रीपद दिले. २०२० मध्ये भाजपचा नाईलाज होता. मुख्यमंत्रीपद दिले नसते, तर नितीशकुमार यांनी पुन्हा राष्ट्रीय जनता दलासोबत जाऊन सरकार स्थापन केले असते. नंतर २०२४ च्या सुरुवातीला त्यांनी 'इंडिया आघाडी' सोबत जाण्याचा प्रयत्न करून पाहिलाच. पण, आघाडीने राष्ट्रीय निमंत्रक पद न दिल्याने ते मागे फिरले! यावेळच्या निवडणुकीत नितीशकुमार यांच्या पक्षाने ४३ जागांवरून ८५ पर्यंत मजल मारली. राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसच्या जागा त्यांनी खेचल्या. भाजपने यावेळी ८९ जागा जिंकल्या. जितनराम मांझी यांच्या हिंदुस्तानी अवाम मोर्चा' (हम), उपेंद्र कुशवाह यांच्या 'राष्ट्रीय लोक मोर्चा'च्या (रालोमो) पाठिंब्यासह विरोधकांतल्या काही आमदारांना आपल्याकडे खेचून भाजपला नितीशकुमारांशिवाय सत्ता स्थापन करता आली असती.पण, अशा क्षणिक मोहात न पडता भाजपने नितीशकुमार यांना परिस्थितीची जाणीव करून दिली.त्यांना आपल्यासोबत राहण्यास भाग पाडले. 'तिमाही मुख्यमंत्रीपदा'वर राजी करून नंतरच्या सत्तेच्या बिनबोभाट हस्तांतरणाला बाध्य करून राज्यसभेवर जाण्याची हमीही मिळवली। नितीशकुमारांनाही यात सन्मानाने सुटका दिसली. त्यांनी पुत्र निशांत यांना उपमुख्यमंत्री पद देण्याच्या अटीवर भाजपची पूर्ण योजना स्वीकारली. राज्यसभेचा उमेदवारीचा अर्ज भरेपर्यंत त्यांनी कोणाला याची खबरही लागू दिली नव्हती. त्यामुळे, सुरुवातीला पक्षातल्या 'चांडाळचौकडी'नेच भाजपला सामील होऊन हा कट शिजवल्याचा गैरसमज पक्षात आणि बहुतांश बिहारमध्ये पसरला. केंद्रीय मंत्री ललनसिंह, विजय चौधरी आणि संजय झा यांच्या विरोधात त्यामुळेच पहिल्या दिवशी घोषणा दिल्या गेल्या. जेव्हा नितीशकुमार यांनी स्वतःच निर्णयाची कबुली दिली आणि निशांत यांनीही 'हा त्यांचा व्यैयक्तिक निर्णय आहे. माझ्याप्रमाणेच तुम्हीही त्याचा आदर करा आणि पूर्वीप्रमाणेच त्यांच्यावरचे प्रेम कायम ठेवा' असे आवाहन केले, तेव्हा हा जनक्षोभशांत झाला.मग ललनसिंह यांच्या जयजयकाराच्या घोषणा सुरू झाल्या...निशांत यांचा वयाच्या पन्नासाव्या वर्षी राजकारणातला प्रवेश ही काही आश्चर्याची घटना नाही. सर्व प्रादेशिक पक्षांना आपल्या रक्ताच्या वारसदाराकडे पक्ष सोपवण्यावाचून पर्याय नसतो. मग ते कोणतंही राज्य असो आणि तिथली राजकीय समीकरणे काहीही असोत. अशा परिवारवादावरून लालूप्रसाद यादव किंवा रामविलास पासवान यांची खिल्ली उडवणाऱ्या नितीशकुमार यांनाही शेवटी त्यांच्याच पंक्तीत येऊन बसावे लागले. 'परिवार वादापासून मुक्त प्रशासनबाबू' अशी प्रतिमा ठेवून बिहारी जनतेच्या मनात आपल्याबद्दल आदराची भावना निर्माण केलेल्या नितीशकुमार यांचे हे वेगळेपण आता पुसले गेले आहे. 'प्रशासनबाबू' ही त्यांची प्रतिमा राहील. पण, त्याशिवाय राज्याच्या लोकसंख्येत ३६ टक्के वाटा असणाऱ्या अतिमागास जातींचा 'मसीहा' आणि महिलावर्गाचा 'भाऊ' ही त्यांची ताकदही कायम स्मरणात राहील. भाजपसमोर हीच तीन आव्हाने आहेत. विहारपासून दूर नेलेल्या नितीशकुमार यांचे विहारच्या राजकारणातले स्थान घ्यायचे असेल, तर भाजपला या तीनही आघाड्यांवर यापुढे अधिक ताकतीने प्रयत्न करावे लागतील. 'सामाजिक अभिसरणा'चे अनेक यशस्वी प्रयोग भाजपने गेल्या काही वर्षांत विविध पातळीवर केले आहेत. डॉ. प्रेमकुमार यांना विधानसभा अध्यक्षपद देऊन पक्षाने त्याची सुरुवातही केली आहे. विविध निवडणुका, महामंडळ, आयोग, प्राधिकरणांवरील नियुक्त्या करताना भाजप जाणीवपूर्वक 'सामाजिक अभिसरण' लक्षात ठेवतो आहे. महिला मतदारांना आपलेसे करणे ही फार अवघड गोष्ट नाही. प्रश्न आहे, तो हे सगळे करताना पक्षातली गणितही कशी सुरक्षित ठेवायची हा. नव्या मुख्यमंत्र्यांच्या निवडीपासूनच त्याची परीक्षा सुरू होईल. ही परीक्षा व्यवस्थित उत्तीर्ण केली, तर यापुढे बिहार भाजपचा झाला, असे म्हणण्याला कुणाचा अडथळा नसेल!

# पेपरफुटी व कॉपीमुक्त परीक्षांचे आव्हान

**शिक्षण क्षेत्रातील गैरप्रकार, कॉपी, पेपरफुटीचे लागलेले ग्रहण, यामुळे शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाला आहे, गुणवत्ता घसरली आहे, दरवर्षी लाखो विद्यार्थी डिग्री घेऊन बाहेर पडत आहेत. त्यामुळे बेरोजगारांची संख्या भरभर वाढत आहे. परीक्षार्थींच्या ख-या गुणवत्तेचा कस लागायचा असेल तर कॉपी, पेपरफुटीला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना होणे गरजेचे आहे. कायदे, नियम कितीही केले तरी ते पाळण्याची सर्वांची मानसिकता असणे गरजेचे आहे. परीक्षेच्या पहिल्याच दिवशी बीड, जालना, अमरावती जिल्ह्यात अनेक ठिकाणी खुद्द पालकच कॉपी पुरवताना दिसत होते. कॉपीमुक्त-पेपरफुटीमुक्त परीक्षांचे आव्हान या वर्षीदेखील आहे तसेच आहे.**



राज्यात विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची असलेली बारावीच्या परीक्षा झाली. त्यानंतर दहावी आणि इतर परीक्षा सुरू आहेत. दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे एक वेगळे महत्त्व आहे. यावरच विद्यार्थ्यांची पुढील दिशा ठरते, करिअर घडते. कुठल्याही परीक्षांचा मुख्य उद्देश असतो तो गुणवत्तेचा कस परीक्षार्थीच्या आकलनाची क्षमता, विषयांचा सखोल अभ्यास आणि यावरच ठरते ती गुणवत्ता. मात्र गेल्या काही वर्षांपासून केवळ शैक्षणिक परीक्षा नव्हे तर नोकरभरतीची परीक्षा असो की पदोन्नतीसाठीची परीक्षा असो, या सगळ्या परीक्षांना कॉपी आणि पेपरफुटीचे ग्रहण लागले आहे आणि यामुळे ख-या गुणवत्तेचा कस लागत नाही की गुणवंतांना संधी मिळत नाही. दरवर्षी कॉपीमुक्त परीक्षांसाठी शिक्षण मंडळाकडून विविध उपाययोजना केल्या जातात, शासन आदेश निघतात तरीदेखील कॉपी मोठय़ाप्रमाणावर होते, काही परीक्षा केंद्रात तर तेथील शाळा, शाळेचे शिक्षक, संस्थाचालक यांच्या मदतीनेच कॉपी पुरवली जाते तर अगदी पोलीस बंदोबस्त असतानादेखील कॉपी पुरवली जाते, कॉपी पुरवणे, पेपर फोडणे यात मोठी आर्थिक देवाणघेवाण होते तसेच आपल्या शाळेचा निकाल चांगला लागावा यासाठी अनेक शाळा, संस्था हेदेखील कॉपी पुरवण्यात सहभागी असतात हे अनेकदा अधोरेखित झाले आहे. काही परीक्षा केंद्रे तर यासाठी कुप्रसिद्ध आहेत. या वर्षी स्थानिक प्रशासनाने परीक्षा केंद्र परिसरातील पाचशे मीटरपर्यंत झेरॉक्स सेंटर बंद ठेवण्याचे आदेश काढले आहेत.

दरवर्षी कॉपी प्रकरणात सापडल्यास कारवाईचा इशारा दिला जातो, परीक्षा केंद्राची मान्यता रद्द करण्याचा इशारा दिला जातो, काही वेळा थातुरमातुर कारवाई होतेदेखील. तर अनेकदा पेपर तपासणारे शिक्षकच मार्क वाढविण्याचे अनेक प्रकार घडतात. या वर्षी परीक्षा केंद्रांवर ड्रोनच्या सहाय्याने नजर ठेवली जाणार असे सांगितले गेले. कॉपी करताना पकडला गेल्यास गुन्हेगारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा देण्यात आला. त्याच बरोबर भरारी पथकाचीदेखील करडी नजर असणार आहे. याच संदर्भात मध्यंतरी शिक्षकांच्या अदलाबदलीचा विषय चर्चेत आला होता. मात्र त्याला काही शिक्षक संघटनांनी विरोध केला. कोणत्याही परीक्षा केंद्रात गैरप्रकार घडला तर तसे करणा-यांवर थेट अजामीनपात्र गुन्हा दाखल केला जाणार आहे. मात्र तरीदेखील गैरप्रकार होण्याचे काही केल्या थांबताना दिसत नाही.

शिक्षण श्रेत्र किती बरबटलेले हे अनेकदा अधोरेखित झाले आहे. देशाचा किंवा राज्याचा कारभार हाकताना आयएएस, आयपीएस या पदांचे महत्त्व मोठे आहे, राज्यव्यवस्था याच कार्यपालिकेच्या मदतीने राज्यकारभार करते. या पदावर नियुक्ती होताना तितक्याच अग्निपरीक्षेच्या दिव्यातून कसोटय़ा पार करून जावे लागते, त्यासाठी केंद्रीय स्तरावर यूपीएससी तर राज्यात एमपीएससी मार्फत परीक्षा घेतल्या जातात, सर्वतोपरी काळजी, नियम अटी, यांचे पालन करून सर्व प्रक्रियांचे काटेकोर पालन करूनच, उमेदवारांची निवड केली जात असणार, मात्र गेल्या काही वर्षांपासून युपीएससी असो की एमपीएससी असो की इतर परीक्षा घेणा-या संस्थांच्याही कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, पुण्यातील 'पूजा' प्रकरणावरून तर ते अधिक स्पष्ट झाले आहे. राजकीय पक्ष, नेते, वरिष्ठ नोकरशहा, अधिकारी, कंत्राटदार, दलाल, उद्योगपती यांची एक भ्रष्ट साखळी निर्माण झाली आहे आणि या साखळीने सगळ्याच यंत्रणा पोखरल्या गेल्या आहेत. ओळख, वशिला, पैसा, राजकीय वरदहस्त, सत्तेची साथ असेल तर सगळे काही विकत घेता येते, कोणताही, नियम, कायदा याला बगल देता येते. विद्यादानाचे पवित्र क्षेत्र असो की डॉक्टर, इंजिनीअर, वकील यासारखे पांढरपेशी व्यवसाय असो की सरकारी क्षेत्रातील नोकरभरतीसाठी होणा?या स्पर्धा परीक्षा, नोकरीभरती, सगळीकडे प्रत्येक टप्प्यावर भ्रष्टाचार बोकाळला आहे चिरीमिरी दिल्याशिवाय कुठलेच काम होत नाही. आता तर चिरीमिरीची मजल करोडो रुपयांपर्यंत पोहचली आहे. भ्रष्टाचार हे कालातीत सत्य आहे. जगभर भ्रष्टाचार बोकाळला आहे.

परीक्षा आणि गैरप्रकार, घोटाळे हे गेल्या काही वर्षांपासून समीकरणच बनले आहे आणि गैरप्रकाराविरुद्ध परीक्षार्थींनी आवाज उठवला, आंदोलने केली तर त्यांचा सहानुभूतीने विचार करण्याऐवजी आंदोलने दडपली जातात. त्यांना राष्ट्रद्रोही, अर्बन नक्षलवादी ठरवले जातात आणि ख?या गुन्हेगारांना पाठीशी घालत विद्यार्थ्यांवरच कारवाईचा बडगा उगारला जातो.

**अनंत बोरसे**

# आयटी क्षेत्रापुढे आव्हान



**भारतीय आयटी उद्योग एका निर्णायक टप्प्यावर उभा आहे. स्वयंचलनामुळे पारंपरिक सेवा पद्धतींना आव्हान निर्माण झाले आहे.**

देशाची माहिती-तंत्रज्ञान उद्योगव्यवस्था अनेक दशका पासून भारतीय अर्थव्यव स्थेचा मजबूत आधारस्तंभ राहिली आहे; मात्र आता ती एका नव्या आणि धोकादायक टप्प्यातून जात आहे. हा धोका दुसरा कोणी नसून, आयटी कंपन्यांनी स्वतः विकसित केलेली कृत्रिम बुद्धिमत्ता हीच आहे. ज्या कंपन्या सॉफ्टवेअर विकास, चाचणी प्रक्रिया आणि विविध सेवा पुरविण्यावर अवलंबून होत्या आणि झपाट्याने प्रगती करत होत्या, त्यांच्यासाठी कठीण दिवस सुरू झाले आहेत. कारण, ही सर्व कामे आता एआय स्वयंचलित पद्धतीने पूर्ण करू लागली असून ती थेट त्यांच्या व्यवसाय मॉडेललाच आव्हान देत आहे. भारतासाठी ही स्थिती अधिक चिंताजनक आहे. कारण, देशाला जगातील आऊटसोर्सिंग केंद्र म्हणून मान्यता मिळाली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत आयटी क्षेत्र, बीपीओ, कॉल सेंटर्स आणि बॅक ऑफिस सेवांमध्ये लाखो लोकांना रोजगार मिळतो.

माहिती-तंत्रज्ञानापुरते मर्यादित न राहता जवळजवळ सर्वच क्षेत्रांत एआयने प्रभावी प्रवेश केला आहे. कोणतीही प्रक्रिया अधिक सुलभ आणि अधिक कार्यक्षम पद्धतीने पूर्ण करणे शक्य झाले आहे. शिक्षण क्षेत्राचा विचार केला, तर विद्यार्थी कोणताही विषय आधुनिक पद्धतीने सहज शिकू शकतो. शिक्षण क्षेत्रातील सर्वांत मोठी चिंता म्हणजे विद्यार्थ्यांची मानसिक क्षमता आणि स्वयंपूर्ण विचारशक्ती कमी होण्याची शक्यता. प्रश्नांची उत्तरे सहज उपलब्ध झाल्याने स्वतः शोध घेण्याची सवय कमी होऊ शकते. उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि निष्पक्षता यांसारख्या मूल्यांबाबतही अनेक आव्हाने निर्माण होतात. कमी वेळेत विस्तृत माहिती देणाऱ्या चॅटबॉट प्रणालींची गती मानवी क्षमतेपेक्षा अधिक आहे. हीच बाब खोटी बातमी आणि चुकीची माहिती वेगाने पसरविण्यास कारणीभूत ठरू शकते. सायबर गुन्हेगार त्याचा गैरफायदा घेऊन दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करू शकतात. समाजमाध्यमांवर त्याचे गंभीर परिणाम दिसू शकतात. काही एआय प्लॅटफॉर्म छायाचित्रे आणि व्हिडीओ तयार करण्यासही सक्षम आहेत आणि त्यांचा वापर खोट्या प्रचारासाठी केला जाऊ शकतो.

अनेक कंपन्यांनी कार्यक्षमता वाढविण्यासाठी एआयचा वापर सुरू केला आहे. परिणामी, मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपातीची शक्यता वर्तवली जाते. एका अहवालानुसार सुमारे ३० कोटी लोकांच्या नोकऱ्यांवर परिणाम होऊ शकतो. भविष्यात सुरक्षा व्यवस्थेबाबतही एआय स्वतः निर्णय घेण्याची क्षमता विकसित करू शकते आणि नियंत्रणाच्या पद्धती शोधू शकते; मात्र या तंत्रज्ञानावर अतिअवलंबित्व नवीन अडचणी निर्माण करू शकते.काही दिवसांपूर्वी तांत्रिक त्रुटीमुळे चॅटजीपीटी या प्रणालीची शोध नोंद गळती झाल्याची घटना घडली होती. भविष्यातही अशा प्रकारचे धोके संभवतात. कंपन्यांकडे वापरकर्त्यांचा डेटा असतो. कृत्रिम बुद्धिमत्ता त्या डेटाच्या आधारे वापरकर्त्यांच्या सवयी आणि नमुने ओळखू शकते. त्यांची नक्कल करू शकते आणि जाहिरातींसाठी माहितीचा गैरवापर करून बनावट प्रोफाईल तयार करू शकते. आज क्षेपणास्त्रे आणि ड्रोन एआयच्या साहाय्याने नियंत्रित केली जातात. सध्या त्यांना दिले जाणारे आदेश निश्‍चित चौकटीत असतात; परंतु भविष्यात या तंत्रज्ञानाच्या क्षमता वाढल्यास मानवी आदेशांशिवाय निर्णय घेण्याची शक्यता निर्माण होऊ शकते आणि त्यामुळे गुंतागुंत वाढू शकते.

या सर्व पार्श्वभूमीवर भारतीय आयटी उद्योग एका निर्णायक टप्प्यावर उभा आहे. स्वयंचलनामुळे पारंपरिक सेवा पद्धतींना आव्हान निर्माण झाले असले, तरी याच एआयच्या साहाय्याने भारताच्या आर्थिक विकासाला नवी चालना मिळू शकते. योग्य धोरणे, कौशल्य विकास आणि नियोजन यांच्या आधारे या बदलत्या तंत्रज्ञानाला स्वीकारणे हेच पुढील काळात भारतासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.(साभार-पुढारी)

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण



महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री राष्ट्रीय राजकारणातले द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज जयंती.महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाने प्रेरित होऊन यशवंतराव चव्हाण यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीतही त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ सालच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली यशवंतरावांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले.

द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राचे स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आले अशावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावून त्यांची देशाच्या संरक्षणमंत्री नेमणूक केली. परकीय आक्रमणाच्या वेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पेलली.

१९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरित्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकिर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तणखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढीला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाच्या उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले.

महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे, तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले.यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, प्रवासवर्णन, स्फूटलेखन, वैचारिक लेख, समीक्षात्मक लेख, पत्रलेखन भाषणे, इत्यादी स्वरूपात त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत हा मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत.यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारतील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
मो.९९२२५४६२९५

# दिल्ली मद्य धोरण प्रकरणः 'कॅग'चा ठपका

दिल्ली राज्य सरकारच्या कथित मद्य घोटाळा प्रकरणात राऊज एव्हेन्यू कोर्टाने अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांची निर्दोष मुक्तता करत मोठा दिलासा दिला होता. ट्रायल कोर्टाने पुराव्यांच्या अभावी तसेच तपास यंत्रणांचे पुरावे कमकुवत असल्याचे म्हटले होते. या संदर्भात आता दिल्ली उच्च न्यायालयाने आमआदमी पार्टीचे नेते अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांच्याविरुद्ध सीबीआय तपासा संदर्भात नोटीस जारी केली आहे. या प्रकरणातील कायदेशीर लढाई आता अधिक तीव्र झाली असून, केजरीवाल आणि सिसोदिया यांना सीबीआयच्या याचिकेवर उत्तर तर द्यावे लागणार आहे.

१७ नोव्हेंबर २०२१ रोजी केजरीवाल सरकारने दिल्लीत नवीन मद्य धोरण लागू केले होते. या धोरणांतर्गत संपूर्ण दिल्लीची ३२ झोनमध्ये विभागणी करून एकूण ८४९ दुकाने सुरू करण्याचे नियोजन होते. या धोरणाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे मद्य विक्रीचे १००इ खाजगीकरण करण्यात आले.या धोरणा मागचा सरकारचा तर्क असा होता की, 'एल-१' परवाना शुल्क २५ लाखांवरून थेट ५ कोटी केल्यामुळे सरकारला सुमारे ३,५०० कोटींचा एकरकमी महसूल मिळेल. मात्र, विरोधकांनी काँग्रेस आणि भाजप यातील आर्थिक गणितावर गंभीर आक्षेप घेतले. विशेष बाब म्हणजे दिल्ली काँग्रेस नेच ही गोष्ट प्रथम निदर्शनास आणली होती.

आज पर्यंत मिळणारा राजस्व या नवीन पद्धतीत मुख्यतः किरकोळ विक्री मार्फत मात्र मिळणारा कमी होणार होता उदाहरणार्थ असे गृहीत धरा जुन्या पद्धतीत ७५० एम एल बॉटल ची ५३० रू विक्री किंमत होती यात दुकानदाराचा ३३.३५ नफा २२३.८९ रुपये उत्पादन शुल्क आणि १०६ रुपये व्हॅट असा महसूल मिळणार होता. थोडक्यात यात एका बाटली मागे सरकारला ३२९.८९ रुपये राजस्व मिळत होता. नवीन मद्य निती मध्ये मात्र ७५० एम एल बॉटल ची किंमत ५३० ऐवजी ५६० रुपये केली गेली व्यापारी नफा ३३.३५ वरून ३६३.२७ पैसे केला गेला होता. म्हणजे दहा पट नफा त्यांचा यात वाढविला गेला होता. सरकारला आधी मिळणारा राजस्व ३२९.८९ रुपयांवरून ३.७८ रुपयावर कमी करण्यात आला १.८८ रुपये उत्पादन शुल्क अधिक १.९० व्हॅट असा केला होता.

या प्रकरणात भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी ओढलेले ताशेरे अत्यंत महत्त्वाचे आहेत. कॅगच्या अहवालानुसार, नवीन धोरणाच्या सदोष अंमलबजावणीमुळे दिल्लीच्या तिजोरीला सुमारे काही कोटी रुपयांचा महसुली तोटा सहन करावा लागला.दिल्ली मद्य धोरणाचे हे प्रकरण केवळ राजकीय संघर्षापुरते मर्यादित नसून, ते 'प्रशासकीय पारदर्शकता' आणि 'सार्वजनिक महसूल' यांच्या रक्षणाबाबत मोठे प्रश्न उपस्थित करते.

कोणताही धोरणात्मक निर्णय घेताना तो सर्वसामान्य जनतेच्या हिताचा असावा की ठराविक लोकांच्या फायद्याचा, हा यातील कळीचा मुद्दा आहे. लोकशाहीत तपास यंत्रणांची निष्पक्षता आणि न्यायालयाचा न्यायनिवाडा हेच खरे सत्य समोर आणतात. मात्र, यानिमित्ताने सार्वजनिक तिजोरीचे नुकसान टाळण्यासाठी धोरणकर्त्यांचे उत्तरदायित्व किती महत्त्वाचे असते, याचा धडा सर्वच राजकीय पक्षांनी घेण्याची गरज आहे.

**अविनाश देशपांडे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

# नगरसेवकांच्या निषेधार्थ काम बंद!

## यवतमाळ नगर परिषदेत अधिकारी–कर्मचाऱ्यांचे आंदोलन

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - नगर परिषद यवतमाळ येथे काही नगरसेवकांकडून अधिकारी व कर्मचाऱ्यांशी वारंवार अयोग्य व अवमानकारक वर्तन होत असल्याच्या निषेधार्थ बुधवारी (दि. 11 मार्च) नगर परिषद अधिकारी व कर्मचारी यांनी एकदिवसीय कामबंद आंदोलनाचा इशारा देत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटना, यवतमाळ व नगर परिषद कर्मचारी संघटना यांच्या वतीने नगर परिषद अध्यक्षा यांना यासंदर्भात लेखी निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, नगर परिषदेमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांशी काही नगरसेवकांकडून वारंवार उध्दट व अवमानकारक भाषेत बोलणे, शिवीगाळ करणे तसेच कार्यालयीन कामकाजात अनावश्यक हस्तक्षेप करण्याचे प्रकार घडत आहेत. या प्रकारामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांचा आत्मसन्मान दुखावला जात असून कार्यालयीन वातावरणावरही विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, दि. 23 फेब्रुवारी 2026 रोजी बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता उत्कर्ष टेंभुर्णे हे कार्यालयात उपस्थित असताना एका नगरसेवकाने त्यांच्या प्रभागातील कामासंदर्भात अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून सर्व कर्मचाऱ्यांसमोर त्यांचा अपमान केला. संबंधित कामाशी त्यांचा कोणताही संबंध नसतानाही त्यांच्याशी अशा प्रकारे वर्तन करण्यात आले, ही बाब अत्यंत निषेधार्ह असल्याचे संघटनेने म्हटले आहे. तसेच बुधवारी (दि.11 मार्च) दुपारी सुमारे 12.23 वाजता बाजार अधीक्षक हरीश जाधव यांच्या कक्षात येऊन त्याच नगरसेवकाने पुन्हा शिवीगाळ करून त्यांचा सर्वांसमोर अपमान केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. यापूर्वीही अशा प्रकारच्या घटना घडल्याची माहिती देत संघटनेने याबाबत प्रशासनाचे मौखिक लक्ष वेधले होते. मात्र कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अधिकारी व कर्मचारी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला असून सुरक्षिततेचा व सन्मानपूर्वक काम करण्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटना व नगर परिषद कर्मचारी संघटना यांच्या वतीने या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवून बुधवारी (दि. 11 मार्च) एक दिवस कामबंद आंदोलन करण्यात येत असल्याची सूचना प्रशासनाला देण्यात आली आहे. तसेच संबंधित नगरसेवकांना समज देऊन अधिकारी व कर्मचारी यांना सुरक्षित आणि सन्मानपूर्वक काम करण्याचे वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने प्रशासकीय कार्यवाही करावी, अन्यथा उद्भवणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर नागेश कपाटे, राकेश भोयर, हरीश जाधव, उत्कर्ष टेंभुर्णे, अक्षय नवलकार, गौरव, जयेश लोखंडे, वैभव ठाकूर, अमोल गवळी आदी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

नगरसेवक-कर्मचारी वादावर नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांची मध्यस्थी : नगर परिषद यवतमाळ येथे नगरसेवक आणि अधिकारी-कर्मचारी यांच्यात निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी तणावाचे वातावरण निर्माण झाले. काही नगरसेवकांकडून कर्मचारी वर्गाशी अयोग्य वर्तन झाल्याचा आरोप करत कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांनी दोन्ही बाजूंमध्ये मध्यस्थी करत सामंजस्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला.नगराध्यक्ष उईके यांनी कर्मचारी व नगरसेवकांची बाजू समजून घेत चर्चा केली व कर्मचारी वर्गाला कामकाज पुन्हा सुरळीत सुरू करण्याचे आवाहन केले. लोकशाही प्रक्रियेतून निवडून आलेले नगरसेवक प्रभागाच्या विकासासाठी कार्यरत असून विविध विकासकामांना वेग आला आहे. त्यामुळे कर्मचारी वर्गाने संयम राखून सहकार्य करावे, असे त्यांनी सांगितले. तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नगरसेवक यांच्याशी सन्मानपूर्वक संवाद साधावा व विशेषतः महिला नगरसेविकांना योग्य मान-सन्मान द्यावा, विकासकामे प्रभावीपणे राबविण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाने समन्वयाने काम करणे आवश्यक असल्याचे नगराध्यक्षांनी यावेळी नमूद केले. बेकायदेशीर वसुली सहन केली जाणार नाही : पिंटू बांगर : यवतमाळ नगर परिषद हद्दीत दैनिक वसुली करताना काही कर्मचारी व्यापाऱ्यांकडून पावती न देता पैसे घेत असल्याची तक्रार माझ्याकडे आली. होळीच्या दिवशी काही व्यापाऱ्यांनी हा प्रकार निदर्शनास आणून दिल्यानंतर मी तात्काळ स्टेट बँक चौक परिसरात जाऊन पाहणी केली आणि संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. नगर परिषदेची वसुली पूर्णपणे पारदर्शक व नियमांनुसार व्हावी, हीच आमची भूमिका आहे. बेकायदेशीर वसुली किंवा कोणताही गैरप्रकार सहन केला जाणार नाही. या प्रकरणातील दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई होईपर्यंत मी हा विषय लावून धरणार असून व्यापाऱ्यांचे हित जपण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार आहे.

# काळी वनपरिक्षेत्रातील पोखरी घाट परिसरात निलगायीची शिकार

## वनपरिक्षेत्र अधिकारी व वनक्षेत्रपाल यांच्या कार्याप्रनालीवर प्रश्नचिन्ह?

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - विधानसभा क्षेत्रातील तसेच काळी (दौलत खान) वनपरिक्षेत्रांतर्गत मौजा पोखरी घाटातील परिसरामध्ये निलगायीची शिकार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे .सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात शिकाऱ्यांनी जाळे रचून निलगाय/रोही पकडून धारधार शस्त्रांनी तिची हत्या करून अवयव कापून नेल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले.

मंगळवारी नागरिकांना पोखरी शिवारातील घाट परिसरात निलगायीचा मृतदेह अवयव व मास कापून नेलेल्या अवस्थेत आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच काळी दौ .वनपरिक्षेत्रातील अधिकारी व क्षेत्र सहाय्यक हे घटनास्थळी पोहोचून शिकार झालेल्या नील गाईचे शुभविच्छेदान करण्यासाठी महागाव येथील पशुधन विकास अधिकारी अमित कुमार झा यांनी केले शिकार केलेल्या निलगाईच्या मासाचे नमुने घेऊन फॉरेन्सिक लॅबला पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. याप्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 अंतर्गत विविध कलमान्वये अज्ञान व्यक्ती विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या घटनेबाबत काळी दौ. वनपरिक्षेत्र अधिकारी सम्राट मेश्राम यांना दूरध्वनीवरून सदर घटनेबाबत विचारणा करण्यासाठी फोन केला असता त्यांचा फोन अर्धा तास व्यस्त दाखवून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. पुसद विधानसभा क्षेत्रातील काळी दौलत वनपरिक्षेत्रातील मोठ्या प्रमाणात जंगल असून या जंगलात अनेक वन्यजीव प्राणी आहेत या अगोदर सुद्धा असिच निलगाईची शिकार करून मासाची तस्करी करणारे आरोपी यांना अटक करण्यात आले होते. त्याचीच पुनरावृत्ती पुन्हा पुन्हा या रेंजमध्ये होत असून अशा घटना घडत असल्यामुळे काळी रेंजचे वनपरिक्षेत्र अधिकारी व क्षेत्र सहाय्यक यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. तसेच गुंज वर्तुळातील नदीवरील रेती तस्करी करणारे वाळू माफिया हे जंगलातून जेसीबी द्वारे रस्ता करून वाळूची तस्करी करीत असल्याचे परिसरातील शेतकऱ्यांना नाहक त्रास असल्याचे बोलल्या जात आहे, या रेती तस्करांना जंगलातून रस्ता करून देण्यासाठी गुंजवर्तुळाचे क्षेत्र सहाय्यक संतोष बदुकले हे अंशी ते एक लाख रुपये हप्ता घेऊन या नदीवरील वाळू तस्करीसाठी माफियांना मूकसंमती देण्याचे काम सुरू आहे यामुळे परिसरातील शेतकरी हे या रेती माफियामुळे त्रस्त झाले असून याकडे मुख्य संरक्षक वनवृत्त यवतमाळ, तसेच उपवनसंरक्षक वनविभाग पुसद यांनी लक्ष देण्याची गरज आहे अशी गुंज परिसरातील शेतकऱ्यांची मागणी होत आहे.

# वेचक

## योगिता मासाळ (देवकते) यांची भाजप युवती प्रमुखपदी नियुक्ती




यवतमाळ - भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बळकटीसाठी विविध पदांवर कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या देण्याचा क्रम सुरू असताना, योगिता मासाळ (देवकते) यांची भाजपच्या युवती प्रमुख (जिल्हा अध्यक्ष) पदी नियुक्ती करण्यात आली आहे. माजी मंत्री मदन येरावार आणि जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल चौहान यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने ९ मार्च रोजी आयोजित कार्यक्रमात त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. जिल्हा महामंत्री रेखाताई कोठेकर, महिला जिल्हाध्यक्ष शैला मिर्झापुरे व महिला मोर्चाच्या महामंत्री निर्मला विनकरे यांच्या हस्ते योगिता मासाळ (देवकते) यांना अधिकृत नियुक्तीपत्र देण्यात आले.या कार्यक्रमाला प्रदेश सचिव मायाताई शेरे, जिल्हा उपाध्यक्ष कीर्तीताई राऊत, शहराध्यक्ष लक्ष्मी सातपुते, पुष्पलता सप्रे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी योगिता मासाळ यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## भाजपा महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी वर्षा पेंदोर यांची निवड



घाटंजी - तालुका भाजपा महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी (ग्रामीण )वर्षा नरेश पेंदोर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काल विश्राम गृह घाटंजी येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने एका सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्या सभेत आर्णी विधानसभेचे लोकप्रिय आमदार प्रा.राजू तोडसाम आणि लोकनेते अण्णासाहेब पारवेकर यांच्या मार्गदर्शनाने तालुका अध्यक्ष विजयसिह बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्षा पेंदोर यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.वर्षा पेंदोर यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत भारतीय जनता पार्टीचे ध्येय व धोरण, पक्षाची विचारधारा तालुक्यात अधिक मजबूत होतील आणि त्यांच्या कार्यक्षेत्रात पक्ष संघटन वाढविण्यासाठी व महिला संघटन वाढीसाठी चांगली मदत होणार असल्याचा विश्वास पक्ष श्रेष्टींनी यावेळी दाखविला. यावेळी विजयजी बैस,सुरेश डहाके,रमेश धुर्वे,राम खांडरे, बंडू तोडसाम, रत्नाकर गावंडे, विनय जाधव,अरविंद जाधव, साधना माडूरवार,सोनल ठाकरे, यांच्या सह आदी महिला व पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.वर्षा पेंदोर यांच्या निवडीने तालुक्यातुन सर्वत्र त्यांच्यावर अभिनंदनाचा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## झीरपुरवाडी येथे ६० महिलांना साडीचोळी देऊन केले सन्मानित



दिग्रस - जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर झीरपुवाडी येथील विविध क्षेत्रात व दिव्यांग, विधवा तसेच शासकीय नोकरी करणाऱ्या महिलांना साडीचोळी वाटप कार्यक्रमाचे आयोजन रुपेश राठोड तसेच ग्रामपंचायत झिरपुरवाडी संयुक्तपणे केले होते. गावातील विविध क्षेत्रातील ६० महिलांना सन्मानित करण्यात आले. सर्व प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशासक पुरुषोत्तम कुडवे, प्रमुख पाहुणे डॉ. संजय कांबळे, रुपेश राठोड, प्रा. उमेश ठाकरे, कान्हुजी मिरासे, विलास डहाणे, रोजगार सेवक शंकर जुडे कारभारी हरी भाऊ राठोड, काजल दुर्गे, पो. पाटील वच्छला मिरासे, आशा सेविका सुनिता बोरचाटे, महानंदा टोगळे, मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय राठोड तर प्रास्ताविक काजल दुर्गे यांनी केले. आज महिलांचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल या पुरते मर्यादित राहिले नाही. महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून समाजकारण, राजकारण तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. ग्रामीण महिलांनाही आपण कुठेही कमी नाही हे लक्षात घेऊन समाजाला दिशा देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन डॉ. संजय कांबळे यांनी केले. महिलांनी स्वतःची क्षेमता ओळखुन निवडलेल्या क्षेत्रात प्रगती करणे शक्य असल्याचे सांगितले. महिलांनी पुढे येत समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करावी, असा संदेशही प्रशासक पुरुषोत्तम कुडवे यांनी यावेळी दिला. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# यवतमाळ येथे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे धरणे आंदोलन

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या प्रांतिक कार्यकारणीच्या आदेशानुसार विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने आज शिक्षण अधिकारी माध्यमिक कार्यालयासमोर दिनांक 10/3/2026 रोजी दुपारी ठिक तीन ते पाच वाजेपर्यंत धरणे आंदोलन करण्यात आले.

याप्रसंगी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या 45 मागण्यांचे निवेदन शासनाला पाठवण्यात आले. निवेदन स्वीकारण्यासाठी शिक्षण अधिकारी कार्यालयाच्या वतीने उपशिक्षणाधिकारी सौ नाईक मॅडम व रत्ने मॅडम यांनी आंदोलन स्थळाला भेट दिली व संघटनेचे निवेदन स्वीकारले. या आंदोलनाला विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतिक अध्यक्ष अरविंद देशमुख जिल्हा अध्यक्ष पवन बन जिल्हा कार्यवाह रामकृष्ण जीवतोडे मुख्याध्यापक संघाचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष प्रकाश भुमकाळे ,भूमन्ना भूमकंटीवार , शिक्षक महामंडळाचे कार्यकारिणी पदाधिकारी आनंद मेश्राम सर,महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या महिला प्रतिनिधी सौ संध्या जिरापुरे सदस्य विमाशीचे जिल्हा कार्याध्यक्ष विजय खरोडे मार्गदर्शक मनोज जीरापुरे उपाध्यक्ष साहेबराव धात्रक, श्रावणसिंग वडते, श्याम बोंडे, अशोक अकूलवार सर ,श्रीकांत अंदुरकर सहकार्यवाह विठ्ठल परांडे ,गजेंद्र काकडे ,उमाकांत राठोड, नरुले सर, प्रदीप टोणे , वाघमारे सर,अरूण गारघाटे, विजय गौरकार , रासमुडगुलवार सर कावळे सर खंडारे सर बागडे सर इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष पवन बन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या आंदोलनाचे प्रस्ताविक जिल्हा कार्यवाह रामकृष्ण जीवतोडे सर यांनी केले तर संचालन विजय खरोडे यांनी केले. या आंदोलनामध्ये शासन स्तरावर करायच्या 45 मागण्या सोबतच जिल्हास्तरावरील मागण्यांवर सुद्धा चर्चा करण्यात आली. त्यामध्ये विदर्भ माध्यमिक शिक्षक संघा कडून 31 मार्च पर्यंत जिपीएफ स्लिप देण्याची आग्रही मागणी करण्यात आली 31 मार्चपर्यंत जिपीएफच्या पावत्या न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला. त्याचप्रमाणे थकीत बिला मध्ये येणाऱ्या त्रुटीवर सुद्धा चर्चा करण्यात आले.या धरणे आंदोलनाला मोठ्या प्रमाणात उपस्थिती दिसून आली.

# नॅचरल शुगरच्या १० व्या गळीत हंगामाची सांगता विदर्भात सर्वाधिक गाळपाचा विक्रम

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि., युनिट २ गुंज सवना या कारखान्याच्या दहाव्या गळीत हंगामाची सांगता मंगळवार दि. १०/०३/२०२६ रोजी श्री दत्तात्रय कदम डीजीएम यांचे शुभहस्ते गव्हाण पुजन करून करण्यांत आली. यावेळी कारखान्याचे अधिकारी सर्वश्री नामदेव तोकलवाड वर्क्स मॅनेजर, विपूल गोयल प्रोसेस मॅनेजर, दत्तात्रय केंद्रे केन मॅनेजर ,पडळ साहेब यांचेसह सर्व कर्मचारी उपस्थित होते. यावर्षी नॅचरल शुगरने दहाव्या गळीत हंगामात एकूण ५ लाख ५५ हजार ६५८ मे. टन उच्चांकी गाळप करून विदर्भात सर्वाधीक गाळपाचा विक्रम केला आहे.

नॅचरल उद्योग समुहाचे संस्थापक कृषिरत्न श्री बी. बी. ठोंबरे, चेअरमन व कार्यकारी संचालक यांचे मार्गदर्शनात मागील वर्षी महागांव, पुसद व उमरखेड तालुक्यातील शेतक-यांनी ८,३०० हेक्टरच्या ऊस नोंदी कारखान्याकडे केल्यानंतर नोंदीचा संपूर्ण ऊस वेळेत गाळप करण्याचेदृष्टीने अत्यंत सक्षमपणे नियोजन केले व वाढीव गाळप क्षमतेने १२८ दिवसांत नोंदीच्या व बिगर नोंदीच्या संपूर्ण ऊसाचे गाळप पूर्ण केले आहे. दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी शेतक-यांनी दाखविलेल्या प्रचंड विश्वासार्हतेमूळे नॅचरल शुगरने यावर्षी सुध्दा विदर्भात उच्चांकी गाळपाचा विक्रम केला आहे. चालू हंगामात गाळपास आलेल्या ऊसाच्या पहील्या हप्त्याची रक्कम रू. २,७००/-प्रतिटनाप्रमाणे शेतक-यांना विनाविलंब नियमीत वाटप करण्यांत आलेली असून दुस-या व अंतीम हप्त्याची रक्कम सुध्दा दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी शेतक-यांना पेरणी व ऊस मशागतीसाठी जुनच्या पहील्या आठवड्यात देण्यांत येणार असल्याचे श्री ठोंबरे यांनी यावेळी जाहीर केले आहे. यावर्षी लागवड केलेल्या आणि खोडवा ऊसांसाठी नॅचरल शुगरने शेतक-यांना 'नॅचरल ऑरगॅनिक फर्टीलायझर' (एनओएफ) सेंद्रीय खत अत्यंत माफक दरांत शेती विभागाचे प्रत्येक गट कार्यालयमध्ये उपलब्ध करून दिलेले आहे. यामुळे शेतक-यांचा उत्पादन खर्च कमी होवून ऊस उत्पादनांत मोठ्या प्रमाणांत वाढ होणार असल्यामुळे याचा लाभ शेतक-यांनी घेवून ऊसाचे भरघोष उत्पादन घ्यावे असे आवाहन श्री ठोंबरे यांनी यावेळी शेतक-यांना केले. कारखान्याला ऊस पुरवठा करणारे ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी, कर्मचारी, तोडणी व वाहतूक कंत्राटदार तसेच ऊस तोड मजूर यांच्या सर्वांच्या सहकार्यामुळे कारखान्याने उच्चांकी गाळप करून गळीत हंगाम अत्यंत यशस्वीपणे पार पाडला, त्याबद्यल श्री बी. बी. ठोंबरे, चेअरमन व कार्यकारी संचालक यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# आंतरिक सुंदरतेला प्राधान्य द्या. मुलींनी करिअरकडे लक्ष द्यावे : प्रा. प्रियदर्शनी वाकडे

जनमाध्यम प्रतिनिधी



नेर - व्यक्तीच्या बाह्य सौंदर्यापेक्षा आंतरिक सुंदरतेला अधिक महत्त्व असून मुलींनी भावनांपेक्षा शिक्षण व करिअरला प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन राणी अमरावती येथील प्राचार्य प्रा. प्रियदर्शनी वाकडे यांनी केले. त्या नेहरू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित जागतिक महिला दिन कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उदय मांजरे होते, तर सिनेमॅटोग्राफर धनश्री निरज जवके या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

प्रा. वाकडे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना शिकत असतानाच जीवनातील कार्यक्षेत्र निश्चित करण्याचा सल्ला दिला. मुखातून निर्मळ वाचा, हात गरिबांच्या पाठीशी, डोक्यात सकारात्मक विचार आणि पाय सतत गतिमान ठेवून जीवनाचा विचार करावा, असे त्यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. शांतरक्षित गावंडे यांच्या संयोजनात घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. स्वप्नाली वीर हिला प्रथम, योगिनी दांडगे व जान्हवी भोयर यांना द्वितीय, अभय चव्हाण यास तृतीय तर नूतन घावडे हिला प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. प्रास्ताविक डॉ. शीतल जाधव यांनी केले तर डॉ. संदीप काटोले यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाला विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'रस्ता नाही, टोल कशाचा?' म्हणत महाविकास आघाडीचा हल्लाबोल, टोल नाक्याची तोडफोड

जनमाध्यम प्रतिनिधी



दारव्हा - दारव्हा ते कारंजा मार्गावरील भुलाई-भांडेगाव परिसरातील टोलनाका बेकायदेशीर असल्याचा आरोप करत महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी आक्रमक आंदोलन करत टोलनाक्याची तोडफोड केली. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुलभाऊ ठाकरे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

महाविकास आघाडीच्या वतीने २ मार्च २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी दारव्हा यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यवतमाळ तसेच मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन दारव्हा–कारंजा मार्गावरील टोलनाका तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र शासन व प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. यानंतर संतप्त कार्यकर्त्यांनी दारव्हा–कारंजा रोडवरील भुलाई-भांडेगाव येथील टोलनाक्यावर धडक देत तेथील संरचनेची तोडफोड करत टोलनाका बंद पाडला. दारव्हा तालुक्यातील २० ते ३० किलोमीटर परिसरातील खेड्यांतील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व वाहनधारकांना या टोलनाक्यावर अतिरिक्त टोल भरावा लागत असल्याची तक्रार आंदोलनकर्त्यांनी केली. दिग्रस–दारव्हा–कारंजा (भांडेगावपर्यंत) असा सुमारे ४८ किलोमीटरच्या रस्त्यासाठी टोल मंजूर करण्यात आला आहे. मात्र दिग्रस ते दारव्हा हा रस्ता पूर्णपणे सिमेंट कॉंक्रीटचा झाला असला तरी दारव्हा ते कारंजा (भांडेगावपर्यंत) या मार्गावर अद्याप कोणतेही काम झाले नसल्याचा आरोप करण्यात आला.

# आदिवासी मंत्री 'भागुबाई' नको ; हक्कासाठी लढणारा 'वीर' मंत्री हवा : प्रा. वसंत पुरके

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - आदिवासी विकास विभागाचा निधी इतर विभागांकडे वळवला जात असताना संबंधित आदिवासी मंत्री मात्र गप्प बसले आहेत. निधीअभावी आदिवासी समाजाच्या विविध कल्याणकारी योजनांना ब्रेक लागत असून उपलब्ध निधीही वेळेवर मिळत नसल्याची टीका माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंत पुरके यांनी केली. राळेगाव येथे १२ मार्च रोजी होणाऱ्या क्रांतिवीर बाबुराव शेडमाके जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रा. पुरके म्हणाले की, सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवण्यात आल्यावर संबंधित मंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली होती. मात्र आदिवासी विकास विभागाच्या बाबतीतही तसाच प्रकार होत असतानाही आदिवासी मंत्री कोणतीही ठोस भूमिका घेताना दिसत नाहीत. याचा थेट फटका आदिवासी समाजाच्या कल्याणकारी योजनांना बसत आहे. ते पुढे म्हणाले की, राज्यातील आश्रमशाळांमध्ये सुमारे ६६ हजार शिक्षक व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. अनेक ठिकाणी भव्य इमारती असूनही विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी शिक्षक उपलब्ध नसल्याने आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

अलीकडच्या काळात ॲट्रॉसिटीसारख्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याची चिंताही त्यांनी व्यक्त केली. तसेच मोहाच्या फुलांपासून तयार होणाऱ्या उत्पादनांवर आधारित उद्योग उभारण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. "क्रांतिवीर बाबुराव शेडमाके हे शौर्याचे प्रतीक होते.

# घरकुल अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होत नसल्याबाबत गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

जनमाध्यम प्रतिनिधी



पांढरकवडा - घरकुल अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात वेळेवर जमा होत नसल्याबाबत शेतकरी विजय खापर्डे यांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या घरकुल लाभार्थ्यांचे अनुदान गेल्या दोन ते तीन महिन्यापासून घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केले असे घरकुल कार्यालयामार्फत सांगण्यात येत आहे.

परंतु घरकुल अनुदान लाथ्यांर्थाच्या खात्या पुस्तकात मध्ये जमा होत नसल्याने अनेक लाभार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. पंचायत समितीत घरकुल कार्यालयात रोज घरकुल लाभार्थाना हेलपाटे मारावे लागत आहे व तसेच बँकेमध्ये घरकुलांचे पैसे जमा झाले की नाही यासाठी लाभार्थ्यांना बँकेमध्ये रोज चकरा मारावे लागत आहे. करिता गटविकास अधिकारी यांनी जातीने लक्ष घालून घरकुल लाभार्थ्यांना अनुदान लवकरात लवकर देण्यासाठी मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यवतमाळ यांना कळवावे तसेच आपल्या कार्यालयातील घरकुल अधिकारी कर्मचारी यांना आदेश देण्यात यावी कारण यामध्ये शेतकरी लाभार्थी असल्यामुळे पावसाळा सुद्धा होण्यापूर्वी त्यांचे घरकुल बांधकाम पूर्ण झाले पाहिजे असे निवेदन गटविकास अधिकारी यांना विजय खापर्डे यांनी दिले असून लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करतांना अनुदान रकमेचा हफ्ता वेळेवर मिळेल जेणे करून घरकुल योजना अंतर्गत घराचे काम लवकरात लवकर होईल.

# जि.प. कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या नोकरभरतीला स्थगनादेश

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था (रजि. क्र. १०९) येथे सुरू असलेल्या ९ कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेला विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था अमरावती यांनी ११ मार्च रोजी स्थगनादेश दिला आहे. जि.प. प्राथमिक शिक्षक संघ (र.नं. २३५) चे कार्याध्यक्ष व संस्थेचे सभासद आसाराम चव्हाण यांनी या भरतीविरोधात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १५४ अन्वये पुनरीक्षण अर्ज दाखल केला होता. त्या अर्जावर सुनावणी होऊन हा आदेश देण्यात आला.

यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मागील काही वर्षांपासून विविध वादांमुळे चर्चेत आहे. संस्थेची सभासद संख्या पूर्वी सुमारे ८ हजार होती, ती आता सुमारे ५ हजारांवर आली आहे. सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांनाही पुरेसे काम नसताना संचालक मंडळाने ९ कर्मचाऱ्यांच्या भरतीची प्रक्रिया सुरू केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या भरतीसाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यवतमाळ यांनी २४ फेब्रुवारी २०२६ रोजी परवानगी दिली होती. मात्र, कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नती न देणे, अनुकंपा तत्वावरील अर्जदारांना प्राधान्य न देणे आणि सभासदांच्या आक्षेपांवर सुनावणी न घेता परवानगी देण्यात आल्याचे मुद्दे मांडत आसाराम चव्हाण यांनी विभागीय सहनिबंधकांकडे दाद मागितली होती. या प्रकरणात पतसंस्थेच्या वतीने ॲड. सुभाष बोबडे तर आसाराम चव्हाण यांच्या वतीने ॲड. निलेश गावंडे यांनी युक्तिवाद केला. यानंतर विभागीय सहनिबंधकांनी भरती प्रक्रियेला स्थगनादेश देत पुढील सुनावणी २५ मार्च २०२६ रोजी ठेवली आहे.दरम्यान, ही भरती तात्काळ रद्द करावी, सभासद कर्जावरील व ठेवींवरील व्याजदर ९ टक्के करावा तसेच इतर मागण्यांसाठी १५ मार्च रोजी पतसंस्थेसमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिक्षक संघटनेने दिला आहे.

# भाजपा महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी सौ. वर्षा पेंदोर यांची निवड

जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - भाजपा महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी (ग्रामीण )सौ. वर्षा नरेश पेंदोर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काल विश्राम गृह घाटंजी येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने एका सभेचे आयोजन करण्यात आले होते.

त्या सभेत आर्णी विधानसभेचे लोकप्रिय आमदार प्रा. राजूभाऊ तोडसामआणि लोकनेते अन्नासाहेब पारवेकर यांच्या मार्गदर्शनाने तालुका अध्यक्ष श्री विजयसिह बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत सौ.वर्षाताई पेंदोर यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.वर्षाताई पेंदोर यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत भारतीय जनता पार्टीचे ध्येय व धोरण, पक्षाची विचारधारा तालुक्यात अधिक मजबूत होतील आणि त्यांच्या कार्यक्षेत्रात पक्ष संघटन वाढविण्यासाठी व महिला संघटन वाढीसाठी चांगली मदत होणार असल्याचा विश्वास पक्षश्रेष्टींनी यावेळी दाखविला. यावेळी विजयजी बैस,सुरेशजी डहाके , रमेश धुर्वे,राम खांडरे, बंडू तोडसाम, रत्नाकर गावंडे, विनय जाधव,अरविंद जाधव, अंबादास मेश्राम, नरेश पेंदोर,विजय कनाके,सौ.साधनाताई माडूरवार,सौ. सोनल ठाकरे,सौ.लता ठाकरे,सौ.सुषमा खांडरे, संगीता पडलवार, सौ. संध्याताई मरापे, सौ उषाताई बेस्कर, सौ. रंजनाताई कोवे, सौ. मालाताई गेडाम, मीराबाई किनाके, सौ. वनिता खांडरे यांच्या सह आदी महिला व पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.वर्षाताई पेंदोर यांच्या निवडीने तालुक्यातुन सर्वत्र त्यांच्यावर अभिनंदनाचा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## संक्षिप्त

### घटस्फोटितांचे पुनर्विवाह परिचय संमेलन २२ मार्चला

**अमरावती-** माळी समाजातील विधवा, विदुर, घटस्फोटित युवक युवती, वयस्कर स्त्री पुरुष व पुनर्विवाहितांचे नववे राज्यस्तरीय परिचय संमेलन रविवार २२ मार्च रोजी सकाळी ११ ते ४ पर्यंत अस्मिता विद्या मंदिर, पन्नालाल नगर, अमरावती येथे स्थानिक सामाजिक परिवर्तन परिषद व श्री माळी वैभव नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले आहे.अध्यक्षस्थानी माळी वैभवचे संचालक मनोहर चलपे उपस्थित राहतील. याप्रसंगी उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते 'मंगलगाठी' परिचय पुस्तिकेचे विमोचन करण्यात येईल. सदर संमेलनामध्ये इच्छुक समाज बांधव युवक युवती पालकांनी दिनांक १५ मार्चपर्यंत नोंदणी करून सहभागी व्हावे असे आवाहन संमेलनाचे संयोजक यांनी केले आहे. अधिक माहिती करिता ९८६०२५१३६८ वर संपर्क साधावा.



### बडनेरा आगारात जागतिक महिला दिन

**अमरावती-** बडनेरा आगारामध्ये जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी आगारातील महिला कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. यावेळी उपस्थितांनी महिलांच्या कष्ट, समर्पण आणि कार्यक्षमतेचा गौरव करत त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यानंतर नृत्य, गाणी, खेळ तसेच मनोरंजनात्मक उपक्रमांमधून महिला कर्मचाऱ्यांनी आपले कौशल्य सादर केले. त्यामुळे संपूर्ण वातावरण आनंदाने आणि उत्साहाने भरून गेले.या दीपमाला गोलाईत उपक्रमात वैशाली खांडेकर, विद्या मोरे, वैशाली उके, वैशाली वानखडे,पुनम लटवे, वर्षा बावणे, प्रीती बागडे, ज्योती मेटकरी, कांचन सदाफळे, प्रिया गेडाम, सीमा शेंडे, विद्या चव्हाण, छाया खेडकर, अविका यादव, साधना मुंद्रे, सुनीता कवाने, बबिता तुपे, विना मुरेकर, छाया लाटेकर, प्रिया माहुलकर, सरिता पवार, ईंदुरकर , निशीगंधा हिंगें, सविता इंगोले, पदमा पाचघरे, यांसह अनेक महिला कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना साठी कार्यशाळा अधिक्षक देशमुख साहेब,तसेच वाहतूक अधिक्षक भुमिका रोडगे, वाहतूक नियंत्रक मनोज मलातपुरे, संजय श्रीराव, दिनेश शेळके, विनायक मार्कंड,चंद्रशेखर पवार,गजानन पचगाडे आदी अधिकाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.संचालन विद्या मोरे यांनी केले.

### ज्युडो (पुरूष) स्पर्धेकरिता संघ घोषित

**अमरावती -** चंदिगड युनिर्व्हसिटी, मोहाली (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ज्युडो (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूंमध्ये बी.बी. आर्टस्, एन.बी. कॉमर्स अॅन्ड बी.पी. सायन्स कॉलेज, दिग्रसचा सागर जाधव, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा ओमसिंह चौहाण, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा वेध बुंदेले व जी.एस. टोम्पे मगाविद्यालय, चांदुरबाजारचा यश पिढेकर याचा समावेश आहे.

## घरटॅक्स थकबाकी वसुलीसाठी पाणी बंद

# जीवनावश्यक गरजांचा गैरफायदा घेत दहशतवादी करार-प्रमोद पांडे

**अमरावती/का.प्र.**

नुकताच महानगरपालिका आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यात झालेला करार शहरात एक गंभीर प्रश्न उभा करणारा ठरणार असून, मनपा व मजिप्रा कर वसुलीसाठी प्रशासन किती दूर, कोणत्या स्तरावर जाऊ शकते याचा पुरावाच सोबत दिलेला आहे. मालमत्ता कर थकबाकी असल्यास घराचा पाणीपुरवठा बंद करणे आणि पाणीपट्टी थकबाकी असल्यास महानगरपालिकेच्या सेवांसाठी 'नो ड्यूज प्रमाणपत्र' अनिवार्य करणे ही तरतूद या करारामध्ये करण्यात आली आहे. महसूल वाढविण्याचा प्रशासनाचा हेतू समजण्यासारखा असला तरी हा मार्ग लोकशाही व्यवस्थेला साजेसा आहे का ? याचा विचार करणे आता, मतदारांनाच आवश्यक झाले आहे. पाणी ही केवळ सुविधा नाही, ती जीवनाची मूलभूत गरज आहे. अशा परिस्थितीत कर थकबाकीच्या कारणावरून पाणीपुरवठा बंद करणे म्हणजे नागरिकांच्या जीवनावश्यक गरजेवर निर्बंध आणणे होय. चुकी एका व्यक्तीची असली तरी त्याचा फटका संपूर्ण कुटुंबाला बसतो. कर वसुली ही नक्कीच आवश्यक आहे. शहराच्या विकासासाठी आणि सार्वजनिक सुविधांसाठी महसूल लागतोच. मात्र त्यासाठी दंड, व्याज, हप्त्यांची योजना, मोठ्या थकबाकीदारांवर विशेष कारवाई किंवा कायदेशीर मार्गाने वसुली, मालमत्ता जप्ती अशा अनेक उपाययोजना उपलब्ध आहेत. मात्र, त्याची अंमलबजावणी सोडून, या उपायांऐवजी पाणीपुरवठा बंद करणे हा मार्ग स्वीकारणे म्हणजे कठोरतेचा मार्ग निवडल्याची भावना निर्माण होऊ शकते. उन्हाळ्यात, संतप्त करणारा हा करारनामा वाचून एक दिवसाआडचे ३६५ दिवसांपैकी, १६५ च दिवस पाणी देणारी मजिप्रा आणि, मनपा या करारनाम्याचे पालन करूच शकत नसतांना हा करारनामा केलाच कशाकरिता असा प्रश्न प्रमोद पांडे व अंजली पांडे यांनी केला असून, या करारनाम्याचे पालन केले तर मनपा व मजिप्रा दोघांनाही, कायदेशीर गंभीर परिणाम भोगावे लागतील असे प्रमोद पांडे, वासुदेव अवसरे, किशोर कडु, अमोल आगाशे, बंटी जयस्वाल, वसंत पाटील, अंजली पांडे यांनी दिला आहे. या कराराला प्रमोद पांडे यांनी जीवनावश्यक गरजांचा गैरफायदा घेत दहशतवादी करार म्हटले.

## एससीएमएसच्या विद्यार्थ्यांची शिवम पार्ले फूड्स कारखान्याला भेट

**अमरावती/का.प्र.**

सिंबायोसिस सेंटर फॉर मॅनेजमेंट स्टडीज, नागपूर येथील प्रथम वर्ष आणि अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी संस्थेच्या कॉर्पोरेट रिलेशन्स सेलच्या पुढाकारातून शिवम पार्ले फूड्स (पार्ले-जी) या कारखान्याला एक नियोजित औद्योगिक भेट दिली. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना भारतातील अत्यंत परिचित अशा फास्ट-मूव्हिंग कन्झ्युमर गुड्स क्षेत्रातील अग्रगण्य ब्रँडच्या कार्यपद्धतीबाबत प्रत्यक्ष अनुभव आणि व्यावहारिक माहिती मिळवून देणे हा होता. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना अन्न उत्पादनाची प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण प्रणाली, पॅकेजिंग प्रक्रिया तसेच वितरण व्यवस्थापन या विविध टप्प्यांची सविस्तर माहिती देण्यात आली.शिवम पार्ले फूड्सचे



प्रतिनिधी अजय पाटकर यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. त्यांनी विद्यार्थ्यांना कारखान्याची सविस्तर पाहणी करून दिली तसेच संवादात्मक चर्चेद्वारे उद्योगातील प्रत्यक्ष कामकाजाची माहिती दिली, ज्यामुळे विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञान आणि प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव यांचा मेळ घालण्याची संधी मिळाली. या भेटीदरम्यान डॉ. दीपमाला सिंह आणि डॉ. श्वेतम गुप्ता यांनी विद्यार्थ्यांसोबत उपस्थित राहून संपूर्ण कार्यक्रमाचे मार्गदर्शन आणि देखरेख केली.ज्यामुळे विद्यार्थ्यांना संस्थात्मक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून समृद्ध अनुभव मिळाला.एससीएमएस नागपूरचे संचालक डॉ. समीर पिंगळे यांचे विद्यार्थ्यांना अशा उद्योगाभिमुख उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन आणि पाठबळ दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. तसेच कॉर्पोरेट रिलेशन्स सेलच्या फॅकल्टी-इन-चार्ज डॉ. तेजस्विनी पारळकर व डॉ. अजित साव यांचे मार्गदर्शनाबद्दल विशेष कौतुक करण्यात आले. कॉर्पोरेट रिलेशन्स सेलच्या सुपरवायझर एकता मालिया यांचेही या औद्योगिक भेटीच्या यशस्वी आयोजनासाठी आभार व्यक्त करण्यात आले.

## स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही मेळघातील २१ गावे अंधारात

### आ.सुलभा खोडके यांची विधिमंडळात माहिती

**अमरावती/का.प्र.**

स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही अमरावती जिल्ह्यातील धारणी -मेळघाट भागातील २१ दुर्गम गावांमध्ये अजूनही वीज पोहोचली नसल्याने प्रत्येक गावातील जवळपास ९० ते १०० कुटुंब हे अजूनही अंधारातच आहे.



यासंदर्भात अमरावती जिल्हा नियोजन समितीची बैठक असो किंवा विधानसभेचे अधिवेशन असो, वारंवार मुद्दा उपस्थित करून देखील आदिवासीं कुटूंबांना वीज पुरवठा करण्यासंदर्भात सक्षम यंत्रणा उभी होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. जिल्ह्यातील आदिवासी दुर्गम भागातील २१ गावांमध्ये वीजपुरवठा कधी पोहोचविणार? असा प्रश्न अमरावतीच्या आ.सुलभा खोडके यांनी राज्य विधिमंडळात उपस्थित केला.

तसेच या संदर्भात शासनाच्या वतीने प्रभावी उपाययोजना करून आदिवासीच्या जीवनातील अंधकार दूर करण्याची विनंती सुद्धा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना सभागृहासमक्ष केली.

अमरावती जिल्ह्यामध्ये धारणी ,मेळघाट, चिखलदरा ,भागात अनेक अतिदुर्गम गावे आहेत. त्यातील जवळपास २१ गावांमध्ये स्वातंत्र्यप्राप्ती पासून अजूनही वीज पोहोचली नाही. त्याठिकाणी प्रत्येक गांवामध्ये साधारणतः ९० ते १०० कुटुंब आहेत. यासंदर्भात जिल्हा नियोजन समितीच्या बैठक व विधानसभेमध्ये सुद्धा मुद्दा उपस्थित केला असता, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सांगितले कि, धारणी-मेळघाट भागातील काही दुर्गम गावांना ग्रीड कनेक्टेड पॉवर देता येत नसल्याने वर्ष २०१८ पासून सौभाग्य योजनेच्या माध्यमातून तेथील प्रत्येक घरी सोलर ऊर्जा उपलब्ध करण्यात व्यवस्था करण्यात आली.

मात्र ते ऑफ ग्रेड सोलर असल्याने काही कालावधी नंतर बंद पडत असल्याने ही प्रणाली सुद्धा यशस्वी होणार नसल्याचे लक्षात आले.

धारणी -मेळघाटातील अभयारण्य सारख्या भागात ग्रीड कनेक्टेड पॉवर साठी वन विभागाची परवानगी मिळणे कठीण असल्यामुळे सोलर व्हिलेज च्या धर्तीवर सदर गावांमध्ये सोलर मायक्रो ग्रीड तयार करण्याच्या दृष्टीने एक मोठा कॅपॅसिटी प्लांट उभा करण्याचे शासनाने ठरविले असल्याचे सांगितले.

## अपघातमुक्त अमरावतीकडे वाटचाल

# आरटीओच्या 'रस्ता सुरक्षा रथा'द्वारे व्यापक जनजागृती

**अमरावती/का.प्र.**

राज्यात वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी परिवहन विभागामार्फत रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत 'रस्ता सुरक्षा रथ' ही विशेष जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्याअंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांच्या वतीने सुसज्ज व आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असा रस्ता सुरक्षा रथ तयार करण्यात आला आहे.

या रथाचे उद्घाटन प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले तसेच त्यांनी रथाला हिरवी झेंडी दाखवून जनजागृती मोहिमेची औपचारिक सुरुवात केली.यावेळी सहाय्यक प्रादेशिक



परिवहन अधिकारी दीपक मेहरकर, मोटार वाहन निरीक्षक संजय पेंढारकर, जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक दीक्षा आढाव, अंकिता सराफ, श्रुतिका गोपीवार, अक्षय राठोड, अभिजीत गावंडे, पराग जाधव तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.रस्ता सुरक्षा रथाद्वारे हेल्मेट व सीटबेल्ट वापराचे महत्त्व, वाहतूक नियमांचे पालन, वेगमर्यादेचे भान, मद्यपान करून वाहन न चालविण्याचे आवाहन आदी विषयांवर प्रभावी जनजागृती करण्यात येणार आहे. हा रथ अमरावती शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये फिरून नागरिकांशी थेट संवाद साधणार आहे.

ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांचा प्रभावी वापर करून दृश्य व श्राव्य घटकांच्या साहाय्याने वाहनचालक आणि पादचारी यांच्यावर सकारात्मक परिणाम साधण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. मनोरंजनातून शिक्षण आणि सामाजिक संदेश देण्याची संकल्पना या रथामागे आहे.

> 'दृश्य, ध्वनी, आकर्षक प्रतिमा व संगीताच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा रथ नागरिकांच्या मनावर थेट परिणाम करतो. वाहतूक नियमांचे पालन ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. या उपक्रमामुळे निश्चितच अपघात कमी होण्यास मदत होईल.' उर्मिला पवार, प्रादेशिक परिवहन अधिकारी

# डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात मूट ट्रायल स्पर्धा

### विद्यार्थ्यांनी दाखवली वकिली कौशल्यांची चमक



**अमरावती/का.प्र.**

डॉ पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांना ट्रायल न्यायालयातील वकिली कौशल्यांची प्रत्यक्ष अनुभूती मिळावी या उद्देशाने 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती मूट ट्रायल स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा महाविद्यालयाच्या मूट कोर्ट हॉलमध्ये पार पडली. स्पर्धेत महाविद्यालयातील सुमारे १५ चमूंनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्घाटन २८ फेब्रुवारी रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ एक्झामिनेशन अँड इव्हॅल्यूएशनचे संचालक डॉ. नितीन कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. राजेश पाटील यांनी केले. प्राचार्या प्रा.डॉ. वर्षा देशमुख यांनी स्पर्धेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. अध्यक्षीय भाषणात डॉ. कोळी यांनी भविष्यातील सक्षम वकील घडवण्यासाठी अशा प्रकारच्या स्पर्धा अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगत महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.यावेळी व्यासपीठावर डॉ. एन. के. रामटेके व अॅड. नमिता अवस्थी उपस्थित होते.अंतिम फेरीसाठी परीक्षक म्हणून अमरावतीतील प्रख्यात विधिज्ञ अॅड. परीक्षित गणोरकर, अॅड. दिलीप तिवारी, अॅड. शिरीष जाखड व अॅड. परवेज खान यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला दैनिक हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. भैय्यासाहेब पाटील पुसदेकर होते. यावेळी मंचावर प्रा. डॉ. राजेश पाटील व डॉ. एन. के. रामटेके उपस्थित होते. स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांना ट्रॉफी व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेतील विजेते-बेस्ट टीम:प्रतीक्षा मेटकर, समृद्धी गिरी, गोविंद कोलिया,उपविजेता टीम : कृष्णा नलवाडे, प्रज्वल गायगोले, प्रज्वल उपासने,बेस्ट ॲडव्होकेट:कृष्णा नलवाडे,बेस्ट फीमेल ॲडव्होकेट:प्रतीक्षा मेटकर,बेस्ट चीफ एक्झामिनेशन:समृद्धी गिरी,प्रथमेश थोरात,बेस्ट क्रॉस एक्झामिनेशन:वैभव तायडे,बेस्ट जज:मयुरी चटाले,बेस्ट विटनेस : लवकुश तिडके,याशिवाय इतरही विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली.संचालन मुक्तीका कुबडे यांनी केले, तर रेणू उत्तमनी यांनी आभार प्रदर्शन केले.

## जंगलातून भटकलेले हरिण वस्तीत शिरले दोन तास रेस्क्यू; जंगल अधिवासात सोडले

**तिवसा/वार्ताहर**

तालुक्यातील मोझरी गावाला लागून असलेल्या जंगल क्षेत्रातुन अचानक भटकलेले एक हरिण थेट मोझरी गावात शिरले.त्या हरिणाला पकडण्यासाठी वनविभागाच्या टीम सह प्राणीमित्र सरसावले.अखेर २ तासाच्या रेस्क्यू नंतर हरिण पकडण्यात यश मिळाले.

सध्या कडाक्याची उन्ह तापत आहे.त्यामुळे उन्हात पाण्याच्या शोधात अंदाजे २ ते ३ वर्षाचे हरिण मोझरीच्या वस्तीत शिरले.त्यास पाहून अनेक गावठी कुत्र्यांच्या कळपाने हरिणाच्या पाठीमागे धाव ठोकली.त्यातून बचाव करण्यासाठी सदर हरीण धावत उड्या मारीत-मारीत राजू जावळे यांच्या घराच्या आवारात शिरले.हरिणाला पाहण्यासाठी बच्चे कंपनीसह अनेकांनी एकच गर्दी केली होती.हरीण गावात शिरल्याची माहिती वनविभागाला देण्यात आली तसेच प्राणीमित्र शुभम विघे यांनी घटनास्थळी धाव घेऊन हरिणावर



निगराणी ठेवून शांत केले.तिवसा वनविभागाचे वनपाल घोरमाडे,जांभे, राऊत यांनी घटनास्थळी पाचारण केले व परिस्थिती हाताळली.घराच्या आवारात घाबरून थांबलेल्या हरिणास जवळपास २ तास रेस्क्यू करून पकडले व १० वाजताच्या दरम्यान दासटेकडी लगत असलेल्या धानोरा-केकतपूर जंगल क्षेत्राच्या अधिवासात सोडून देण्यात आले.

## अ.भा.ग्राहक कल्याण परिषद अमरावती तर्फे निवेदन सादर

**अमरावती/का.प्र.**

१५ मार्च रोजी येणाऱ्या जागतिक ग्राहक दिनाच्या निमित्ताने ग्राहकांच्या समस्या व अडचणी सोडवण्यासाठी व जागृती करण्याच्या दृष्टिने विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा पुरवठा विभाग, तसेच जिल्हा ग्राहक संरक्षण विभाग यांना अमरावती जिल्हा व महानगर पदाधिकारी तर्फे विविध विषयावर चर्चा करून निवेदन देण्यात आले.

जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी निवेदन स्विकारून तुमच्या मागणी प्रमाणे ग्राहक दिनाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे आश्वासन दिले. तसेच कामगार उपआयुक्त



थोरात यांनी नव्याने अमरावती मध्ये पदभार स्विकारल्या बद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनीही कामगारांच्या कल्याण साठी नेहमी कटीबध्द राहिल असे आश्वासन दिले. यावेळी गजानन मुद्गल,अॅड. प्रभाकर वानखडे, निलेश रमेश टवलारे,उज्वला महाजन,कल्पना कुरमबंसी,शुभांगी सोळंके,निता ' डाखोडे, मयुर बासुंदे, नंदा राऊत,मनिषा मडावी,महेश पंडीत,रोहन ढोमणे, मुकेश पवार, महानगर संघटक बाळासाहेब देसाई आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# हव्याप्र मंडळात 'आत्मविशास आणि आत्मरक्षणाचा' सुरेख संगम

## जागतिक महिला दिनानिमीत्त आयोजन, महिला प्राध्यापक सह विद्यार्थीनींचा सहभाग

**अमरावती/का.प्र.**

आजच्या आधुनिक काळामध्ये महिलांची जबाबदारी ही दुहेरी स्वरूपाची झाली आहे. घर आणि ऑफीस, व्यवसाय अशी जबाबदारी सांभाळतांना महिला, युवतींना शारीरीक, मानसिक, आरोग्य आणि आत्मरक्षण असे कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज आहे. हीच भावना महिलांमध्ये व समाजामध्ये दृढ होण्याकरीता जागतिक महिला दिन एक सक्षम माध्यम ठरले आहे. समाजातील प्रत्येक युवक व युवती शारीरीक, मानसिक स्तरावर सक्षम व्हावे





याकरीता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अविरत कार्यरत असून महिला दिनाचे औचित्य साधून डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयाच्या वतीने बौद्धीक विकासासह आत्मविश्वास व आत्मरक्षणाचे धडे महिला प्राध्यापकासह विद्यार्थीनींना देण्यात आले.

श्री हव्याप्र मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सहभागृह येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डिसीपीई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख वक्ते अखिलेश बैतुले, मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, प्रा. दिपाताई चेंडके, प्रा. नाहीद परवीन उपस्थित होते. दिपप्रज्वलन व माता सरस्वती पुजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली.

बौद्धीक विकास तज्ञ अखिलेश बैतुले यांनी विविध प्रात्याक्षिके उपस्थितांकडून करवून घेत आनंदासोबत बौद्धिक व्यायामाचा सुंदर मिलाफ घडवून आणला.

कार्यक्रमाला मार्गदर्शन करतांना प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांनी विद्यार्थीनींना स्वतःला सक्षम करीत आदर्श व्यक्तीमत्व साकारावे असे मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांनी स्त्री एकाच जीवनामध्ये विविध भुमिका पार पाडत आहे.

मुलगी, बहिण, आई, पत्नी अशी आयुष्याची जबाबदारी पार पाडत असतांना स्वतःचे स्वतंत्र व्यक्तीमत्व जोपासावे, आपल्या कर्तृत्वातून आदर्श पीढी, आदर्श समाज कसा निर्माण करता येईल असे प्रेरणादायी मार्गदर्शन करीत सर्वांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अंकीता काळे यांनी केले. संचलन वंशिका बुंदेल तर आभार संस्कृती यांनी मानले.

# ज्ञानयज्ञातील अखंड तेज

# प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम शिवाजी वायाळ यांची प्रेरणायात्रा



'शिक्षण म्हणजे केवळ व्यवसाय नाही.तो एक ध्यास असतो. तो एक संस्कार असतो.तो एक दीप असतो.जो स्वतः जळून इतरांना प्रकाश देतो.'या प्रकाशयात्रेचे तेजस्वी नाव प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम शिवाजी वायाळ.

**बालपण-संस्कारांची पायाभरणी**

१८ फेब्रुवारी १९६८ रोजी बुलडाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील मनुबाई या साध्या, श्रमशील मातीत एक बालक जन्माला आले.ते म्हणजे डॉ. पुरुषोत्तम वायाळ.वडील श्री शिवाजी पुंजाजी वायाळ.आई सौ. शशीकलाबाई शिवाजी वायाळ. कष्ट, प्रामाणिकपणा आणि मूल्याधिष्ठित जीवन यांचे संस्कार बालपणापासूनच त्यांच्या मनावर कोरले गेले.ग्रामीण वातावरण साधी परिस्थिती.परंतु मोठी स्वप्ने आणि त्याहून मोठी जिद्द!मेरा बुद्रुक येथे वर्ग १ ते ८ पर्यंत प्राथमिक शिक्षण पूर्ण करताना त्यांनी केवळ पाठ्यपुस्तकातील धडेच नव्हे तर जीवनाचे धडे शिकले.१९८१ ते १९८४ श्री शिवाजी विद्यालय, चिखली येथे माध्यमिक शिक्षण.याच काळात शिक्षक होण्याची प्रेरणा दृढ झाली.

**शिक्षणाची अखंड साधना**

डी.एड.मेहकर येथे पूर्ण केले.यातून अध्यापनाचा पाया मजबूत झाला.१९८६ मध्ये अमरावती विद्यापीठातून कला स्नातक पदवी प्राप्त केली, पण हा शेवट नव्हता.ज्ञानाची तहान सतत वाढत राहिली.एम.ए., एम.एड.,सेट आणि अखेरीस पीएचडी केली. ही केवळ पदवी नव्हती तर ही ज्ञानसाधनेची तपश्चर्या होती.

**सेवायात्रेची सुरुवात**

५ ऑगस्ट १९८६ रोजी प्राथमिक आश्रम शाळा, अनचरवाडी येथे पहिली नियुक्ती.ग्रामीण,साधी शाळा. परंतु मोठ्या आशा आणि मोठी जबाबदारी.विद्यार्थ्यांना शिक्षणा ची गोडी लावणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, आणि शिस्तीचे संस्कार रुजविणे ही त्यांची पहिली कार्यभूमी.

१९९३ ते १९९८ या काळात श्री शिवाजी अध्यापक विद्यालय, चिखली येथे बदली.येथे त्यांनी अध्यापनाला वेगळी दिशा दिली. विद्यार्थ्यांच्या मनात विश्वास निर्माण केला.त्यांची अध्यापनशैली सोप्या भाषेत, उदाहरणांसह, जीवनाशी जोडलेली होती.

**कुटुंब-आधारस्तंभ**

१९९० साली सौ. सरस्वतीबाई यांच्याशी विवाह झाला. जीवनप्रवासात एक समजूतदार, सहकार्यशील साथीदार मिळाला. ३१ ऑगस्ट १९९२ सुपुत्र योगेश व २५ जुलै १९९६ कन्या पूजा यांचा जन्म झाला.कर्तव्य, कुटुंब आणि कार्य यांचा सुंदर समतोल राखत त्यांनी जीवनाचा आदर्श निर्माण केला.

## सेवानिवृत्तीनिमित्त

**नेतृत्वाचा नवा अध्याय**

१ सप्टेंबर २००५ श्री शिवाजी ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, चिखली येथे प्राचार्य म्हणून नियुक्ती झाली. या दिवसापासून सुरू झाला संस्थात्मक नेतृत्वाचा सुवर्ण काळ. प्राचार्य म्हणून त्यांनी शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण निर्माण केले.गुणवत्तापूर्ण अध्यापनावर भर दिला. विद्यार्थी-केंद्रित उपक्रम राबवले. संशोधनाला प्रोत्साहन दिले. शिक्षकांना मार्गदर्शन केले. आधुनिक शैक्षणिक दृष्टिकोन स्वीकारला.त्यांच्या नेतृत्वाखाली संस्था केवळ वाढली नाही तर घडली!

**विद्यार्थी विकासातील योगदान**

प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी विद्यार्थ्यांना फक्त अभ्यास शिकवला नाही तर जीवन जगण्याची दिशा दिली. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन,व्यक्तिमत्व विकास शिबिरे,संस्कार वर्ग, शैक्षणिक चर्चासत्रे,संशोधन प्रोत्साहन,विद्यार्थ्यांना आत्म विश्वास देणे हीच त्यांची खरी ओळख. आज अनेक विद्यार्थी शिक्षक, अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते म्हणून कार्यरत आहेत.आणि ते अभिमानाने सांगतात,'आमचे गुरु डॉ. वायाळ सर.'

**सामाजिक आणि सहकारी क्षेत्रातील कार्य**

प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांचे व्यक्तिमत्त्व केवळ शिक्षणापुरते मर्यादित नाही. स्वीकृत सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती (२०१७),अध्यक्ष श्री शिवाजी कर्म.सहकारी पतसंस्था, चिखली, संचालक-अनुराधा अर्बन को-ऑप. बँक, चिखली,अध्यक्ष/संचालक-समता नागरी सहकारी पतसंस्था,सहसचिव-अमरावती विभाग नागरी सहकारी बँक्स असोसिएशन,जिल्हा मुख्य आयुक्त-भारत स्काऊट गाईड, बुलडाणा.अशासकीय सदस्य-उच्च शिक्षण सल्लागार समिती,राज्य कार्यकारिणी सदस्य-महाराष्ट्र स्टेट टिचर्स एज्युकेटर्स असोसिएशन, मुंबई. ही सर्व पदे त्यांच्या नेतृत्वगुणांची साक्ष देतात.

**व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये**

शिस्तप्रिय,समर्पित,अभ्यासूनिर्भीड,निर्णायक,विद्यार्थ्यांप्रती प्रेमळ,संस्थेप्रती निष्ठावान, त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कठोर शिस्त आणि मृदू मन यांचा सुंदर संगम आहे.

**सेवापूर्ती-एक गौरव क्षण**

आजचा दिवस म्हणजे निवृत्तीचा दिवस नाही.तर एका तेजस्वी अध्यायाचा गौरव आहे.तीन दशके आणि त्याहून अधिक काळ शिक्षण, संस्कार आणि नेतृत्वासाठी समर्पित. त्यांनी पेटवलेला ज्ञानदीप अखंड तेवत राहील.त्यांनी दिलेली दिशा पिढ्यानपिढ्या प्रेरणा देईल. 'प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम शिवाजी वायाळ हे केवळ नाव नाही.ही एक प्रेरणा आहे.ही एक शैक्षणिक चळवळ आहे..ही एक उज्ज्वल परंपरा आहे.'

सर,आपण आम्हाला केवळ शिक्षण दिले नाही तर विचार दिले. फक्त धडे दिले नाहीत तर दिशा दिली.आपल्या सेवेला आमचा मनःपूर्वक प्रणाम.

आपल्या पुढील आयुष्यासाठी आरोग्य, आनंद आणि समाधानाच्या शुभेच्छा. 'ज्ञानदीप अखंड तेवत राहो'

**डॉ. अनंतकुमार चेके**
प्राचार्य श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय चिखली.

# वाढते सामाजिक तणाव आणि राष्ट्रीय एकात्मतेची परीक्षा



संपूर्ण विश्व आज मंथनात आहे. उद्याची सकाळ कशी असेल याच चिंतेत प्रत्येक जण झोपी जातो. काही नागरिकांच्या मनात देशाची सामाजिक व वैचारिक एकजूट कमी होत चालली आहे का, असा प्रश्न निर्माण होत आहे. बदलती धोरणे, वाढते सामाजिक ताणतणाव आणि सार्वजनिक चर्चेमधील ध्रुवीकरण यामुळे ही भावना अधिक तीव्र होत आहे.निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विविध राज्यांमध्ये मोफत वीज, रोख अनुदाने, कर्जमाफी किंवा इतर आर्थिक सवलती जाहीर केल्या जातात. या योजनांमुळे तात्कालिक दिलासा मिळतो; मात्र दीर्घकालीन आर्थिक बळकटी आणि राष्ट्रहिताचे प्राधान्यक्रम यांचा पुरेसा विचार होतो आहे का, असा प्रश्न काही अर्थतज्ज्ञ उपस्थित करतात. मतांच्या राजकारणात दीर्घकालीन राष्ट्र हित दुय्यम ठरू नये, ही अपेक्षा आहे.

सामाजिक माध्यमांवरील वाढते ध्रुवीकरणही चिंतेचा विषय ठरत आहे. संवेदनशील घटनांना तत्काळ धार्मिक किंवा जातीय रंग दिला जातो. अपुरी माहिती, अफवा आणि आक्षेपार्ह भाष्य यामुळे समाजाची दिशाभूल होते. अशा वेळी संयमी नेतृत्व, जबाबदार माध्यमे आणि जागरूक नागरिकत्व आवश्यक ठरते.लोकसंख्यावाढ, सामाजिक समतोल आणि राष्ट्रीय ओळख या विषयांवरही विविध मतप्रवाह आहेत. काही राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणाबाबत धोरणात्मक पावले सुचवली आहेत, तर काही जण शिक्षण आणि जनजागृतीला अधिक प्रभावी उपाय मानतात. या चर्चांमध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे.काही समाजघटकांमध्ये धार्मिक ओळखीविषयी तीव्र बांधिलकी दिसून येते. विविध विचारप्रवाह असणे ही लोकशाहीची ताकद असली, तरी ते राष्ट्रीय एकात्मतेच्या चौकटीत राहून व्यक्त होणे गरजेचे आहे.

देशाच्या अखंडतेविषयी शासनाने स्पष्ट भूमिका घेणे आवश्यक असले, तरी केवळ शासनाकडून अपेक्षा ठेवून चालणार नाही.

इतिहास साक्षी आहे की समाज सजग आणि संघटित राहिला तरच मोठे परिवर्तन घडते. स्वातंत्र्यलढ्यात विविध विचारांचे लोक एका ध्येयासाठी एकत्र आले आणि राष्ट्रनिर्मितीला बळ मिळाले.आजही देशाच्या अखंडतेसाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीची जाणीव ठेवणे, कायद्याचा सन्मान करणे आणि राष्ट्रीय हित सर्वोच्च मानणे आवश्यक आहे. समाज संघटित, सजग आणि मूल्याधिष्ठित झाला, तरच राष्ट्रीय एकात्मता दृढ होईल कारण कलियुगात 'संघे शक्ती' हेच राष्ट्रबांधणीचे प्रभावी सूत्र आहे.

**रमा देशमुख**
नागपूर

# आंध्र प्रदेशाचा लोकसंख्या वाढीचा निर्णय



आज देशात अनेक राज्यात जन्मदर कमी होऊ लागल्याची चिन्हे आहेत.जगात आज तरी भारत लोकसंख्या बाबतीत प्रथम क्रमांकावर पोहचला आहे . जगात काही दिवसापूर्वी चीन लोकसंख्याच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर होता . आता तेथेही जन्मदर कमी होत असल्याने जन्मदर वाढविण्याचे प्रयत्न सुरु आहेत.आज देशात आंध्र प्रदेशाने जन्मदर वाढविण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत.आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी दोन किंवा तीन मुले जन्माला घालायचे जनतेला आवाहन केले आहे.त्यासाठी प्रोत्साहन म्हणून रुपये २५०००/- देणार आहेत . शिवाय अशा पाल्याना इयत्ता बारावीपर्यंत शिक्षण मोफत देणार आहेत तसेच तिसरे मुलाला पाच वर्षे होईपयंत रुपये १०००/- त्याच्या पाल्याना देण्याचा सरकारचा विचार आहे . या प्रोत्साहनामुळे लोकसंख्या वाढीवर निश्चित परिणाम होईल व लोकसंख्या वाढेल असे सरकारला वाटते . देशातील इतर राज्ये सुद्धा याबाबतीत विचार करतील असे वाटते.

**शांताराम वाघ**



# स्त्री चारित्र्य अंगाने 'ईमेल फिमेल'

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ वतीने आयोजित ७१ वा प्राथमिक नाट्य महोत्सव २०२५-२६. स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सिपना कॉलेज अमरावती येथे, कयूम काझी लिखित ईमेल फिमेल या फार्सिकल हास्य नाट्य प्रयोगाचा खेळ झाला.**

मरत रडत राहायचं नाही ग!! या लोकगीताने नाटकाचा पडदा खुलतो.गायक व त्याचे सोबत भरमसाठ कलावंताने भरगच्च भरलेला रंगमंच प्रेक्षकांना खदा-खदा हसवून आज काही खरं नाही बा !! या थाटात नाटकाचा (पात्र) परिचय करून ह्या नाटकात सूत्रधार बारक्या पोर आणि नाटकाच्या सुरुवातीलाच नाटकाचा अंत दिसू लागल्याने नाटकाचे पुढील प्रवेश तरी सुधारित होतील अशा आशेने उत्सुक दर्शक.

नाटकात नाटक त्यात पौराणिक नाटकाचे चारित्र्यावर चर्चा ! त्यामुळे नाटकाची रंगत काही औरच असणार अशी उत्सुकता. जिवंत संगीत म्हणजे ढोलकी, संवादिनीचा ध्वनी ऐकून नाटकात जाम मजा येणार असे थाट. नाटकाची तालीम करताना त्यात बेवडा पात्र नाटकात गोंधळ उडवेल तर मजाच मजा !! कारण नाटकात नेपथ्य कुठे ठेवलेच नाही; त्यामुळे त्याची जागा ही उत्स्फूर्त अभिनयातून ओसंडेल अशा अनुमानात नाटकाची गती गृहीत धरून नाटक सादर होईल;असा गोडसमज पुढे गैर होण्याची संभावना उत्तरोत्तर वाढत चाललेले नाटक फारसिकल लेवल गाठायला लागेल; अशी जाणीव मंदावत नाटकाची 'एन्ट्री मागे कॉमेन्ट्री' लक्षात येताच या नाटकाचे प्रयोग हौशी नाटकाच्या घरात गटांगळ्या खात असल्याचे दिसत होते.

'आयजेड' हा शब्द स्मरणात ठेवून ही शिवी कदाचित कोकणी असावी हो ! म्हणजे हे नाटक वस्त्रहरण किंवा दशावतार याच थाटात ठहरण्याचा बेत सुटला. 'वासड्या' या गोड उद्गाराने व मका, नाका, काका या शब्दाने नाटक कोकणात नेले.नाटकाची तालीम दिग्दर्शक शिटी वापरून घेतो मात्र कुठल्याच पात्राचे पाठांतर तोडीचे दिसत नसल्याने नाटकाचे दिग्दर्शन करणारे तपस्वी या नाटकात तिळपापड झाल्याचे नक्कीच. कारण या नाटकाचे सादरीकरण सहज व सुलभ करण्यासाठी हवे तिथे शब्द फिरवण्याची संधी असताना नुसत्या पाठांतराच्या दडपणात नाटकाचा बँड बाजा वाजला.

स्त्रीची भूमिका नाटकात करणाऱ्या सीता व द्रौपदी ह्यांच्या घरात असलेले रामायण महाभारत लेखकाने दिग्दर्शकाचे हवाली केल्याची ही कथा.यात द्रौपदी व सीता यांच्या स्त्री चरित्राचा भाग अग्नी परीक्षा व पाचात पांचालीची वर्तमान काळात सुरू असलेली चूल व मुल परंपरेची कथा लेखक मांडताना दिग्दर्शकने तालीम साठी निवडलेले कलावंत ह्यात द्रौपदी ही अर्जुनाची ?क्चुअल पत्नी! तिच्या घरी चार ज्येष्ठ व दीर त्यात अर्जुनाची नायकाला परवानगी म्हणून त्याचा बहिष्कार.

लेखक डोके दुःखी सांगत विविध विषयाची मांडणी करतानाचां हेड्याक.

साथी हाथ हात बढाना या गाण्याची झलक घेऊन त्यावर अभिनय करण्याची संधी प्रत्येक पात्राला देताना पात्र भरून्याची बेवडा ॲक्शन करतो. सूत्रधार पुढील प्रवेश सुचवत असताना नाटकात गायक आपलीच मिरवण्याचा प्रयत्न करीत असल्याची भूमिका त्याचे वयपरत्वे जमली नाही राजे हो !! असा अभिप्राय दर्शक हसण्यातून दर्शवत,ठेका नाही, ना कंठ ! गाण्यासाठी अभिनयाचा उत्कंठ पण नाही !! पाठांतर कुणाचेच कुणाही नसल्याने हे नाटक मुद्दाम रद्दि के भाव अशी चुणूक दिसत असल्याने दर्शक या नाटकाची चर्चा करायला बाहेर निघून गेल्यासारखे वाटले. नाटकाचा उजेडाशिवाय प्रवास ,कुठे प्रकाश व कुठे संगीताची चाल यात फारकतीचे टप्पे दिसत होते. कारण विनोदावर ढोलकीची थाप ऐकण्याची उत्सुकता या नाटकात पदोपदी होती.विरह किंवा वियोग



येथे संवादिनीची गरज भागवता आली नाही.अर्जुन द्रौपदीसाठी झेंडूच्या फुलाचा गजरा उर्फ पुष्पहार दाखवणे मात्र त्यावर प्रवेश खेळवत न ठेवता विनोद पंक्चर केले.सूत्रधार जीवशास्त्रीय स्पष्टीकरण करून स्त्री पुरुष तुलनात्मक वर्णन करून स्त्री जीवनाची पुरुषाच्या वाटेने झालेली फरफराट म्हणजे तालीम निमित्तानं भावांचे भांडविक संवाद.. पुरुषप्रधान संस्कृतीची स्त्रीवर मात.कारण खानदानी कुटुंब बायकोला सपोर्ट प्रतिष्ठेपोटी करत नाही हा आक्षेप मांडून प्रत्यक्ष भांडण मध्यंतरात दिसतें.महाभारत ची आठवण करून देणारे त्यातले रेडीमेड आवाज मधात गायकाची लुडबूड.नाना गॉगल धारक पात्र मॉडेल स्वरूपात 'सुचवतो म्हणत सुचत काही नाही'.कर्ण बेवडा स्त्री वाचून वंचित म्हणून दारूत नाटकभर गळ्यात बॅग पण वापर ना बदल करीत वावरला. अग्निपरीक्षा आणि द्रोपदीचे पाचपती नाटकातून काढण्याचे निर्णय घेत हलगी वादनाने नवा प्रवेश. सर्व पात्र चिंतनात स्त्री पात्र उभे कसे करणार लगेच अर्जुन द्रौपदी सह येऊन नाटक होणार या विश्वसाने एकत्र येऊन पुढील प्रवेश अर्जुन व राम एकत्र येऊन प्रॅक्टिस करीत गांडिव आणि कोदंड आमने सामने युद्धाची टाईम प्लिज राम वदले !! पण संवाद द्रोपदी व सीता यांच्याबद्दल चिंतन.

**एक टक नाटक**
**समीक्षण**

अख्खे नाटक पाठांतर नसल्याने पडत पडत राहिले.

त्यात गायकाने काही तरी हातभार लावावा अशी अपेक्षा करावी तर तेथेही डायरेक्टर सबसेल फसले.शासनाचे धोरण धर्म,रूढीच ठरवते याची स्पष्टता लेखक नाटकात करतो.इथे अमीर गरिबाला मान आहे या गीताचा भरणा गायक करतो.आता हे नाटक मंचावरून पथ नाट्यवर आले.संविधान दिनाचे महत्वावर नाटक सुरू झाले की काय असे प्रवेश दर प्रवेश रामायण महाभारतचे एकत्र तालीम करून उदाहरण दाखवत असताना अचानक एक कौटुंबिक प्रवेश या नाटकात प्रामाणिक दिसला.

ज्येष्ठ नागरिक वयातील चहा पित पती व कपडे आवरत (पत्नी)ती मुरब्बी कलावंत होती. त्यांनी त्याचे रोल पूर्ण सादर केल्याने इतर गुंडाळलेल्या नाटकाचे वजन सावरले.दोन मुलीचे शिक्षण, मुलींच्या कपड्यावर चर्चा फ्रॉक घालून घोड्या मुली,कमी कपड्यावर अमाप चर्चा आधुनिक असताना. कपड्यासोबत बूट आवश्यक घालता आला असता हे वेशभूषकार विसरला.रंग संगती,वेशभूषावर नाटकाचे पात्र चालवता आले असते.पण तेही तुटपुंजे ठरले.उजेड पडणारे तांत्रिक आणि ताल,सूर, ठेका पुरवणारे संगीताचे धनी सुद्धा वेळेवरची करामत होती.

खरे तर!! या नाटकाला वस्त्रहरणाच्या गाभाऱ्यातून अग्नी परीक्षा व पाचात पांचाली या भूमिकेवर अफाट विनोदातून मार्मिक संदेश देण्याची संधी श्रीमती वैशाली नवघरे मॅडम यांनी मार्गदर्शिका म्हणून दिली.

या नाटकाला दिग्गज दिग्दर्शक विष्णू वामन निंबाळकर यांनी परिश्रम घेतले, मात्र नाटकाला तालीमसाठी वेळ न काढता आला किंवा हौशी नाटकाची फार हौस नसणारे कलावंत पाठांतर व अभिनयात कमकुवत राहिलें.

महिलांची पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये तुलनात्मक अस्तित्वाची ही कथा रंगवण्यासाठी वेळ घेतला नाही.

वैशाली नवघरे मॅडम ह्यांनी अथक परिश्रमाने कामगार कल्याण मंडळाची ही हौशी नाट्य स्पर्धा टिकवून ठेवली. कटाक्षाने निरीक्षण सुद्धा ठेऊन तळागाळातील कलावंतासाठी बुडत्यास काठीचा आधार होतात.

त्यामुळे त्यांनी या नाटकाला प्राथमिक स्पर्धेत दिलेली संधी पुढे नक्कीच सोने करण्याच्या वळणावर राहील. अशी आशा शेवटी सर्व कलावंत ध्यानात घेऊन ईमेल फिमेल चे डायरेक्टर फारसिकल विनोदी नाटकाला सामाजिक नाटक दाखवताना सफेल(..) ठरले.

नाटकाला समर्पण व समयावर पण असणे आवश्यक आहे. ईमेल फिमेल शीर्षकाचे कुठेच तंत्र जुळून आले नसल्याने दर्शक हसण्यातून व्यक्त झाले.

नाटकाचे प्रकार हे प्रदर्शनातून दर्शक समजून घेतील हीच हौशी नाटकाची ठेवण.फारसिकलमध्ये नाटकाचे खेळ अविरत विनोद व विरहाच्या जागा घेऊन, महत्वाचे संदेश फेकत दशकाच्या मनात उत्सुकता विस्तारित करण्याचा दम व्यावसायिक किंवा हुकुमी नाटकाच्या पातळीवर नेते.

वस्त्रहरणाची रियलसर किंवा कोकणातले दशावताराचे प्रयोग लेखकाने दर्शवण्याच्या घोरात नाव मस्त पण दर्शन लुस्त होत.

नाटकाचा शिखरबिंदू आंबेडकर चळवळीची थीम संविधानाच्या माध्यमातून स्त्री स्वातंत्र्यावर दाखवण्याचा प्रयत्नात दिसतो.लेखक व दिग्दर्शक ह्यांची भूमिका ललित कला भवन, कामगार कल्याण केंद्र भीमनगर, अकोला च्या कलावंतांनी स्वीकारली, भूमिका नीट मांडता येणे आणि नाटकाच्या आस्वादाची देवाणघेवण उत्तरोत्तर वाढत जाणे, हीचहौशी नाटक परम पायरी आहे. ही समीक्षणाची दृष्टी एक टक नाटक पाहून मांडली.

**कबीरफादार**
७७९८६४५५६५.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला
जिल्हा विशेष

# नकली नोटांचा कथित 'सम्राट' टकल्या राजू भूमिगत!

## व्हॉट्सॲपवरून वरली-मटक्याची हायटेक खायवाडी; अकोटात पोलिस यंत्रणेवर सवाल

■ प्रतिनिधी | अकोट ■

*अकोट शहरात नकली नोटांच्या व्यवहारामुळे कुप्रसिद्ध ठरलेला 'टकल्या राजू' उर्फ राजू हा सध्या पूर्णपणे भूमिगत झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. नकली नोटांच्या प्रकरणात त्याचे नाव चर्चेत येताच त्याने अचानक गायब होण्याचा मार्ग स्वीकारला असून शहरात त्याच्या हालचालींवर संशयाचे सावट गडद झाले आहे. विशेष म्हणजे, पोलिसांच्या संभाव्य कारवाईच्या भीतीने शहरातील अनेक अवैध धंदे काही काळासाठी थंडावले असतानाच 'टकल्या राजू'ने मात्र व्हॉट्सॲपच्या माध्यमातून वरली-मटक्याची खायवाडी सुरू करून अवैध धंद्याला हायटेक रूप दिल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून पुढे आली आहे.*

अकोट शहरात मागील काही वर्षांपासून अवैध धंद्यांचे जाळे उभारण्यात 'टकल्या राजू'चे नाव आघाडीवर असल्याचे बोलले जाते. वरली-मटका, जुगार, सट्टा आणि विविध अवैध व्यवहारांच्या माध्यमातून त्याने शहरात मोठे नेटवर्क तयार केले असल्याची चर्चा आहे. हाताशी गुंड प्रवृत्तीचे तरुण, टपोरी प्रवृत्तीचे एजंट आणि कलेक्शन करणारी मंडळी ठेवून त्याने अकोट शहरासह ग्रामीण भागातही आपला अवैध धंदा पसरविला, असेही सांगितले जाते.

दरम्यान, पोलिसांनी अलीकडील काळात अवैध धंद्यांवर कारवाईचे संकेत दिल्यानंतर शहरातील अनेक पारंपरिक मटका अड्डे बंद झाले. मात्र, 'टकल्या राजू'ने जुन्या पद्धतीला फाटा देत थेट मोबाईल आणि व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून आकडे स्वीकारण्याची नवी पद्धत सुरू केली, अशी माहिती समोर येत आहे. या हायटेक पद्धतीमुळे त्याचा धंदा पोलिसांच्या नजरेपासून लपवण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा आहे.

याच पार्श्वभूमीवर शहरात आणखी गंभीर चर्चा रंगू लागल्या आहेत. अवैध धंदा हा केवळ आडोसा असून त्यामागे नकली नोटांचा व्यवहार मोठ्या प्रमाणात बाजारात आणला जात असल्याचा संशय नागरिकांत व्यक्त केला जात आहे. मटका आणि जुगाराच्या व्यवहारातून फिरणाऱ्या पैशाच्या माध्यमातून नकली नोटा चलनात आणल्या जात असल्याचा मुद्दा आता अकोटात उघडपणे बोलला जात आहे.

माहितीनुसार, या अवैध जाळ्यातून मागील काही वर्षांत 'टकल्या राजू'ने मोठ्या प्रमाणात काळा पैसा उभा केला आहे. त्यातूनच शहरात त्याने आलिशान बंगला उभारल्याची चर्चा रंगली असून त्याची आर्थिक ताकद पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. एवढेच नव्हे तर, अलीकडेच यंत्रणेतील **'संजय'** नावाच्या व्यक्तीला भागीदार करून एका शेतजमिनीचा इसार केल्याची चर्चा अकोटात सुरू आहे. या व्यवहारामुळेही अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. दरम्यान, नकली नोटा, अवैध मटका आणि भूमिगत हालचाली या तिन्ही बाबींमुळे शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे. नागरिकांमध्ये याबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत असून 'अशा प्रकारच्या अवैध जाळ्यावर पोलिसांनी तातडीने कठोर कारवाई करावी' अशी मागणी जोर धरत आहे. विशेष म्हणजे, शहरात उघडपणे चर्चा सुरू असताना 'टकल्या राजू' मात्र अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही. त्यामुळे तो खरोखरच पोलिसांच्या रडारवर आहे का, की कोणाच्या छत्रछायेखाली सुरक्षित आहे? असा सवालही आता अकोटात उपस्थित केला जात आहे. नकली नोटांच्या व्यवहाराचा संशय, व्हॉट्सॲपवरून चालणारा मटका आणि भूमिगत झालेला मुख्य सूत्रधार, या संपूर्ण प्रकरणामुळे अकोट शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता पोलिस यंत्रणा या प्रकरणात ठोस पावले उचलते का आणि 'टकल्या राजू'च्या अवैध साम्राज्यावर लगाम घालते का, याकडे संपूर्ण अकोटकरांचे लक्ष लागले आहे.

# अंदाजपत्रकाला फाटा : रस्त्याच्या निकृष्ट कामाविरोधात मुंडगाव येथे आमरण उपोषण सुरू

## सर्व पक्षांचा पाठिंबा; बांधकाम विभागाच्या भूमिकेकडे लागले लक्ष



■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील वणी वारुळा–मुंडगाव–तेल्हारा–वरवट या राज्य महामार्ग क्रमांक २७१ वरील रस्त्याचे काम अंदाजपत्रकानुसार न झाल्याच्या निषेधार्थ मुंडगाव येथील ग्रामस्थांनी बुधवारी (११ मार्च) पासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. या आंदोलनाला विविध पक्ष व संघटनांनी पाठिंबा दर्शविल्याने प्रशासनावर दबाव वाढला आहे.

मुंडगाव परिसरातील नागरिकांनी या रस्त्याच्या कामाबाबत यापूर्वी अनेकदा तक्रारी व निवेदने दिली होती. १३ सप्टेंबर २०२४ रोजी प्रथम निवेदन देत वणी वारुळा फाटा ते वरवट या मार्गाचे काम मूळ अंदाजपत्रकानुसार पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतरही वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या संदर्भात तेल्हारा येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपअभियंता बर्डे यांच्याकडेही अनेकदा तक्रार करण्यात आली. मात्र विविध कारणे देत काम प्रलंबित ठेवण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. कधी निवडणुका, कधी पोलीस बंदोबस्त, तर कधी निधी उपलब्ध नसल्याची कारणे देऊन काम पुढे ढकलण्यात आले, असा दावा आंदोलनकर्त्यांनी केला.

दरम्यान, ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनाच्या प्रती सार्वजनिक बांधकाम विभाग अकोट, उपविभागीय अधिकारी कार्यालय अकोट, जिल्हाधिकारी कार्यालय अकोला, खासदार अनुप धोत्रे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री, पालकमंत्री तसेच अकोटचे आमदार प्रकाश भारसाकडे यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. नागरिकांनी प्रशासनाला दिलेल्या इशाऱ्यानुसार १५ दिवसांत रस्त्याचे काम अंदाजपत्रकानुसार पूर्ण न झाल्यास आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले होते. मात्र मुदत संपूनही कामास सुरुवात न झाल्याने अखेर मुंडगाव येथील नागरिकांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनात श्रीकृष्ण वाघ, प्र.म. भालेराव, दिलीप बोरोडे, नरेश क्षिरसागर, संजय तायडे, भरत चौधरी, राजू बावणे, अनिल कडू, संतोष सदार, अरविंद येवतकार यांच्यासह गावातील अनेक नागरिक सहभागी झाले आहेत.

# कालंका माता मंदिर दागिने चोरीचा उलगडा

## ७.२१ लाखांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट शहरातील बारगण परिसरातील कालंका माता मंदिरातील दागिने चोरी प्रकरणाचा अखेर पोलिसांनी उलगडा केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या प्रकरणात एका आरोपीला अटक करत सोने-चांदीचे दागिने, चोरीसाठी वापरलेले साहित्य व वाहनासह एकूण ७ लाख २१ हजार ६८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी चंद्रशेखर भिमराव गावंडे (रा. अकोट) यांनी अकोट शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. बारगण परिसरातील कालंका माता मंदिरातील देवीच्या मूर्तीवरील सुमारे ४८ ग्रॅम सोन्याचे दागिने, ७५० ग्रॅम चांदीचे दागिने तसेच दानपेटीतील १५ हजार रुपये रोख असा एकूण ४ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे तक्रारीत नमूद होते.

या प्रकरणी अकोट शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २४४/२०२६ अंतर्गत भा.न्या.सं. कलम ३३१(४) व ३०५(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविला. त्यानुसार पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला.



तपासादरम्यान अमोल काशीराम तेलगोटे (वय ३९, रा. रिधोरा, ता. बाळापूर, जि. अकोला) याने ही चोरी केल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचा शोध घेण्यासाठी पथक रायपूर (छत्तीसगड) येथे रवाना झाले होते. मात्र तांत्रिक माहितीच्या आधारे परतीच्या प्रवासात आरोपीला अमरावतीजवळ ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपीकडून सोने-चांदीचे दागिने, दागिने वितळविण्याचे साहित्य, मोबाईल फोन, हायड्रॉलिक कटर तसेच मोटारसायकल असा एकूण ७ लाख २१ हजार ६८ रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला.

**पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न**

चोरी करताना आरोपी स्वतःचा मोबाईल बंद ठेवत असे तसेच विनानंबर मोटारसायकलचा वापर करत होता. चोरी केलेल्या दागिन्यांची ओळख लपवण्यासाठी तो ते वितळवून त्यांना नवीन आकार देत असल्याचे तपासात उघड झाले. यासाठी लागणारे साहित्यही पोलिसांनी जप्त केले आहे. यापूर्वीही दोन वेळा चोरीचा प्रयत्न केल्याची कबुली त्याने दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**यांनी केली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक शंकर शेळके, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक विष्णू बोडखे, गोपाल जाधव, माजीद पठाण तसेच सुलतान पठाण, वसीमुद्दीन, एजाज अहमद, महेंद्र माळी, भास्कर धोत्रे, अन्सार अहमद, राज चंदेल, सतीश पवार, करण मानकर, अभिषेक पाठक, भिमराव दिपके, अशोक सोनवणे व राहुल गायकवाड यांच्या पथकाने केली.

---

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**पाणी पुरवठा विभाग**

**निविदा सुचना क्र. २०, सन २०२५-२६**

अकोला महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग, अकोला मनपा निधी अंतर्गत दि.११/०३/२०२६ रोजी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन या कामासंबंधीत सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(संपर्क- ७७०९०४९३५१)
संकेतस्थळ - www.amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/पापू/ १७२५/२०२६
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : ११/०३/२०२६

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९१/२०२६ — प्रोसेस नं. ११३७/२०२६
चौ.ता. १३/०४/२०२६ — दिनांक : २७/०१/२०२६

**अर्जदार :** १. संतोष विश्वनाथ ठाकरे रा. सी-५-२०३, साकेत, सीएचएस लि. वीर सावरकर मार्ग, कालवा ब्रिज जवळ, माजीवाडा, ठाणे वेस्ट, मुंबई ४००६०१ २. सौ. प्रतिभा सतिष देशमुख उर्फ प्रतिभा विश्वनाथ ठाकरे रा. देशमुख आय हॉस्पिटल, खापर्डे शाळेजवळ, दौलत बिल्डिंग, खापर्डे गार्डन, अमरावती. ४४४६०२ ३. दिलीप विश्वनाथ ठाकरे रा. पुष्प विश्व, डॉ. सपकाळ यांच्या दवाखान्यासमोर, सिव्हिल लाइन, अकोला. ४४४००१ ४. सौ. सुमती दिपक वाघमारे उर्फ सुमती विश्वनाथ ठाकरे रा. १,१९,७३४, अनंत आशा, बाबा नगर, नांदेड, महात्मा फुले शाळेसमोर, नांदेड, महाराष्ट्र ४३१६०२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. विश्वनाथ अरूणजी ठाकरे २. श्रीमती पुष्पा विश्वनाथ ठाकरे
**पत्ता :-** रा. सी-५-२०३, साकेत, सीएचएस लि. वीर सावरकर मार्ग, कालवा ब्रिज जवळ, माजीवाडा, ठाणे वेस्ट, मुंबई ४००६०१

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विश्वनाथ अरूणजी ठाकरे यांचे दि. ०३/०८/२०१० रोजी अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत श्रीमती पुष्पाताई विश्वनाथ ठाकरे यांचे दि. ०९/१०/२००९ रोजी ओझोन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्य

(शिक्का)
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ९९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २७७/२०२६ — प्रोसेस नं. ३०७८/२०२६
चौ.ता. १६/०४/२०२६ — दिनांक : ०६/०३/२०२६

**अर्जदार :** १. संगिता मनसुखलाल परमार २. नवनीत मनसुखलाल परमार दोघेही रा. आयटीआय कॉलेज, १/५, व्हीएचबी कॉलनी, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. मनसुखलाल मगनलाल परमार २. ज्योती मनसुखलाल परमार
**पत्ता :-** रा. आयटीआय कॉलेज, १ / ५, व्हीएचबी कॉलनी, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मनसुखलाल मगनलाल परमार यांचे दि. २०/१०/२०१० रोजी व तसेच मयत ज्योती मनसुखलाल परमार यांचे दि. ०४/०८/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की,

मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे. - उगवा येथील भू-मापन गट क्र - ६२६ याचे एकूण क्षेत्र ०५ हे. ०० आर, यापैकी लिहून देणार १) शिवाजी जगन्नाथ अघडते व इतर यांचे मालकीचे सामाईक क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. १२/०३/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे. - उगवा येथील भू-मापन गट क्र - ६२८ याचे एकूण क्षेत्र ०१ हे. ४८ आर, यापैकी लिहून देणार १) बलदेव नामदेव चादुरकर व इतर यांचे मालकीचे सामाईक क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. १२/०३/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

**तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अकोला, ता. जि. अकोला.**

जा.क्र. / तह/प्रस्तु-१/कावि- २२१ / २०२६ — दिनांक ०९.०३.२०२६

**मौजे मुजरे महमदपूर, ता. जि. अकोला येथील सर्व्हे क्र. १०५, क्षेत्रफळ ०.७१ हे. आर + पो.ख. ०.०९ हे. आर भोगवटदार वर्ग - १ या सातबारावर इतर अधिकार मध्ये 'कुळ कायदा कलम ६३ अ- नुसार औदयोगीक कारणासाठी १) मोतीराम भदु स. प. ५३-५४ चे स.प. श्रीकुमार चवरे ५९-६० स. कुळ २) स. प. दलपत बक्षी ५१-२५ ते ५५-५६ चा स. प. श्रीकुमार जयकुमार ५९-६० चा स.पं.' असे दर्शविले आहे. सदर कालबाहय झालेले कुळाचे नाव कमी करण्याकरीता.**

**जाहीरनामा**

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, डॉ. अपर्णा रणजीत पाटील, रा. जठारपेठ, अकोला, ता.जि.अकोला यांनी मौजे मुजरे महमदपूर, ता. जि. अकोला येथील सर्व्हे क्र. १०५, क्षेत्रफळ ०.७१ हे. आर + पो.ख. ०.०९ हे. आर भोगवटदार वर्ग -१ सातबारावर इतर अधिकार मध्ये कुळ कायदा कलम ६३ अ-नुसार औदयोगीक कारणासाठी १ ) मोतीराम भदु स. प. ५३-५४ चे स. प. श्रीकुमार चवरे ५९-६० स. कुळ २) स. प. दलपत बक्षी ५१-२५ ते ५५-५६ चा स. प. श्रीकुमार जयकुमार ५९-६० चा स.प. ' असा शेरा आहे. सदर कालबाहय झालेले कुळाचे नाव कमी करण्याकरीता या कार्यालयास विनंती अर्ज सादर केला आहे.

अर्जदार यांनी या कार्यालयात प्रकरण सादर केल्यानुसार उपरोक्त प्रकरणात ज्यांना आक्षेप / हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी ७ दिवसांचे आंत या कार्यालयात लेखी स्वरुपात आपले आक्षेप / हरकती सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेले आक्षेप / हरकत विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(शिक्का)
**(कुणाल झाल्टे)**
**तहसिलदार, अकोला**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे. - उगवा येथील भू-मापन गट क्र - ६४६ याचे एकूण क्षेत्र ०१ हे. ६२ आर, यापैकी लिहून देणार १) वैभव प्रमोद पटेल यांचे मालकीचे सामाईक क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. १२/०३/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे. - उगवा येथील भू-मापन गट क्र - ६५० याचे एकूण क्षेत्र ०४ हे. ४५ आर, यापैकी लिहून देणार १) ओकार आप्पा देवाप्पा पारसकर यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. १२/०३/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३०९/२०२६ — प्रोसेस नं. ३०७१/२०२६
चौ.ता. १५/०४/२०२६ — दिनांक : ०६/०३/२०२६

**अर्जदार :** १. गिरीजा शंकर अंभोरे २. मनोज शंकर अंभोरे दोघेही रा. मलेरिया कॉलनी, कौलखेड, चांदूर, गांधीनगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. किरण भोला पाचरे रा. मु. पो. परसापूर, ता. अचलपूर, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शंकर गोविंदा अंभोरे
**पत्ता :-** रा. मलेरिया कॉलनी, कौलखेड, चांदूर, गांधीनगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शंकर गोविंदा अंभोरे यांचे दि. १४/०१/२०२१ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- उगवा येथील भू-मापन गट क्र - ६४७ याचे एकूण क्षेत्र ०२ हे. ४३ आर, यापैकी लिहून देणार १) विशाल लाला शिरसाठ व इतर यांचे मालकीचे सामाईक क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. १२/०३/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे. - उगवा येथील भू-मापन गट क्र - ६५० याचे एकूण क्षेत्र ०४ हे. ४५ आर, यापैकी लिहून देणार १) आश्विन बळिराम शिरसाठ व इतर यांचे मालकीचे सामाईक क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. १२/०३/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

# डोंगर-दऱ्यांत घुमतोय 'स्मार्ट शिक्षणाचा नवा नाद'

## वडगाव (जं)च्या आदिवासी आश्रम शाळेत डिजिटल क्रांती

**सेलू/ अभय बेदमोहता**

बदलत्या काळात तंत्रज्ञाना शिवाय शिक्षण अपूर्ण मानले जाते. हीच जाणीव ठेवत तालुक्यातील स्व. लक्ष्मणराव मानकर (गुरुजी) आदिवासी आश्रम शाळा, वडगाव (जंगली) येथे 'स्मार्ट' शिक्षणाची नवी पहाट उगवताना दिसत आहे. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी येथे उभारण्यात आलेली आयसीटी लॅब आता ज्ञानाचे आधुनिक दालन ठरत असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात नवा उत्साह निर्माण झाला आहे.



समग्र शिक्षण अभियानांतर्गत सुरू झालेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना संगणक, प्रोजेक्टर आणि इंटरनेटच्या माध्यमातून शिक्षण घेण्याची संधी मिळत आहे.

विशेष म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अवघड वाटणारे गणित आणि विज्ञान हे विषय आता अनिमेशन, प्रेझेंटेशन आणि शैक्षणिक व्हिडिओंच्या मदतीने खेळत-हसत शिकवले जात आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची समज वाढत असून त्यांच्या अभ्यासातील भीतीही दूर होत आहे.अनेक ग्रामीण शाळांमध्ये तांत्रिक सुविधा असूनही त्यांचा पुरेसा वापर होत नसल्याचे चित्र दिसते. मात्र वडगाव (जं) येथील या शाळेने त्या सुविधांचा प्रभावी वापर करून इतरांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

आयसीटी शिक्षिका प्रीती तिमांडे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना संगणक हाताळण्याचे कौशल्य आत्मसात करता येत आहे. तसेच मुख्याध्यापक खेमराज भोंगे यांच्या नियोजनामुळे ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी कमी करण्याचा प्रयत्न यशस्वी होताना दिसत आहे.शाळेतील एका विद्यार्थ्याने सांगितले की, आधी संगणक फक्त पुस्तकात पाहिला होता, पण आता तो स्वतः चालवताना खूप आनंद होतो. व्हिडिओमुळे कठीण धडेही लगेच समजतात.

थोडक्यात सांगायचे तर, स्व. लक्ष्मणराव मानकर गुरुजी आश्रम शाळेने सिद्ध केले आहे की इच्छाशक्ती आणि योग्य नियोजन असेल तर दुर्गम भागातही आधुनिक शिक्षणाची क्रांती घडू शकते. तालुक्यातील इतर शाळांनीही या 'स्मार्ट' उपक्रमाचा आदर्श घेतल्यास ग्रामीण महाराष्ट्राच्या शिक्षणाला नवी दिशा मिळू शकते.

## गाईच्या धक्क्याने विहिरीत पडून मृत्यू

**आर्वी -** गाईच्या धक्क्याने विहिरीत पडून एका वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ब्राह्मणवाडा येथे घडली. नंदराज साठे (६०) हे शेतात गुरांना पाणी पाजण्यासाठी विहिरीजवळ गेले होते. त्यावेळी गुरांना पाणी पाजत असताना एका गाईने अचानक धक्का दिला. त्यामुळे तोल जाऊन ते थेट विहिरीत पडले. आसपास कोणी नसल्याने त्यांना तातडीने मदत मिळू शकली नाही. पाण्यात बुडाल्याने त्यांचा मृत्यू झाला. काही वेळानंतर ही बाब लक्षात आल्यानंतर गावकऱ्यांनी त्यांना बाहेर काढले. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. आर्वी पोलिसांनी प्रकरणाची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

## इसमाची आत्महत्या

**अल्लीपूर -** सततच्या आजारपणाला कंटाळून एका इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना चानकी येथे घडली. चंद्रशेखर गोहाने (५२) हे काही दिवसांपासून आजारी होते. सततच्या उपचारांमुळे ते मानसिक तणावात होते, अशी माहिती समोर आली आहे. घरातील सदस्य घराबाहेर असताना त्यांनी गळफास घेऊन जीवन संपविले. काही वेळानंतर कुटुंबीयांना हा प्रकार लक्षात आला. त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणी अल्लीपूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

## हिंगणघाटला अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी 'ग्रीन सिग्नल'?

### अतुल वांदिले यांच्या पाठपुराव्याला गती

**वर्धा/ जनमाध्यम**

हिंगणघाट उपविभागाला प्रशासकीय बळकटी मिळवून देण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना आता निर्णायक वळण मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. राज्यात प्रस्तावित ११ अप्पर जिल्हाधिकारी कार्याल यांच्या यादीत हिंगणघाटचा समावेश करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळताना दिसत आहे. या मागणीची दखल घेत पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून हिंगणघाटचा समावेश करण्याची शिफारस केली आहे.



या पार्श्वभूमीवर काल मुंबईत जयंत पाटील यांनी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत सविस्तर चर्चा करत महत्त्वाची बैठक घेतली.अतुल वांदिले यांनी सादर केलेल्या निवेदनात हिंगणघाटचे भौगोलिक व प्रशासकीय महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. हिंगणघाट हे चार जिल्ह्यांच्या सीमेच्या जवळ असलेले महत्त्वाचे केंद्र असून चंद्रपूर जिल्ह्याची सीमा केवळ १५ किमी अंतरावर आहे. नागपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांच्या सीमाही अवघ्या ३० किमीवर असल्याने मोठा परिसर या शहराशी आर्थिक व सामाजिकदृष्ट्या जोडलेला आहे. नागपूर जिल्ह्यातील बेला, सिर्सी तसेच वर्धा जिल्ह्यातील सिंदी रेल्वे आणि समुद्रपूर परिसरातील नागरिकांची बाजारपेठ व प्रशासकीय कामे प्रामुख्याने हिंगणघाटवरच अवलंबून आहेत.

औद्योगिक, व्यापारी आणि ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या शहरात कृषी उत्पन्न बाजार समितीचा मोठा कारभार चालतो. महसूल संकलनाच्या बाबतीतही हा उपविभाग जिल्ह्यात अग्रस्थानी राहिला आहे.सध्या हिंगणघाट परिसरातील नागरिकांना अनेक प्रशासकीय कामांसाठी वर्धा जिल्हा मुख्यालयात जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

## वाघाचा धुमाकूळ; पवनूर येथे वासरू ठार

**वर्धा/ जनमाध्यम**

तालुक्यातील पवनूर परिसरात वाघाच्या हल्ल्याने पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाघाच्या हल्ल्यात शेतात बांधून ठेवलेले वासरू ठार झाल्याची घटना बुधवार, ११ मार्च रोजी उघडकीस आली.



मिळालेल्या माहितीनुसार, पवनूर येथील शेतकरी लखन कारणकर यांची शेती हेच कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. त्यांच्या शेतात एक वासरू बांधून ठेवले होते. दरम्यान, रात्रीच्या सुमारास वाघाने शेतात घुसून वासरावर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात वासराचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे कारणकर कुटुंबाचे अंदाजे ४० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जाते.

घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते अशोक पुरी यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिली. माहिती मिळताच आंजी मोठी येथील वनरक्षक धनराज माजरे, सामाजिक कार्यकर्ते रोशन पांडे, पोलीस पाटील हेमलता गवळी पाटणकर, सर्पमित्र व सामाजिक कार्यकर्ते नयन चौधरी, माधव कारणकर व दीपक लोखंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी मृत वासराची उत्तरीय तपासणी करण्यात आली.दरम्यान, परिसरात वाघाचा वावर वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने या घटनेची गंभीर दखल घेऊन हवालदिल शेतकरी लखन कारणकर यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

## प्रत्येकाने मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे - पराग सोमण

**वर्धा/ जनमाध्यम**

मराठी भाषा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व माध्यमिक शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त शिवशंकर अग्निहोत्री सभागृह येथे मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येकाने मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे, असे उद्घाटनप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी सांगितले.



कार्यक्रमास पराग सोमण यांच्यासह माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ.जयश्री घारफळकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी रुपेश कांबळे, प्रमुख वक्ता म्हणून जय महाकाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पंडित शंकरप्रसाद अग्निहोत्री व डॉ.वंदना पळसापुरे, मराठी भाषा गौरव दिन समितीचे संदीप चिचाटे, आशिष पोहाणे, प्रवीण चाळके, मारोती चवरे, पद्माकर बाविस्कर, रत्ना चौधरी, प्राचार्य निळकंठ ढोबाळे आदी उपस्थित होते.मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा, संत-शूरांची आणि समृद्ध साहित्याची जननी आहे. अमृतातेही पैजा जिंके अशा या भाषेचा गोडवा, ज्ञानदेवांपासून कुसुमाग्रजां पर्यंतच्या साहित्यातून थोरवी गातो. लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी म्हणत या संस्कृतीच्या, ज्ञानाच्या आणि आपल्या अस्मितेच्या भाषेचा वापर करून जतन करणे हे आपले कर्तव्य आहे, असे मत सोमण यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचलन ज्योती भगत यांनी केले तर आभार संदिप चिचाटे यांनी मानले.यावेळी मराठी साहित्य क्षेत्रातील कवी, गजलकार, लेखक योगेश बडे, महेश महाजन, प्रीती वाडीभस्मे, वृषाली मारतोडे, कविता बेदरकर, तेजस भातकुलकर यांचा सत्कार करण्यात आला. मराठी पाऊल पडते पुढे हा संदीप चिचाटे निर्मित मराठी लोकगीतांचा कार्यक्रम जीवन बांगडे, सानिका बोभाटे, प्रांजली गायकवाड, मयूर पटाईत यांनी सादर केला.

## जीर्ण वितरण व्यवस्थेमुळे पाण्याचा अपव्यय

### सुकळी उबार लघु प्रकल्पाच्या नूतनीकरणाची मागणी, आ.बकाने व गफाट यांची जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याशी मुंबईत भेट

**वर्धा/ जनमाध्यम**

आर्वी तालुक्यातील सुकळी उबार लघु प्रकल्पाची जीर्ण झालेली वितरण व्यवस्था दुरुस्त करून प्रकल्पाचे नूतनीकरण करण्यात यावे, अशी मागणी आमदार राजेश बकाने आणि भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सुनील गफाट यांनी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे केली. मुंबई येथे झालेल्या भेटीत त्यांनी प्रकल्पाची सध्याची स्थिती मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.



सुकळी उबार लघु प्रकल्पाची वितरण प्रणाली अनेक वर्षांपूर्वी उभारण्यात आली असून कालवे आणि विविध संरचना सध्या जीर्ण अवस्थेत आहेत. परिणामी सिंचनासाठी सोडण्यात येणाऱ्या पाण्यापैकी सुमारे ५० ते ६० टक्के पाण्याचा अपव्यय होत असल्याची बाब त्यांनी स्पष्ट केली. त्यामुळे प्रकल्पाच्या मूळ उद्दिष्टालाच धक्का बसत असल्याचेही त्यांनी नमूद केले.या प्रकल्पाची सिंचन क्षमता सुमारे १७५० हेक्टर इतकी असली तरी खराब झालेल्या वितरण व्यवस्थेमुळे प्रत्यक्षात त्या प्रमाणात सिंचन होत नाही. कालव्यांचे अस्तरीकरण नसल्याने मोठ्या प्रमाणावर पाणी पाझरते आणि काही ठिकाणी शेतजमिनींचे नुकसानही होते. परिणामी लाभक्षेत्रातील अनेक शेतकरी सिंचनाच्या सुविधेपासून वंचित राहत असल्याची माहिती त्यांनी दिली.या पार्श्वभूमीवर प्रकल्पाच्या वितरण प्रणालीचे नूतनीकरण, मायनर कॅनलची दुरुस्ती आणि पाटसत्यांचे मजबुतीकरण करण्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.यावर जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित प्रस्तावाचा विचार करून सुकळी उबार लघु प्रकल्पाच्या नूतनीकरणासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

## संक्षिप्त

### ट्रॅक्टरसह अवैध वाळू जप्त

**वडनेर -** नाकाबंदी दरम्यान पोलिसांनी अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडून सुमारे ७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई घाटसावली शिवारात करण्यात आली. पोलिसांनी एमएच-३२-ए-९६३० क्रमांकाचा ट्रॅक्टर तसेच त्यावरील वाळू ताब्यात घेतली. तपासादरम्यान चालक समीर शरीफ खान पठाण (३६) व यासीन उर्फ बबलू पठाण (दोन्ही रा. कुटकी) हे अवैधरित्या वाळू वाहतूक करत असल्याचे उघड झाले. पोलिसांनी दोघांविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंद केला आहे. जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतूक रोखण्यासाठी पोलिसांनी नाकाबंदी आणि गस्त वाढविली असून अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

### घरासमोरून दुचाकी लंपास

**समुद्रपूर -** घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना गिरड येथे घडली. अनिल गुडघे (५०) रा. गिरड यांनी त्यांची एमएच-३२-एम-२८८५ क्रमांकाची दुचाकी घरासमोर नेहमीप्रमाणे उभी केली होती. काही वेळानंतर बाहेर येऊन पाहिले असता दुचाकी जागेवर दिसून आली नाही. परिसरात शोध घेतला असता दुचाकीचा काहीच मागमूस लागला नाही. अज्ञात चोरट्याने संधी साधून दुचाकी पळविल्याचे स्पष्ट झाले. याबाबत गिरड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून आरोपीचा शोध घेतला जात आहे. वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

### वादातून युवकावर विळ्याने हल्ला

**देवळी -** शेतातील मळणी यंत्र परत नेल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका युवकावर विळ्याने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना शिरसगाव (धनाडे) येथे घडली. अक्षय भोकटे (२९) यांनी त्यांचे मळणी यंत्र गावातील विशाल घुरडे यांच्या शेतात नेले होते. दरम्यान विशालचा शेजाऱ्याशी वाद सुरू असल्याने अक्षयने ते यंत्र परत गावात आणले. यामुळे संतप्त झालेल्या विशाल घुरडे याने अक्षयला शिवीगाळ करत विळ्याने मारहाण केली. या हल्ल्यात अक्षय जखमी झाला. घटनेनंतर जखमी युवकाने देवळी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### दुचाकीच्या धडकेत पादचारी गंभीर

**कारंजा (घाडगे) -** भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीच्या धडकेत एक पादचारी गंभीर जखमी झाल्याची घटना अमरावती–नागपूर महामार्गावरील टोल नाका परिसरात घडली. लिलाधर मानकर (४३) रा. सेलगाव (लवने) हे राजू डोंगरे व किसन नामक व्यक्तीसह शंकरपट पाहण्यासाठी पायदळ जात होते. त्यावेळी विरुद्ध दिशेने वेगात येणाऱ्या एमएच-३१-सी-३६२५ क्रमांकाच्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात लिलाधर मानकर गंभीर जखमी झाले. उपस्थितांनी त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. याप्रकरणी कारंजा पोलिसांनी गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### दाम्पत्यास शिवीगाळ करून मारहाण

**सिंदी (रेल्वे) -** किरकोळ कारणावरून शेजाऱ्याने दाम्पत्यास शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना कलोडे कॉलनी येथे घडली. भीमराव फुलमाळी (५४) हे आपल्या कुटुंबासह घरी असताना शेजारी राहणारा दिलीप बावणे त्यांच्या घरी आला. त्याने भीमराव व त्यांच्या पत्नीला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. भीमराव यांनी त्याला याबाबत जाब विचारताच त्याने संतापून दोघांनाही मारहाण केली. या मारहाणीत दाम्पत्य जखमी झाले. घटनेनंतर त्यांनी सिंदी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपी दिलीप बावणे याच्याविरुद्ध गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### शेतीच्या वादातून तिघांकडून मारहाण

**वर्धा -** शेतीच्या वादातून एका इसमाला तिघांनी बेदम मारहाण केल्याची घटना सुकळी (बाई) परिसरात उघडकीस आली. पंकज पलेरिया (४५) हे न्यायालयातून केस जिंकल्यानंतर शेतीचा सातबारा तयार करण्यासाठी पटवारी कार्यालयात गेले होते. त्यावेळी मदन पलेरिया, वैभव पलेरिया व गणेश पलेरिया तेथे आले. त्यांनी पंकज यांच्यावर शेत दाबल्याचा आरोप करत वाद घातला. पंकज यांनी आपण न्यायालयातून केस जिंकल्याचे सांगितल्याने वाद अधिक चिघळला. संतप्त झालेल्या तिघांनी त्यांना कार्यालयाबाहेर ओढून नेऊन मारहाण केली. या घटनेत पंकज जखमी झाले. तक्रारीवरून सावंगी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### महिलेचे मंगळसूत्र हिसकावले

**वर्धा -** पायदळ जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी हिसकावून नेल्याची घटना सावंगी (मेघे) येथे घडली. सुजाता शेंडे (४६) रा. राजीवनगर या महिला रस्त्याने घराकडे जात होत्या. त्याचवेळी दुचाकीवरून आलेल्या दोन इसमांनी त्यांच्या तोंडावर दुचाकीचा तीव्र लाईट टाकला. काही कळण्याच्या आतच त्यांनी गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळ काढला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे महिला घाबरून गेल्या. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी परिसरात शोधमोहीम सुरू केली. याप्रकरणी सावंगी पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १०४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**- atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# 'पोकरा' अंतर्गत कृषी अवजार बँकेसाठी आर्थिक सहाय्य

## -५ एप्रिलपर्यंत अर्जाचे आवाहन

**अमरावती :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या (पोकरा) दुसऱ्या टप्प्यांतर्गत अमरावती जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या आणि महिला बचत गटांना कृषी व्यवसायात भरारी घेण्यास अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे. या योजनेतून गावपातळीवर 'कृषी अवजार बँक' स्थापन करण्यासाठी प्रकल्प मूल्यांच्या ६० टक्क्यांपर्यंत म्हणजेच कमाल २४ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. या उपक्रमासाठी प्रकल्प गावातील उमेद आणि माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच गाव संघ पात्र राहतील, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. निवड झालेल्या गटांना ट्रॅक्टर चलित अवजारे, बीबीएफ यंत्र, रोपणी व लावणी यंत्र, मल्चिंग मशीन, कम्बाइन हार्वेस्टर आणि फवारणी पंप यांसारखी आधुनिक यंत्रसामग्री खरेदी करता येईल. इच्छुक संस्थांनी प्रकल्पाच्या अधिकृत पोर्टलवर (https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/) ५ एप्रिल २०२६ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करून अर्ज सादर करावेत, असे आवाहन 'आत्मा'च्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी स्थानिक कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# दिव्यांग लाभार्थ्यांनी ३१ मार्चपर्यंत ई-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन

**अमरावती :** अमरावती शहर तहसीलदार (संजय गांधी योजना) यांच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक अर्थसहाय्य योजनांमधील दिव्यांग लाभार्थ्यांनी त्यांचे दिव्यांग प्रमाणपत्र (UDID Card) आधार कार्डशी संलग्न (E-KYC) करणे अनिवार्य करण्यात आले आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना, तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ व विधवा योजनेच्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया ३१ मार्च २०२६ पूर्वी पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार डॉ. प्रियांका मिसाळ यांनी केले आहे. शासन निर्देशानुसार, ज्या दिव्यांग लाभार्थ्यांचे आधार कार्ड त्यांच्या युडीआयडी कार्डशी लिंक नसेल, अशा लाभार्थ्यांचे एप्रिल २०२६ पासून मिळणारे २ हजार ५०० रुपये मासिक अनुदान तांत्रिक कारणास्तव थांबण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे लाभार्थ्यांचे अनुदान सुरळीतपणे सुरू राहण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

## नगर परिषद कार्यालय, धामणगांव रेल्वे, जि.अमरावती

ई-मेल mcdhamangaon@gmail.com फोन क्र.०७२२२-२३७०५०

जा.क्र..१००४/नपधारे/ग्रंथालय विभाग २०२६ दिनांक ११.०३.२०२६

### निविदा सूचना

धामणगांव रेल्वे नगर परिषद सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता वाचनालयाकरीता पुस्तके खरेदी करावयाची आहेत. त्यामध्ये शासनमान्य यादीतील पुस्तके तसेच कथा, कादंबरी, आध्यात्मिक, धार्मिक व स्पर्धा परीक्षा यांचे वेगवेगळे दर देण्यात यावे. पुस्तकांची यादीनुसार पुस्तके पुरवावे लागतील. सबब इच्छुक पुरवठाकर्त्यांने नमुद असलेल्या पुस्तकांवर वेगवेगळे दर देण्यात यावे. सूट दर पत्रक लिफाफा नगर परिषद कार्यालयात सादर करावे.

| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| १. | स्पर्धा परीक्षेला लागणारी पुस्तके |
| २. | कथा, कादंबरी, आध्यात्मिक, धार्मिक |
| ३. | शासनमान्य यादीतील पुस्तके |

सूट दरपत्रक प्रसिध्द दिनांकापासून दिनांक २०.०३.२०२६ पर्यंत नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावे लागेल. अटी व शर्ती न.प.कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

(पूनम कळंबे)
मुख्याधिकारी,
नगर परिषद, धामणगांव रेल्वे


## पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.
शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)
संपर्क - ९६०७५८२०९४



## WANTED

**Arts & Commerce College, Hiwarkhed, Dist - Akola.**
Applications are Invited for Full Time Regular Posts as per Following Details in the Faculty of Science & Technology / Humanities / Commerce & Management /Interdisciplinary Studies.
**Vacancies for Non-Grant Courses / Programmes**

| S.N. | Name of the Post | Subject/ Course | Category Wise No. of Post | | | | | Total No.of Post |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Open | SC | ST | OBC | Any other | |
| 1 | Principal | B.A., B.Com | 01 | – | – | – | – | 01 |

For qualifications/Experience/Pay Scale and other details/conditions visit university website **www.sgbau.ac.in** and college website **www.kvvmh.ac.in**
**Note** - Apply Within Ten Days From Date of Advertisement Publication. **PRESIDENT**


## विभाग नियंत्रक - ०७२१-२६६२२८५ विभागीय वाहतुक अधिकारी- ०७२१-२६६०३००

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती विभाग, शिवाजी नगर, अमरावती

### ई-निविदा सूचना क्र - ०२/२०२५-२६

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती विभाग, अमरावती हे खालील बसस्थानकावरील रिक्त वाणिज्य आस्थापना मासिक परवाना शुल्कावर (फिवर) लिव्ह अँण्ड लायसेन्स पद्धतीने चालविण्यास देणेसाठी ई-निविदा मागवित आहेत. ई-निविदा भरावयाचा कालावधी दि.१२.०३.२०२६ वेळ ११.०० ते दि.२३.०३.२०२६ वेळ १५.०० पर्यंत राहील.

| अ. क्र. | बस स्थानक | आस्थापना प्रकार | बांधीव/ मोकळी | जागेचे क्षेत्रफळ (चौ.फुट) | जागा वापरणावळ रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मोझरी (तळमजला) | उपहारगृह | बांधीव | १०२२ | ७३८६ | ८८६३२ |
| २. | चांदूर रेल्वे | उपहारगृह | बांधीव | १६.१९ | ७६१० | ९१३२० |
| ३. | मोर्शी | उपहारगृह | बांधीव | ३८९ | १२११० | १४५३२० |
| ४. | परतवाडा | बेकरी | बांधीव | ७०० | ७००० | ८४००० |
| ५. | राजापेठ | दुचाकी वाहनतळ | मोकळी | ३००० | ६८६५५ | ८२३८६० |

अधिक माहितीसाठी ई-निविदा प्रणालीच्या portal - http://mahatenders.gov.in साईटवर भेट द्यावी.

बयाणा रक्कम व जी.एस.टी.सहीत निविदा फॉर्म रक्कम ही ऑनलाईन पेमेंट गेट-वे पध्दतीने भरावयाची आहे. शासनमान्य पंजीकृत बेरोजगार सेवा सहकारी संस्था / लोकसेवा केंद्र यांना सदर अट लागू नाही. बयाणा रकमेतून सूट असल्यास प्रमाणपत्राची स्कॅन प्रत तांत्रिक निविदेत अपलोड करावयाची आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. निविदा भरणे, सादर करणे व स्विकारणे हे खालील वेळापत्रकाप्रमाणे राहील.

| Sr.No. | Details | Start Date | Hrs. | End Date | Hrs. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Publication of Tender. | 12.03.2026 | 11.00 | | |
| 2. | Document Download Start | 12.03.2026 | 11.00 | 23.03.2026 | 15.00 |
| 3. | Bid Submission Start | 12.03.2026 | 11.00 | 23.03.2026 | 15.00 |
| 4. | Opening of Technical Cover | 24.03.2026 | 16.00 | | |

निविदा सादर करण्यासाठी काही प्रश्न उपस्थित झाल्यास विभागीय कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६०३०० संपर्क साधावा.

स्वाक्षरी/-
विभाग नियंत्रक
राज्य परिवहन, अमरावती

**एस.टी.चा प्रवास - राज्याचा विकास**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, विद्यमान श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२९०/२०२६
**श्रीमती शोभा अधिक पाच -वि- निरंक**
पुढील ता.२४.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. सौ.शोभा गोवर्धन भिवगडे, वय ५४ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. श्रीमती अर्चना प्रदीप भिवगडे, वय ३६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
३. कनिष्का प्रदीप भिवगडे, वय १३ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
४. उत्कर्ष प्रदीप भिवगडे, वय १० वर्षे, व्यवसाय - शिक्षण
५. श्रुतिका प्रदीप भिवगडे, वय ०७ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
६. दिव्यांशू प्रदीप भिवगडे, वय ०३ वर्षे, व्यवसाय - निरंक
अर्जदार नं.२ ही स्वतःकरीता व अपाक आई म्हून अर्जदार नं.३ ते ६ करीता सर्व रा.नया अकोला, ता.जि.अमरावती-४४४८०१

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत प्रदीप गोवर्धन भिवगडे** यांचे दिनांक **२९.१२.२०२५** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार शोभा अधिक पाच विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शोभा अधिक पाच विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४३५/२०२६
**कमलादेवी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२९.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kamladevi Hanumandas Panpaliya , Age 79 Yrs. Occu.: Household R/o 123, Shirajgaon Korde, Tq.Chandur Rly. Dist. Amravati.
2. Harish Hanumandas Panpaliya, Age 49 Yrs. Occu.: Business R/o 123, Shirajgaon Korde, Tq.Chandur Rly. Dist. Amravati.
3. Lakish Hanumandas Panpaliya, Age 42 Yrs. Occu.: Pvt. Work R/o 202, Ekdant Apartnent, Near Adiwasi Hostel, Vallabh Nagar, Ambavihar, Sai Nagar, Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **हनुमानदास बद्रीनारायण पानपलिया** हे दिनांक 19.06.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कमलादेवी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कमलादेवी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.४९६/२०२६
**वच्छला -वि- निरंक**
पुढील ता.२१.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. श्रीमती वच्छला तुकारामजी कुंभलकार, वय ८० वर्षे, व्यवसाय - घरकाम, रा.भवनी पुरा, अंजनगांव बारी, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत बाळासाहेब उर्फ बाळकृष्ण तुकाराम कुंभलकार** यांचे दिनांक **०१.०८.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार वच्छला विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वच्छला विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 39/2023 **कलम ५० अ (१)**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक: **श्री.सद्गुरु प्रजापती महाराज संस्थान, श्रीक्षेत्र पंचेश्वरी संस्थान, पंचवटी सायत, ता.भातकुली जि.अमरावती अ-२०२७ बाबत**
अर्जदार - **श्री.संजय जगन्नाथ उताने**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे **कलम ५० अ (१)** अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - परिशिष्ट १ प्रमाणे
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - परिशिष्ट १ प्रमाणे

सदर प्रकरण महा.सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या **कलम ५० अ (१)** अन्वये न्यायिक बोर्डवर प्रलंबित आहे.

प्रस्तावित योजनेप्रमाणे प्रथम विश्वस्त मंडळ--
१) श्री.डॉ.ज्ञानेश्वर भानुदास उताने, २) श्री.नामदेव किसन सुरजुसे, ३) श्री.प्रभाकर तुकाराम अंबुलकर, ४) श्री.उमाशंकर श्रावण गलबले, ५) श्रीमती त्रिशुला जगन्नाथराव उताने, ६) श्री.सुधाकर विठ्ठलराव बेंडेकर, ७) श्री.अविनाश गंगाधर श्रीगडीवार

**गैरअर्जदार - कुणीही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०६.०३.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**(श्री.र.र.ठाकरे)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४८३/२०२६
**प्रेरणा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२१.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Prerna Premratan Sadani, Age 66 Yrs. Occu.: Household W/o Premratan Sadani
2. Saurabh Premratan Sadani, Age 37 Yrs. Occu.: Service Both R/o Flat No.1o2, Near Mantri Motors, Keshar Appartment, Badnera Road, Head Post Office H.V.Nagar, Amravati

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत प्रेमरतन हरिकिसन सदानी** हे दिनांक 25.04.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रेरणा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रेरणा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३१३८/२०२५
**अरुण -वि- निरंक**
पुढील ता.१६.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Arun Nagesham Bongire Age 77 Yrs. Occu.: Labour
2. Sharifa Bi Sheikh Ais, Age 57 Yrs. Occu.: Household R/o Infront of Prem Niwas Building, Chaprashipura, Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शिला नागेशाम बोंगीरे** हे दिनांक 11.03.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अरुण विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अरुण विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१९.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र. १८९/२०२६ ने.ता. १३.०४.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.जितेंद्र ओंकारसिंग चव्हाण, वय ४३ वर्षे, धंदा - शेती रा.दुर्गवाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. सौ.वंदना विजयसिंह तंवर, वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.ज्योती अजयसिंह गहरवार (लग्नाआधीचे नांव ज्योती ओंकारसिंग चव्हाण) वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम रा.दर्यापूर, ता.दर्यापूर जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे आई **सिंधुबाई ओंकारसिंग उर्फ ओमकारसिंग चव्हाण** ही दि.**२४.०१.२०२५** रोजी **पारश्री हॉस्पीटल, अमरावती, ता.** जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ११.०३.२०२६

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 954/25 **कलम** 22
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक बाबत: **श्री.नरहरी माळवी सोनार संघ, अमरावती, ता. जि.अमरावती एफ-२१२७**
अर्जदार - **राजू मारोतराव धरमठोक**
**गैरअर्जदार - १) अतुल रामभाऊ बानुबाकोडे, २) मुकूंद मधुकरराव रोटे,३) कृष्णराव नारायण विंचुरकर, ४) आकाश अशोकराव आसरे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये आपणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीच्या आत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **११.०३.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र. १८८/२०२६ ने.ता. १३.०४.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.प्रविण सुरेश राऊत, वय २८ वर्षे, धंदा - मजुरी रा.खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. सौ.ज्योती मंगेश नेवारे वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम रा.हरम, ता.अचलपूर, जि.अमरावती

-- **विरध्द** --

**गैरअर्जदार-निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील **सुरेश दौलतराव राऊत** हे दि.**०५.०८.२०२५** रोजी खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र. १८०/२०२६ ने.ता. ०९.०४.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.शंकर माणिकराव झाडे, वय ६२ वर्षे, धंदा - शेती रा.बऱ्हाणपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. सौ.पुष्पा प्रभाकर यावले, वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम रा.खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.रंजना दिपक फाले, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम रा.शिरजगांव कोरडे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
४. सौ.लता दिलीप भाकरे, वय ५८ वर्षे, धंदा - घरकाम रा.बेलोरा. ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५. सौ.ज्योती सुखदेवराव नागपुरे, वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम रा.हिरापूर नानोरी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे आई **तुळसाबाई माणिकराव झाडे** ही दि.**२१.११.२०१९** रोजी **बऱ्हाणपूर**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ११.०३.२०२६

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १८३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# लोकसहभागातून घडणार शहराचा विकास

## अर्थसंकल्पासाठी नागरिकांनी सूचना द्याव्यात - महापौर



नागरिकांच्या सूचना नोंदविण्यासाठी महानगरपालिकेतर्फे विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी दिलेल्या क्यूआर कोड स्कॅन करून आपले अभिप्राय आणि सूचना नोंदवू शकतात. तसेच amravaticorporation.in या महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊनही आपले मत व सूचना नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**अमरावती/का.प्र.**
अमरावती शहराच्या विकासाला गती देण्यासाठी अमरावती महानगरपालिकेने २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाची तयारी सुरू केली असून या पार्श्वभूमीवर महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी शहरातील सर्व नागरिकांना आपले मत, सूचना आणि अपेक्षा नोंदविण्याचे आवाहन केले आहे. लोकसहभागातून तयार होणारा हा अर्थसंकल्प शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महापौर तेजवाणी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या आवाहनात म्हटले आहे की, महानगरपालिकेचा अर्थसंकल्प हा केवळ आर्थिक आकड्यांचा दस्तऐवज नसून तो शहराच्या प्रगतीचा आणि भविष्यातील विकासाचा रोडमॅप असतो. शहरातील पायाभूत सुविधा, नागरी सोयीसुविधा, पर्यावरण, वाहतूक, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता तसेच विविध विकासकामांसाठी कोणत्या प्रकारे नियोजन करायचे याचा सविस्तर आराखडा या अर्थसंकल्पातून मांडला जातो.यंदा अमरावती महानगरपालिकेने अर्थसंकल्प तयार करताना लोकसहभागाला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील प्रत्येक घटकाचे प्रतिनिधित्व या प्रक्रियेत व्हावे, यासाठी तरुण, विद्यार्थी, उद्योजक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, महिला, गृहिणी तसेच जेष्ठ नागरिकांनी पुढे येऊन आपल्या सूचना नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.नागरिकांनी आपल्या परिसरातील रस्ते, स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, उद्याने, क्रीडांगणे, सार्वजनिक प्रकाशयोजना, वाहतूक व्यवस्था तसेच इतर नागरी समस्यांबाबत सकारात्मक आणि रचनात्मक सूचना महानगरपालिकेकडे द्याव्यात.

नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना आणि कल्पनांचा गांभीर्याने विचार करून अर्थसंकल्पात आवश्यक त्या तरतुदी करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.अमरावती शहराचा विकास हा केवळ प्रशासनाचा नव्हे तर प्रत्येक नागरिकाचा सामूहिक प्रयत्न असतो. शहर अधिक सुबक, सक्षम आणि विकासाभिमुख बनवण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे पुढाकार घेणे आवश्यक आहे. असे आवाहनही महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी केले आहे.अमरावती महानगरपालिकेचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा लोकांच्या अपेक्षा आणि सहभागातून तयार होणारा विकासाचा आराखडा ठरेल आणि शहराच्या प्रगतीसाठी नवे दालन उघडेल, असा आशावादही यावेळी व्यक्त करण्यात आला.यावेळी उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, पक्षनेता चेतन गावंडे, गटनेते डॉ. राजेंद्र तायडे, नाना आमले, नगरसेवक संजय नरवणे, संजय गव्हाळे, रावसाहेब देशमुख, सिटीम मॅनेजर अमित डेंगरे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली अंदाजपत्रकीय बैठक



**अमरावती/का.प्र.**
अमरावती मेहानगरपालिकेच्या आगामी आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. ही बैठक महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध योजनांबाबत तसेच विभागनिहाय आर्थिक तरतुदींबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकी दरम्यान महानगर पालिकेच्या विविध विभागांकडून सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदींचा आढावा घेण्यात आला. स्वच्छता, आरोग्य, बांधकाम, उद्यान, प्रकाश व्यवस्था, कर वसुली तसेच इतर नागरी सुविधांशी संबंधित विभागांनी आगामी वर्षासाठी प्रस्तावित केलेल्या निधीबाबत आपले सादरीकरण केले.शहरातील मूलभूत सुविधांच्या बळकटी करणावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. नागरिकांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे, शहरातील स्वच्छता व्यवस्थेत सुधारणा करणे, रस्ते व पायाभूत सुविधा मजबूत करणे तसेच विविध विकासकामांना गती देणे यासाठी आवश्यक आर्थिक नियोजन करण्यात येत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.बैठकीत प्राप्त झालेल्या सर्व विभागांच्या तरतुदींचा समावेश करून अंतिम अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे. त्यानंतर हे अंदाजपत्रक पुढील प्रक्रियेसाठी महानगरपालिकेच्या स्थायी समितीकडे सादर करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. अंदाजपत्रक तयार करताना शहराच्या दीर्घकालीन विकासाचा विचार करण्यात येत असून नागरिकांच्या गरजा आणि अपेक्षा लक्षात घेऊन विविध योजनांचा समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे आगामी आर्थिक वर्षात अमरावती शहरातील विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.या बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, आयुवत शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, महानगरपालिकेचे विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, संबंधित कर्मचारी तसेच अंदाजपत्रक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत सर्व विभागांकडून समन्वय साधत सुयोग्य आर्थिक नियोजन करण्यावर भर देण्यात आला.

## संक्षिप्त



### विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान

**लेहेगाव**-विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या महिलांचा सन्मान महिला दिनाला विद्युत कर्मचारी कामगार सेना सहकारी पतसंस्था अमरावती च्या वतीने पुष्पगुच्छ, मानवस्त्र, सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष रुपाली खोब्रागडे उपकार्यकारी अभियंता अमरावती, तर प्रमुख पाहुणे म्हणून वैशाली पंधरे अति. कार्यकारी अभियंता,वंदना वानखडे, माधुरी कावरे, संगीता राऊत, अर्चना बोंडे, मनीषा कांडलकर, डॉ. शितल सोनुकले, मेघा ठाकरे आदींची उपस्थीती होती. यावेळी मान्यवरांनी महिलांच्या सर्वांगीण विकास व संस्कृती यावर मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रणिता अराडे, अंकिता बेलोरकर, प्रगती बाबनेकर, वनमाला ठवकर, प्रगती माहोरे, मनीषा धारणे, हर्षला खवले, नीता वणवे, सुनिता क्षीरसागर, वैष्णवी भुरे, सुवर्णा काळे, शुक्षाली गाठे, सुचिता काळपांडे, सविता काकडे, मीना शिवणकर, संचिता कांडलकर आदींचा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी पाहुण्यांचे स्वागत विद्युत कर्मचारी कामगार सेना सहकारी पतसंस्था अमरावती चे अध्यक्ष रामकृष्ण चिखलकर यांनी केला. यावेळी पतसंस्थेचे उपाध्यक्ष गजानन शेंदरकर, खजिनदार संजय खेडकर, सभासद यांची उपस्थीती होती. कार्यक्रमाचे संचालन मंगेश वानखडे यांनी केले. तुषार टिक्कस, निलेश गाठे,आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

### २४ मार्चला विभागीय हातमाग कापड स्पर्धा

**अमरावती**-हातमाग विणकरांनी विणलेल्या उत्कृष्ठ हातमाग कापड नमून्यांना प्रोत्साहन देऊन विणकरांना गौरविण्यासाठी विभागीय हातमाग कापड स्पर्धेचे आयोजन २४ मार्च रोजी नागपूर येथे करण्यात आले आहे. अमरावती व नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांतील हातमाग विणकरांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक उपआयुक्त, (वस्त्रोद्योग) अंजू बालपांडे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी हातमाग विणकरांनी तयार केलेले कापड नमूने २० मार्च रोजी सायं ५ वाजेपर्यंत प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. २४ मार्च २०२६ रोजी दुपारी ३.३० ला प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत क्र. २, आठवा माळा, 'बी' विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे होणार आहे. विदर्भातील सर्व हातमाग कापड विणकरांनी याची नोंद घ्यावी.

# परीक्षा शाळांच्या हाती, तारखा ठरवण्याचे स्वातंत्र्य मिळणार

## एससीईआरटीकडून फक्त पॅट परीक्षेच्या तारखा जाहीर

**अमरावती/क्रा.प्र.**
मार्चच्या पहिल्या दहा दिवसांत विदर्भात आलेली उष्णतेची लाट आत्ताच विद्यार्थ्यांना घाम फोडत असून त्यातच एससीईआरटीने जाहीर केलेल्या पॅट परीक्षांच्या तारखांमुळे विद्यार्थ्यांची होरपळ होण्याची शक्यता आहे. राज्यातील इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठीची संकलित मूल्यमापन चाचणी-२ (पॅट) यंदा दि.११, १५ व २२ एप्रिलला होणार आहे. मात्र यंदा केवळ पॅट चाचणीसाठीच राज्यस्तरीय वेळापत्रक देण्यात आले असून इतर विषयांच्या वार्षिक परीक्षांचा निर्णय प्राथमिक व माध्यमिक संचालनालयांवर सोपवण्यात आला आहे. त्यामुळे या परीक्षा घेण्याचे स्वातंत्र्य यंदा शाळांना पुन्हा मिळण्याची शक्यता आहे.

एससीईआरटीच्या सूचनेनुसार पॅट चाचणी ११, १५व २२ एप्रिल रोजी तीन टप्प्यांत होणार आहे. राज्यातील सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच अनुदानित शाळांमधील इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रथम भाषा, गणित आणि तृतीय भाषा (इंग्रजी) या तीन विषयांची ही चाचणी घेतली जाणार आहे. या वेळापत्रकात केवळ या तीन विषयांचा समावेश करण्यात आला असून इतर विषयांच्या चाचण्या व परीक्षा शाळास्तरावर घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच इयत्ता पाचवी व आठवीच्या वार्षिक परीक्षांबाबतचा निर्णय प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संचालनालयाच्या स्तरावरून स्वतंत्रपणे जाहीर केला जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. मुख्याध्यापक यांनी यापूर्वी केलेल्या मागणीचा काही प्रमाणात सकारात्मक विचार झाल्याचे शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधींचे मत आहे. गेल्या वर्षी परीक्षा २५ एप्रिलपर्यंत चालल्या होत्या. यंदा त्या २२ एप्रिलपर्यंत मर्यादित राहणार आहेत.

त्यानुसार इतर विषयांच्या परीक्षा शाळा स्तरावर घेणे अधिक सोयीचे ठरेल', असे म.रा.प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी सांगितले.तसेच सर्व परीक्षा एप्रिलच्या पहील्या आठवडयात घेण्याची मागणी पालकांनी केली आहे.

### पॅट'च्या तारखेला संघटनांचा आक्षेप

पॅट चाचणीचे वेळापत्रक जाहीर करताना तिसऱ्या पेपरची तारीख २२ एप्रिल ठेवण्यात आल्याबाबत शिक्षक संघटनांनी आक्षेप नोंदवला आहे. पॅटचा शेवटचा पेपर २२ एप्रिलऐवजी १५ एप्रिललाच घ्यावा. २२ एप्रिलनंतर निकाल तयार करण्यासाठी शिक्षकांना अत्यंत कमी वेळ मिळतो. अनेक शाळांना २ मेपासून उन्हाळी सुट्टी लागते. त्यामुळे अवघ्या काही दिवसांत उत्तरपत्रिका तपासणे, गुणनोंद करणे आणि निकालपत्रके तयार करणे ही मोठी कसरत ठरणार आहे', असे शिक्षक समितीचे सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे यांनी स्पष्ट केले.

# वकील भगिनींचा महिला दिन साजरा



**अमरावती/का.प्र.**
जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून, स्थानिक दस्तूर नगर येथील आयकर सल्लागार ॲड. अपर्णा अमोल ठाकरे यांच्या कार्यालयात वकील भगिनींसाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महिलांच्या सामाजिक आणि व्यावसायिक योगदानाचा गौरव करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. पंजाबराव देशमुख बँकेच्या संचालिका डॉ. पुनमताई युवराज चौधरी यांनी भूषविले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अमरावती महानगरपालिकेच्या नगरसेविका ॲड. प्रिती रेवणे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या मुख्य वक्त्या म्हणून ॲड. डॉ. क्षितिजा वडतकर (वानखडे) उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात महिला वकिलांसमोर असलेली आव्हाने आणि कायदेशीर क्षेत्रातील संधी यावर प्रकाश टाकला.स्त्री शक्तीने स्वतःच्या हक्कांप्रती जागरूक राहून समाजाला दिशा देण्याचे कार्य करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. तसेच या कार्यक्रमाला ॲड नीता तीखिले उपस्तीथ होत्या. शहरातील असंख्य वकील महिलांनी या कार्यक्रमाला हजेरी लावून आपले अनुभव व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. पुनम चौधरी यांनी महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सबलीकरणावर भर दिला. आयोजिका ॲड. अपर्णा ठाकरे यांनी सर्व उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले तथा ॲड सारिका भोंगाडे (ठाकरे) यांनी आभार प्रदर्शन केले. या उपक्रमाचे वकील वर्तुळात कौतुक होत आहे.

# पी.आर. पोटे पाटील कॉलेज येथे जागतिक महिला दिन



**अमरावती**- पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, महिला सुरक्षा तसेच समाजातील महिलांचे योगदान याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून वकील अपर्णा ठाकरे उपस्थित होत्या. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी महिलांसाठी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या विविध कायद्यांविषयी सविस्तर माहिती दिली.यावेळी विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या कॉन्स्टेबल आसेगाव पूर्णा,संगीता वऱ्हाडे यांनी मुली व महिलांच्या बाबतीत घडणाऱ्या विविध गुन्ह्यांविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकामध्ये प्राचार्य संजय देशमुख यांनी महिलांचे समाजातील सर्वसमावेशक योगदान अधोरेखित केले. स्त्री ही देवीचे रूप असून ती आपल्या अष्टभुजांनी जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये विविध भूमिका समर्थपणे पार पाडत असते, असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. काही विद्यार्थ्यांनी महिलांविषयी आपले मनोगत व्यक्त करत समाजात स्त्री-पुरुष समानतेचे महत्त्व अधोरेखित केले. या मध्ये सार्थक निमकर,प्रिन्स रॉय, आर्या लुंगे,प्रगती उईके व ज्ञानेश्वरी कडू यांनी उद्बोधन केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, महिलांची सुरक्षा आणि समाजातील महिलांचे योगदान याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक जागरूकता निर्माण झाली.कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन मयुर देशमुख व आभार प्रदर्शन परिमल वरोकर यांनी केले. हा संपूर्ण कार्यक्रम पुरुषांनी महिलांकरिता आयोजित केला होता हे विशेष.या आयोजनाबद्दल महाविद्यालयाचे व्यवस्थापन व पालकवर्गाकडून कौतुक होत आहे.

### महिला मेळाव्यात ३२ महिलांना रोजगार

**अमरावती**-जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृह येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय महिला रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. रोजगार मेळाव्याला एकूण ५० रिक्त पदांसाठी ऑनलाईन व ऑफलाईन ९६ महिला उमेदवारांनी सहभाग नोंदविला. मुलाखती दिलेल्या उमेदवारांपैकी ३२ महिला उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.सदर कार्यक्रमाकरिता जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती कार्यालयाचे कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी अभिषेक ठाकरे उपस्थित होते. या मेळाव्यात नामांकित खासगी आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. यामध्ये ओरस एच. आर. सोलुशन नांदगाव पेठ, रेडीयंत हॉस्पिटच्या वैशाली लाहे, एस बी.आय क्रेडीट कार्डचे राहुल सवाई या उद्योजकांनी उपस्थित राहून निवड प्रक्रिया पार पाडली. तसेच त्यांनी उपस्थित उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन विविध पदांवर प्राथमिक निवड केली.

# जनगणनेसाठी शिक्षक,कर्मचारी नियुक्तीबाबत विचार व्हावा

## प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाधिकारी यांना निवेदन



**अमरावती/का.प्र.**
सन २०२६ व २०२७ दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय जनगणना प्रक्रियेसाठी प्रगणक व पर्यवेक्षक यांची नियुक्ती होत आहे. सदर नियुक्ती प्रक्रिया पारदर्शक, न्याय्य व प्रशासकीय दृष्टीने परिणामकारक व्हावी तसेच कार्यालयीन व शैक्षणिक कामकाज सुरळीत चालावे यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार व जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे यांनी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जि.अमरावती च्या वतीने संतोष काकडे यांची भेट घेऊन जनगणना संबंधाने निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनातजनगणना कार्यासाठी शासनाच्या सर्व विभागांतील पात्र कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात यावा, जेणेकरून कामाचे संतुलित विभागणी होईल. कर्मचारी जनगणनेच्या कामावर नियुक्त झाल्यास संबंधित कार्यालय किंवा शाळेचे नियमित कामकाज व अध्यापनकार्य बंद राहणार नाही याची काळजी घेत सर्व शाळा व कार्यालयांमधील कर्मचाऱ्यांना समतोल प्रमाणात नियुक्ती देण्यात यावी.नियुक्ती करताना संबंधित कार्यालय/ शाळेत उपलब्ध कर्मचाऱ्यांपैकी अपंग, दुर्धर आजारी, नजीकच्या काळात सेवानिवृत्त होत असलेले कर्मचारी यांना वगळण्यात यावे.नियुक्तकर्मचाऱ्यांसाठी सुसूत्र व परिपूर्ण प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात यावे. तसेच आवश्यक साहित्य, प्रपत्रे व तांत्रिक साधने वेळेत उपलब्ध करून द्यावीत.जनगणना कामकाजाची पद्धत, जबाबदाऱ्या व अहवाल सादरीकरण याबाबत स्पष्ट व लिखित स्वरूपातील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात याव्यात.सर्व मुख्याध्यापक यांना जनगणना करिता नियुक्ती देण्यात येवू नये अश्या मागणीचे निवेदन देण्यात आले असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# पोदारच्या ओजस इंगोले व हृषिकेश भागवत यांना राष्ट्रीय सिल्व्हर मेडल

**अमरावती** - स्थानिय पोदार इंटरनॅशनल स्कूल, कठोरा अमरावती नवनवीन उपक्रमाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आपल्या कर्तव्याचे पालन करण्यात विभागामध्ये सुप्रसिध्द आहे.



विद्यार्थ्यांसाठी नियमीत केल्या गेलेल्या प्रयत्नांचेच परिणाम म्हणुन पोदार चे विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्तेसोबतच खेळामध्ये सुध्दा यशाचे शिखर गाठत आहे. याप्रसंगी हल्लीच 'स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया दिल्ली' व्दारा आयोजित शालेय राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये पोदारच्या ओजस चंद्रशेखर इंगोले तसेच हृषिकेश अविनाश भागवत यांनी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केले, ज्यामध्ये त्यांनी उत्कृष्ठ प्रदर्शन करून सिल्व्हर मेडल प्राप्त करीत शाळेचे तसेच शहराचे नाव उज्वल केले.प्राचार्या मनिषा संगर यांनी ओजस तसेच हृषिकेश यांना शुभेच्छाँ देवुन शाळेच्या किडा विभागाच्या निरंतर प्रयत्नांची प्रशंसा केली. विद्यार्थ्यांच्या या यशासाठी प्राचार्या मनिषा संगर यांच्या नेतृत्वामध्ये किडा विभागाध्यक्ष हरिष दुर्णे, वैशाली बुंदेले, समीर खान, संकल्प मोहोड, दिपा मांडवधरे, पद्मा खांडे व्दारा अथक परिश्रम केले गेले.

# टाकरखेडा संभू-आष्टी मार्गाला मंजुरी



**टाकरखेडा संभू**-टाकरखेडा शंभू-आष्टी मार्गावरील खराब रस्त्यामुळे वाहनधारकांना अनेक वर्षांपासून त्रास सहन करावा लागत होता. मात्र आता या मार्गाच्या दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यावर्षीच्या अर्थसंकल्पात टाकरखेडा शंभू ते आष्टी या सुमारे ५ किलोमीटर रस्त्याच्या बांधकामाला मंजुरी देण्यात आली आहे. गेल्या १५ ते २० वर्षांपासून या रस्त्याचे पक्के बांधकाम न करता दरवर्षी केवळ तात्पुरती दुरुस्ती केली जात होती. पावसाळ्यानंतर रस्त्यावर पुन्हा खड्डे पडत असल्याने वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत होता. मागील वर्षी २६ जानेवारी रोजी ग्रामपंचायतीसमोर आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी रस्ता बांधकामाबाबत सकारात्मक आश्वासन दिले होते.त्यानंतर उपसरपंच प्रदीप शेंडे यांनी जिल्हाधिकारी, खासदार, पालकमंत्री आणि आ.राजेश वानखडे यांच्याकडे सतत पाठपुरावा करून हा प्रश्न मांडला. अखेर या प्रयत्नांना यश मिळत यावर्षीच्या बजेटमध्ये टाकरखेडा शंभू-आष्टी मार्गाच्या बांधकामाला मंजुरी मिळाली आहे.या निर्णयामुळे परिसरातील नागरिक व वाहनधारकांमध्ये समाधान व्यक्त होत असून लवकरात लवकर रस्त्याचे काम सुरू करून दर्जेदार बांधकाम करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा ३९०.१६ कोटीचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर

## अर्थसंकल्पात ७६.२ कोटीची तुट

**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा २०२६-२७ चा ३९०.१६ कोटीचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर करण्यात आला. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अविनाश बोर्डे यांनी हा अर्थसंकल्प अधिसभेमध्ये सादर केला. अर्थसंकल्पात ३१४.१४ कोटी रुपये प्राप्तीचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून ७६.२ कोटी रुपयाची तुट यामध्ये दर्शविण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृति अधिसभा सभागृहामध्ये आज अधिसभेची बैठक संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तर सभागृहात सर्व सन्माननीय अधिसभा सदस्य उपस्थित होते.



सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प एकूण तीन भागात विभागलेला आहे. परिरक्षण, विकास आणि स्वतंत्र प्रकल्प/योजना/सहयोग कार्यक्रम अनुदाने या तीन शीर्षात विभागलेला असून परिरक्षणासाठी २०५.४० कोटी, विकासाकरिता ५४.१० कोटी, स्वतंत्र प्रकल्प/योजनांकरिता १३०.६६ कोटी रुपयाची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. विद्यापीठाला केंद्र शासन, राज्य शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांकडून अनुदान व विविध शुल्क प्राप्त होत असते. यावर्षी अंदाजित एकूण प्राप्ती ३१४.१४ कोटी रुपये होणार असल्याचा अंदाज अंदाजपत्रकात नमूद करण्यात आला आहे.


अर्थसंकल्पात परिरक्षणांतर्गत अर्थसंकल्पीय वर्षामध्ये ७४ कोटी २६ लक्ष ५० हजार एवढा अनुदान प्राप्तीचा/ तर ७६ कोटी २८ लक्ष २६ हजार एवढा खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे २०२६-२७ या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये परीक्षा शुल्कापासून ५६ कोटी, ३८ लक्ष इतक्या शुल्कप्राप्तीचा तर परीक्षेसाठी ६० कोटी ७३ लक्ष ५० हजार एवढा खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पदव्युत्तर शैक्षणिक विभागास अर्थसंकल्पीय वर्षात ४ कोटी २६ लक्ष २४ हजार एवढा (पान २ वर)

# संतापाच्या भरात पत्नीने पतीचा केला खून

**दारूच्या वादातून रक्तरंजित शेवट**

### खारतळेगावातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** दारूच्या व्यसनामुळे घरात वारंवार होत असलेल्या कौटुंबिक वादाचा शेवट अखेर रक्तरंजित घटनेत झाला. वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खारतलेगाव येथे पत्नीने संतापाच्या भरात पतीवर मोगरीने हल्ला करून त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मंगेश देविदास गोटे (वय ४२, रा. खारतळेगाव) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नी छाया मंगेश गोटे (वय ३३) हिच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवून तिला ताब्यात घेतले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश गोटे हा नेहमी दारूच्या नशेत घरी येऊन पत्नीशी वाद घालत असे. अनेकदा तो छाया हिला शिवीगाळ व मारहाण करत असल्याने ती बराच काळ मानसिक व शारीरिक त्रास सहन करत होती. मंगळवार (१० मार्च) रोजी दुपारीही किरकोळ कारणावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला. हा वाद काही क्षणातच तीव्र स्वरूपात वाढत दोघांमध्ये हातघाई झाली. या दरम्यान संतापाच्या भरात छाया हिने मंगेशला आधी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर घरात ठेवलेली कपडे धुण्याची लाकडी मोगरी उचलून त्याच्या डोक्यावर आणि शरीरावर जोरदार प्रहार केले. गंभीर मार लागल्याने मंगेश गोटे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वलगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वैभव (पान २ वर)

# महानगरपालिकेची कारवाई : टॅक्स न भरल्यामुळे दस्तूरनगर येथील मालमत्ता सील

**अमरावती/प्रतिनिधीः-** मालमत्ता कर थकबाकीदारांवर अमरावती महानगरपालिकेने आपली कारवाई अधिक तीव्र केली असून आज पूर्व झोन क्रमांक ३ अंतर्गत दस्तूरनगर परिसरात एका थकबाकीदार मालमत्तेवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली. वारंवार सूचना देऊनही कर न भरल्यामुळे महानगरपालिकेने ही कठोर कारवाई केल्याचे समजते.



महानगरपालिकेकडून मिळालेल्या माहितीनुसार, दस्तूरनगर येथील मालमत्ता क्रमांक ३८१ ही श्रीमती कमलबाई खंडेलवाल यांच्या नावावर आहे. संबंधित मालमत्तेचा मालमत्ता कर बराच काळ प्रलंबित होता. महानगरपालिकेच्या कर वसुली विभागाने या संदर्भात मालमत्ताधारकांना अनेक वेळा नोटीस बजावून थकीत कर भरण्याबाबत सूचना दिल्या होत्या. तसेच कर भरला नाही तर संबंधित मालमत्तेवर जप्ती किंवा सीलची कारवाई केली जाईल, असा (पान २ वर)

# अमरावतीसाठी हवाई कनेक्टिव्हिटी वाढवा

## राज्यसभेत खासदार डॉ. अनिल बोंडे यांची मागणी

**अमरावती** : विदर्भातील अमरावती शहराला देशातील प्रमुख शहरांशी अधिक सक्षम हवाई जोडणी मिळावी, तसेच अमरावती विमानतळावर नाईट लँडिंगची सुविधा सुरू करावी, अशी जोरदार मागणी राज्यसभेतील खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी शून्य कालावधीत केंद्र सरकारकडे केली. अमरावतीसाठी नियमित विमानसेवा वाढवण्याची गरज अधोरेखित करताना त्यांनी या मागणीमुळे विदर्भाच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळेल, असे स्पष्ट केले.



डॉ. बोंडे यांनी म्हटले की, केंद्र सरकारच्या उडान (UDAN) योजनेअंतर्गत अमरावती–मुंबई विमानसेवा सुरू झाल्याने विदर्भातील नागरिकांसाठी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. या उपक्रमासाठी त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नागर विमानन मंत्री राम मोहन नायडू आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे विशेष आभार मानले. सुरुवातीला आठवड्यातून तीन दिवस सुरू असलेली अमरावती–मुंबई विमानसेवा नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे वाढवून आता आठवड्यातून पाच दिवस करण्यात आली आहे. ही बाब अमरावती आणि विदर्भातील नागरिकांच्या वाढत्या प्रवासाच्या गरजांचे स्पष्ट द्योतक असल्याचे त्यांनी नमूद केले.

तथापि, अमरावती हे विदर्भातील एक महत्त्वाचे शैक्षणिक, औद्योगिक, कृषी, वैद्यकीय आणि व्यापारी केंद्र असूनही शहराला अद्याप अपेक्षित हवाई कनेक्टिव्हिटी मिळालेली नाही, असे (पान २ वर)

# दर्यापूर तालुक्यातील शाळा, महाविद्यालये सकाळच्या सत्रात करा



## युवासेनेची मागणी

**खल्लार/प्रतिनिधीः-** दिवसेंदिवस वाढत असलेल्या उन्हाच्या तीव्रतेमुळे विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याची दखल घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने दर्यापूर तालुक्यातील सर्व शासकीय-निमशासकीय शाळा, महाविद्यालये,कॉन्व्हेंट सकाळच्या सत्रात भरविण्याबाबत गटशिक्षणाधिकारी दर्यापूर यांना युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर यांच्या नेतृत्वात निवेदन सादर केले.

मार्च महिन्यापासूनच तापमानात मोठी वाढ होत असून दुपारच्या सत्रात शाळा-महाविद्यालयांना उपस्थित राहणे विद्यार्थ्यांसाठी कठीण ठरत आहे. कडक उन्हामुळे उष्माघाताचा धोका वाढत असल्याने विद्यार्थ्यांचे तसेच (पान २ वर)

# दिव्यांग लाभार्थ्यांच्या मानधनात हजार रुपयांची वाढ

### -२० मार्चपूर्वी युडीआयडी आणि आधार अपडेट करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील दिव्यांग बांधवांसाठी त्यांच्या मासिक अनुदानात हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. आता लाभार्थ्यांना दरमहा २ हजार ५०० रुपये अनुदान थेट बँक खात्यात मिळणार आहे. मात्र, या वाढीव लाभाचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी आपले ऑनलाईन युडीआयडी कार्ड आणि आधार कार्ड अपडेट करणे अनिवार्य आहे.




जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजनेतील २१ हजार ३५९ (पान २ वर)

# अमरावती महानगरपालिकेत मालमत्ता कर वसुलीचा आढावा

### थकबाकीदारांवर कडक कारवाईचे आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली आज, बुधवार दि. ११ मार्च २०२६ रोजी महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे मालमत्ता कर वसुली संदर्भात आढावा बैठक संपन्न झाली.



बैठकीत शहरातील सर्व झोनमधील मालमत्ता कर वसुलीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या विभागातील वसुलीची प्रगती, प्रलंबित थकबाकी तसेच सुरू असलेल्या वसुली मोहिमांची माहिती सादर केली. आयुक्तांनी वसुलीचे काम अधिक गतीने व नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्याचे निर्देश देत थकबाकी कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यावर (पान २ वर)

# जयस्तंभ परिसरात तडीपार आरोपी अटकेत; चाकू जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** जयस्तंभ परिसरातील सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करणाऱ्या एका तडीपार आरोपीला कोतवाली पोलिसांनी बुधवारी अटक केली. आरोपी शुभम उर्फ सॅम दिनेश वासनिक (वय २५, रा. बेलपुरा) हा हातात चाकू घेऊन लोकांना धमकावत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. घटनास्थळी धाव घेऊन पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आणि त्याच्याजवळून अंदाजे १,००० किमतीचा चाकू जप्त केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोतवाली पोलीस ठाण्याचे पथक ११ मार्च रोजी हद्दीत गस्त घालत असताना जयस्तंभ परिसरात तडीपार आरोपी हातात चाकू घेऊन नागरिकांना धमकावत असल्याचे पाहिले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करून त्याला ताब्यात घेतले. आरोपीवर कलम १४२, शस्त्रास्त्र अधिनियम कलम ४/२५ आणि मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ बी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहेत.

# आरोपीच्या घरातून ६२ ग्रॅम एमडी जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत एनडीपीएस प्रकरणातील गुन्हे शाखेच्या तत्पर कारवाईत बुधवारी आरोपी शेख नाझीम शेख रहीम (रा. गवळीपुरा) याच्या घरातून ६२ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आली. पोलीस कस्टडीतील आरोपीने दिलेल्या माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली असून, (पान २ वर)

### यापूर्वी तीन कोटीची एमडी केली होती जप्त

गुन्हे शाखेच्या विश्वासार्ह माहितीवरून रविवारी (दि. ८ मार्च) पोलिसांना समजले की अब्दुल फहीम उर्फ फहीम एफ.बी. (रा. आझाद नगर) आणि शेख अयान शेख रमजान (रा. द्वारका नगर) हे मुंबईहून मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्ज खरेदी करून अमरावतीमध्ये विक्रीसाठी आणत आहेत. ही माहिती मिळताच पोलिसांनी दोघांनाही सापळ्यातून ताब्यात घेतले. त्यांच्या जवळील बॅगेतून मोठ्या प्रमाणातील एमडी सापडली. यानंतर त्यांच्या दोन साथीदारांनाही अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून तीन कोटी रुपयांची एमडी जप्त केली होती. पोलिसांनी या प्रकरणाची सविस्तर चौकशी सुरु केली असून, आरोपींविरुद्ध आवश्यक कायदेशीर पावले उचलली जात आहेत. या कारवाईमुळे शहरातील बेकायदेशीर ड्रग्ज पुरवठा जाळ्यावर मोठा आघात बसल्याचे पोलिसांनी सांगितले. पुढील तपासातून अमरावतीतील ड्रग्ज नेटवर्क अधिक व्यापक असल्याचे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

# नवसारी परिसरातील स्वच्छता समस्येवर महापौरांची पाहणी

## दुसऱ्या रॅमची व्यवस्था करण्याचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधी: -** नवसारी परिसरात स्वच्छतेच्या संदर्भात निर्माण झालेल्या समस्यांमुळे स्थानिक नगरसेवकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर समस्यांचे प्रत्यक्ष स्वरूप जाणून घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांना प्रभागात भेट देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते.



नवसारी येथील नगरसेवक ऋषिकेश देशमुख तसेच स्वीकृत नगरसेवक भोजराज काळे यांनी महापौरांना आग्रहाचे निमंत्रण देत परिसरातील स्वच्छतेसंदर्भातील समस्या सोडवून देण्याची विनंती केली होती. (पान २ वर)

# पदाधिकाऱ्यांना आता वाहनाच्या जागी मिळणार महिन्याचा खर्च

**बायोमायनिंग कंत्राटाला स्थगिती**

## स्थायी समितीच्या पहिल्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका स्थायी समितीची महत्त्वपूर्ण बैठक आज बुधवार ११ मार्च ला दुपारी सभापती अविनाश मार्डीकर यांच्या अध्यक्षतेत घेण्यात आले. या बैठकीमध्ये आता पदाधिकाऱ्यांना वाहनांच्या जागी महिन्याचा खर्च देण्याचा निर्णय घेण्यात आला तसेच बायोमायनिंगचा कंत्राट रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. बडनेरा मध्ये इ बसेस साठी चार्जिंग स्टेशन तयार करण्यावरही चर्चा करण्यात आली. महानगरपालिका द्वारा पदाधिकारी महापौर, उपमहापौर, गटनेता, विरोधी पक्षनेता आणि सभापतींना वाहन उपलब्ध करून देण्यात येत होते. पण आता नवीन निर्णयानुसार त्यांना पदानुसार ५० हजार आणि ३५ हजार रुपये (पान २ वर)

### स्वच्छता कंत्राटच्या बिलावर नगरसेवकांची स्वाक्षरी अनिवार्य-

स्थायी समितीच्या बैठकीत भाजपा नगरसेविका पंचफुला चव्हाण यांनी शहरातील दैनंदिन स्वच्छता कंत्राटदाराला दर महिन्याला किती बिला दिले जात आहे यावर नगरसेवकांचे हस्ताक्षर घेणे अनिवार्य करण्याचा प्रस्ताव ठेवला. प्रस्तावाचे अनुमोदन पद्मजा कौंडण्य यांनी केले. समिती सदस्यांसोबत चर्चा केल्यावर याला मंजुरी देण्याची घोषणा सभापती अविनाश मार्डीकर यांनी केली. स्वच्छतेचा विषय शहरातील नगरसेवकांसाठी गंभीर आहे.

# धावत्या ऑटोमध्ये लागली आग

### बस स्टॅन्ड मार्गावरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील एसटी बस स्टॅन्ड ते रेल्वे स्टॅन्ड मार्गाकडे जाणाऱ्या एका धावत्या ऑटो मध्ये आज बुधवार ११ मार्चच्या दुपारी १२ वाजताच्या सुमारास अचानक आग लागल्याने मोठी खळबळ उडाली. नागरिकांनी चालक मंगेश झोडेकरचा हात ओढून त्याला बाहेर काढले. यामुळे मोठा अनर्थ टळला. माहितीनुसार गेल्या दोन-तीन दिवसापासून शहरातील तापमान वाढले आहे. अशात बुधवारी दुपारी मध्यवर्ती बस स्थानकाकडून रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या मार्गावर गॅस इंधन वर चालणारा ऑटो एमएच २७ बीएच ६४५६ धावत होता. अचानक आटोमध्ये आग लागली. (पान २ वर)



# कोयता घेऊन फिरणारा अटक

अमरावती : गांधी चौक परिसरात पिशवीत कोयता घेऊन फिरत असलेल्या एका व्यक्तीस पोलिसांनी अटक केली. आरोपीचे नाव चंद्रकांत नीळकंठ अठोर (वय ४५, हातुर्णा, ता. भातकुली) असे आहे. पोलिसांनी चंद्रकांतविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# गळफास घेऊन आत्महत्या

अमरावती : हनुमान नगर येथील रहिवासी रमेश वामनराव पांडे (वय ६२) यांनी घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. रमेश पांडे यांना